साप्ताहिक
# माणूस
२३ फेब्रुवारी १९७४ । एक रुपया



**काँग्रेसकडे जीप्सचा ताफा तर जनसंघाकडे सायकलस्वारांचे पथक**
**उत्तरप्रदेश निवडणुकांचे वेध....सु. ल. सोमण**

शहादे-तळोदे
आघाडीवरील
कायदेभंग

हंगेरियन
चित्रपटातील
'सेक्स'

जर
असं
घडलं तर ....

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

शनिवार
२३ फेब्रुवारी
१९७४

वर्ष : तेरावे
अंक : एकणचाळीसावा
किंमत : एक रुपया


# साप्ताहिक माणूस

## गुरू नाटक कसे आहे ?

नाटक हे महाराष्ट्राचे आणि माझेही कितवे-तरी वेड आहे. या वेडामुळे मी पुष्कळ नाटके पाहतो : तेव्हा नाटकातले मला पुष्कळ कळते, हे ओघाने आलेच. त्यात पुन्हा प्रसंगावधानाबद्दल माझी लहानपणापासून ख्याती आहे. त्यामुळे आजुबाजूच्या मंडळींचा बारीक कानोसा घेत मी आपली त्या वेळेपुरती ठाम असलेली नाटयविषयक मते ठणकावून सांगत असतो. आजुबाजूचे ऐकणारे नवनाटयवाले असले तर मी नवनाटयाची तोंडभर तरफदारी करतो; ऐकणारे जुन्या नाटकांबद्दल गहिवर काढणारे असले म्हणजे मी पसाभर उसासे आणि चुळकाभर खारे पाणी हुकुमी काढून दाखवतो. याचा परिणाम असा झाला आहे की नाटयसृष्टीतल्या उभय गोटात माझ्याबद्दल एक नैसर्गिक आपलेपणा आहे.

ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही. प्रसंगी तोंडघशी पडण्याची आफत येते; पण तोंडघशी पडूनसुद्धा दात शाबूत ठेवायचे तंत्र एकदा पक्के अंगी बाणलेले असले म्हणजे झाले. शिवाय थोडा अभ्यास करायची देखील तयारी हवी. म्हणजे असे की वर्तमानपत्रातून आणि साप्ताहिक-मासिकातून नाटकांबद्दल जे भळभळ लिहिले जाते ते कसोशीने आणि वेळच्या वेळी वाचून लक्षात ठेवले पाहिजे. त्यात एक बरे असते. थोडयाशा चाचपडण्यानंतर कोठे काय मिळेल, याचा बऱ्यापैकी अंदाज आपल्याला येऊ शकतो.

ही अवघी खटपट 'गुरू' या नाटकाच्या निमित्ताने मला नुकतीच करावी लागली. 'गुरू'बद्दल बहुत कुछ ऐकले म्हणून भक्तिभावाने ते पहायला गेलो. पाहाताना आणि पाहिल्यावर, मराठी रंगभूमी किती वेगाने (म्हणजे अगदी रेल्वे वॅगनवेगाने) पुढे चालली आहे, याचा नव्याने साक्षात्कार होऊन विस्मयचकित झालो. सुदैवाने, बऱ्याच समीक्षकांना मला झाला तसाच दृष्टांत झाला होता. मग त्यांनी 'गुरू' नाटकाच्या अनुभवातील अस्सलपणा, विषयातील वेगळेपणा, भाषेतील भेदकपणा, अभिनयातील उत्स्फूर्तपणा, नेपथ्यातील नैसर्गिकपणा, रंगभूषेतील रंगीतपणा, पार्श्वसंगीतातील आणि प्रकाशयोजनेतील प्रखरपणा, लेखनातील लालपणा, प्रेक्षकातील पवारपणा इत्यादी पणांवर शहाणपणाने ढसाढसा लिहिले. ते नीट वाचून मी असा सूत्रबद्ध निष्कर्ष काढला की 'गुरू' हे एक गरमागरम, बहिशेबी, खरेखरे नाटक आहे.

'गुरू'बद्दल फक्त एवढेच म्हणता येईल, असे अर्थातच मला वाटत नव्हते. कारण 'माणूस'मधले परखड का काय म्हणतात तसले परीक्षण तोपर्यंत आले नव्हते. मला आपले उगाच वाटत होते की 'माणूस'-मधल्या परीक्षणातून 'गुरू'चे गाठोडे चांगले मोकळे करण्यात येईल. आणि सांगावयास अत्यंत दु:ख होते की वाटले होते तसेच झाले. 'गुरू' हे एक थंड, हिशेबी आणि खोटे नाटक आहे, असे म्हणून पुष्पाबाई मोकळ्या झाल्या. कागदटंचाईमुळे म्हणे त्यांनी हात आवरता घेतला.

'गुरू'बद्दल येणेप्रमाणे दोन परस्परविरोधी वर्णने माझ्या पोतडीत जमा झाली आहेत. आता ते नवेही आहे आणि जुनेही आहे, असे ठरवले म्हणजे प्रसंगावधान राखत उभय गोटांना आपलेसे करणे मला फारसे जड जाऊ नये.

—अनंतराव (सोलकढी)


माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरध्वनी ५७३५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# उत्तरप्रदेश निवडणूक

लखनौ, कानपूर, वाराणसी, अलाहाबाद, मेरठ, आग्रा, झाशी, दिल्ली...

माणूस प्रतिनिधी सु. ल. सोमण यांच्या या भागातील दौऱ्यावर आधारित

## विशेष लेख

भोपाळहून झाशीला 'पोहोचून गेलो' तेव्हा रात्रीचे नऊ वाजायला आले होते. स्टेशन बाहेरच लॉजवर जाताना आमच्या रिक्षा शेजारूनच दुसरा एक रिक्षा जात होता. त्या रिक्षातून लाऊडस्पीकरवरून एक निवेदक आळवून आळवून म्हणत होता,

'झूठ बोले इंदिरा गांधी,
इसके कहिये में न आईयो...'

'याद रखिये भाईयो, ७१ के बाद आप पछता रहे हो. यदि फिरसे पछताना नहीं होगा, तो संघटना कॉंग्रेसकी प्रत्याशी श्रीमती वास्तवासे विजयी बनाये।'

उत्तर प्रदेशातल्या निवडणूक प्रचाराची मला मिळालेली ही पहिली सलामी होती. ह्याच प्रचाराच्या निवेदनात, निवेदक पुढे जाऊन, काव्यपंक्तीतूनच उत्तर प्रदेशच्या आजच्या स्थितीचं वर्णन करीत होता. 'बिजली नाही, मिट्टीका तेल नाही, खायला अनाज नाही, पहनायला कपडा नाही, महँगाई दिन ब-दिन वाढते आहे... कोटयवधी रुपये उत्तर प्रदेशात ओतूनही कॉंग्रेस सरकारची आज ही पहचान आहे. मग उद्या निवडणूक संपल्यावर परिस्थिती किती खालावेल त्याचा नीट विचार करा. स्वार्थी, भ्रष्टाचारी कॉंग्रेसचे सरकार गरीब हटवेल, गरिबी हटवू शकणार नाही हे लक्षात घ्या. खोटया अपिलांनी फसू नका. स्थिर, प्रगतिशील सरकारसाठी संघटना कॉंग्रेसला विजयी करा...'

नंतरच्या दिवसात मी लखनौ, कानपूर, रायबरेली वगैरे उत्तर प्रदेशच्या विविध भागातून हिंडलो. विरोधी पक्षांचा प्रचार साधारणतः वर उल्लेखिलेला सूर पकडूनच होताना मला दिसला. भडकती महागाई, वनस्पती, रॉकेल व अन्नधान्याचे बाजारातून अचानक नाहीसे होणे, वगैरे प्रकार आज उत्तर प्रदेशातही नित्याचे होऊन बसले आहेत. जनमत त्या विरुद्ध प्रक्षुब्धही आहे. साहाजिकच, त्या परिस्थितीचा फायदा उठवून विरोधी पक्षीयांनी आपापले प्रचार-मोर्चे बांधले आहेत. ह्या अशा प्रचारांना संत्रस्त जनतेचा प्रतिसादही भरपूर मिळत आहे आणि किमान नागरी विभागातून तरी जनता ठामपणे कॉंग्रेस विरोधात उभी आहे असे मला जाणवले.

संघटना कॉंग्रेसचा प्रचार करीत धावणारा रिक्षा एका ठिकाणी थांबला आणि आम्ही पुढे निघालो तेव्हा मी माझ्या रिक्षावाल्याला सहजी हटकले, 'क्यू भाई, क्या हाल है चुनाव के?

पायडलींग किंचित हळू करीत, रिक्षावाला म्हणाला, 'अरे काहेका चुनाव साहाब! इन सबको, हमारी याद आती है पाच सालमे एक दफा उसके बाद हम जिंदा है या मरा, उससे इनका क्या तकल्लुफ? सभी ×××× चोर है! फिर भी साहाब, यहाँ तो गुप्ताजीका जोर है! आगे देखे क्या होता है?'

लॉजवरचा मॅनेजर, रिक्षावाल्यापेक्षा थोडचा वरच्या श्रेणीचा. त्याचा निश्चित कल कुणीकडे आहे हे जरी समजू शकले नाही, तरी 'किसी हालतमें' कॉंग्रेस विजयी होणार नाही याची त्याला खात्री वाटत होती...

दुसऱ्या दिवशी सकाळीच लॉजच्या मॅनेजरने माझी, केदार कपूर या अखबारवाल्याशी ओळख करून दिली. 'जागरण' नावाच्या हिंदी दैनिकाचे तो संपादन करतो. त्याने मला ठामपणे सुनवले, 'उत्तर प्रदेश निवडणुकीत, जनतेचे मत कॉंग्रेस-विरोधीच पडणार ह्यात संदेह नाही, पण कुठल्याच एका पक्षाला निर्विवाद बहुमतही मिळणार नाही. निवडणुकीनंतर आयाराम-गयारामचे प्रस्थ वाढेल, आणि अवघ्या वर्षभरात, उत्तर प्रदेशात पुन्हा राष्ट्रपती राजवट पुकारावी लागेल...'

नंतर उत्तर प्रदेशातून हिंडल्यावर कपूरच्या वक्तव्यात बरेच तथ्य असल्याचे मला जाणवले. या निवडणुकीनंतर कॉंग्रेससह कुठल्याही एका पक्षाला स्वतःच्या ताकदीवर सरकार उत्तर प्रदेशात बनवता येईल असे मला वाटत नाही. आयाराम-गयारामचे प्रस्थही साहाजिकच वाढेल. तथापि, ह्या साऱ्यातून पुन्हा राष्ट्रपती राजवट उत्तर प्रदेशात येईल हे मात्र मला पटत नाही. उलटपक्षी, त्यातून पक्षांच्या ध्रुवीकरणाची गती वाढेल असे मला वाटते. ह्याची खुलासेवार चर्चा मी नंतर करीनच. तत्पूर्वी, उत्तर प्रदेशची सध्याची आर्थिक राजकीय परिस्थिती, विविध पक्षांचे डावपेच समजून घेणे आवश्यक आहे...

उत्तर प्रदेश हे देशातले सर्वात मोठे राज्य, सुमारे नऊ कोटी लोकसंख्येचे पाच कोटी मतदार असलेले. देशातली सर्वात मोठी विधान सभा ह्या राज्याला लाभलेली आहे. (४२५ विधान सभा सदस्य संख्या!) लोकसभेत ह्या राज्यातून ८५ खासदार निवडून दिले जातात. लोक सभेतला हा सर्वात मोठा गट असल्याने त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पं. नेहरू, लाल बहादूर शास्त्री, आणि

# युवावर्ग जाग उठा
# बहुगुणा १ ाग गया!
# —जनसंघ घोषणा

# मुस्लिम जातीयवादाची दलित जातीयवादाशी निवडणूक दोस्ती

श्रीमती इंदिरा गांधी, भारताचे हे तिन्ही पंतप्रधान ह्याच राज्यातले. अशा ह्या देशाचा 'मानबिंदू' मानल्या गेलेल्या राज्यातल्या राजकीय चढउतारांचे परिणाम एकूणच देशावर होतात. साहाजिकच, त्यामुळेच इथे फेब्रुवारीच्या अखेरीस होणाऱ्या निवडणुकांकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेले आहे. १९६७ मध्ये देशभर काँग्रेसच्या लोकप्रियतेला ओहोटी लागली होती. उत्तर प्रदेशही त्याला अपवाद नव्हता. १९६९ मध्ये, १९६७ च्या सरकारचे पतन झाल्यावर ज्या मध्यावधी निवडणुका झाल्या, त्यातही काँग्रेस अयशस्वी ठरली. तथापी, विरोधकांना मिळालेल्या ह्या दोन संधींचा नीट उपयोग करून घेता आला नाही. 'संविद' सरकार काँग्रेसपेक्षाही भयानक ठरले आणि, १९६९ च्या काँग्रेसच्या ऐतिहासिक विभाजनानंतर, अनेक डोक्यावरच्या टोप्या बदलत बदलत कमलापती त्रिपाठींचे सरकार इथे काहीसे स्थिर झाले. १९७१ च्या इंदिरा लाटेनंतर हे सरकार आणखी भक्कम झाल्यासारखे वाटले. १९६९ मध्ये संयुक्त काँग्रेसने ४२५ पैकी २११ जागा जिंकल्या होत्या. काँग्रेस विभाजनानंतर, कमलापती त्रिपाठींनी जेव्हा इंदिरा काँग्रेसचे निशाण उत्तर प्रदेशात फडकावले तेव्हा ह्या २११ पैकी फक्त १०३ सदस्य त्यांच्या पाठीशी होते. पुढे 'दलबदल' एवढे झाले, इंदिरा गांधींच्या नवनेतृत्वाचा साक्षात्कार सर्वांना एवढा झाला की ही संख्या वाढत वाढत आज २७० एवढी झाली आहे. संगठन काँग्रेस, भा. क्रां. द., जनसंघ, समाजवादी, स्वतंत्र ह्या साऱ्या गटांना ह्या दलबदलांनी हादरे दिले आणि कमलापती त्रिपाठींचे शासन आता स्थिर झालं असेच बहुतेकांना वाटू लागले.

पण १९७१ नंतर गोमतीतून बरेच पाणी वाहून गेले. 'बांगला देश' विजया पाठोपाठ आलेली इंदिरा लाट तर ओसरलीच, पण त्याचबरोबर महागाई, बेकारी, भ्रष्टाचार झपाट्याने वाढून लोकमताचा लंबक निश्चितपणे काँग्रेसपासून दुसरीकडे झुकू लागला. विद्यार्थी, शिक्षक, इंजिनियर्स, गिरणी-ज्यूट कामगार ह्यांच्या लढ्यांचं सत्र सुरू झाले. ह्या साऱ्याचा कळस पोलिसांच्या बंडाने गेल्यावर्षी झाला. ह्या बंडापायी, उत्तर प्रदेश सरकार जवळजवळ मोडकळीस आल्यासारखे झाले. सैन्याला पाचारण करून हे बंड मोडून काढले गेले खरे, पण त्यातून उत्तर प्रदेश सरकारला स्थैर्य मात्र मिळू शकले नाही. काँग्रेसचे हुकमी बहुमत असूनही, अंतर्गत दुफळीमुळे कमलापति त्रिपाठींचे नेतृत्व ढेपाळले आणि त्यांना आपल्या सरकारचे त्यागपत्र द्यावे लागले. उत्तर प्रदेशात, पाच वर्षांच्या कालावधीत दुसऱ्यांदा राष्ट्रपती राजवट लागू केली गेली. त्यानंतर एकूणच देशाची आर्थिक परिस्थिती बिघडत गेली. अन्नधान्याचा दुष्काळ, भडकती महागाई, भ्रष्टाचार...उत्तर प्रदेशाचाही ह्या सार्वत्रिक परिस्थितीला अपवाद नव्हता.

अशा परिस्थितीत प्रदेशाच्या आर्थिक परिस्थितीकडे लक्ष पुरवून काही चांगले बदल घडवून आणणे, प्रचंड बहुमत असल्यामुळे काँग्रेसला शक्य होते. पण त्याऐवजी, नेतृत्वाच्या वादात गुरफटून पडत हा पक्ष अंतर्गत हेव्यादाव्यातच बुडून राहिला. कमलापती त्रिपाठींनी अशा पद्धतीने प्रदेशातली परिस्थिती हाताळली की तिची परिणती पोलिसी बंडात झाली. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाला फार मोठा विरोध होता. तथापी, त्यांच्या मागेही लोक उभे होते, आणि त्रिपाठी व त्यांच्या पाठिराख्यांच्या विरोधात, दुसऱ्या कुणाकडे उत्तर प्रदेशचे नेतृत्व सोपवणेही कठीण होते. हे त्रांगडे, उत्तर प्रदेशातल्या सार्वत्रिक निवडणुका जवळ आल्या तरी सुटत नव्हते. आणि शेवटी श्रीमती गांधींनाच मध्ये पडून, आपले निर्णय आपसात भांडणाऱ्या काँग्रेसजनांच्या गळी उतरवावे लागले. ह्या निर्णयानुसार श्री. त्रिपाठी केंद्रात गेले आणि केंद्रातून श्री. हेमवतीनंदन बहुगुणा उत्तर प्रदेशात आले. सार्वत्रिक निवडणुकींना अवघे १३० दिवस शिल्लक असताना घाईघाईने बहुगुणांचे मंत्रिमंडळ उत्तर प्रदेशात सत्तेवर आले. कमलापतींचे खंदे पाठीराखे असलेल्या श्रीमती वाजपायी आदींना बहुगुणा मंत्रिमंडळात सामावून घेतले गेले. तथापी ह्या साऱ्या डागडुजीनंतर काँग्रेसांतर्गत गटबाजी थांबली असे मात्र मुळीच नाहीत. उलट ऐन निवडणुकीच्या तोंडाशी ही अंतर्गत गटबाजी पुन्हा डोके वर काढून राहिली आहे. एक मात्र ह्या निर्णयामुळे झाले — निवडणुकांच्या काळात उत्तर प्रदेशात काँग्रेस सरकार अस्तित्वात आले. सरकारचा जो फायदा पक्षाला मिळायचा असतो, तो त्यामुळे साहाजिकच काँग्रेसला मिळणार आहे.

मुख्यमंत्री हेमवतीनंदन बहुगुणांचे मंत्रिमंडळ गेल्या १३० दिवसापासून अधिकारावर आहे. कुठल्याही विधानसभा अधिवेशनाला सामोरे न जाताच, हे मंत्रिमंडळ थेट निवडणुकांना सामोरे जात आहे. विधानसभेत, विरोधी पक्षीयांच्या कुठल्याही हल्ल्याला तोंड न

द्यावे लागणारे देशातले हे एकमेव सरकार आहे! बहुगुणांनी उत्तर प्रदेशातल्या सरकारचे नेतृत्व स्वीकारल्यापासून विविध आश्वासनांची खैरात जनतेवर चालविली आहे. घाईघाईने असंख्य औद्योगिक प्रकल्पांचे संकल्प केले आहेत. अवघ्या १३० दिवसांच्या त्यांच्या कारकीर्दीत, पंतप्रधानांचे तीन-चार दौरे ह्या प्रदेशात झाले. ह्या दौऱ्यांतून अक्षरशः शेकडयांनी पायाभरणी समारंभ, कोनशिला समारंभ, उद्घाटने समारंभ श्रीमती गांधीच्या हस्ते पार पडले. बहुगुणांचे मंत्रिमंडळ उत्तर प्रदेशाची सर्वांगिण उन्नती साधण्यासाठी राबत आहे असे चित्र ह्या साऱ्या प्रयत्नातून उभे करायचा प्रयत्न चालू आहे. देशभर जी झळ लोकांना लागत आहे ती इथे जाणवू नये म्हणून साखरेचे, अन्नधान्यांचे ओघ उत्तरप्रदेशकडे वळवले जात आहेत. भावपातळी राखायचा आटोकाट प्रयत्न चालू आहे. सिमेंटचा राज्याचा कोटा ह्याच काळात दुपटीने वाढवून दिला आहे. कोळशाचे साठे उत्तर प्रदेशाकडे वळवले गेले आहेत. सूत उत्पादनाच्या गिरण्यांच्या प्रकल्पांचे, साखर कारखान्याच्या प्रकल्पांचे ठिकठिकाणी जाळे उभारले जात आहे. थोडक्यात, गेल्या २५ वर्षांत उत्तर प्रदेशाची जी आर्थिक हेळसांड झाली, ह्या प्रदेशाची जी पिछेहाट झाली, ती सर्व भरून काढायसाठीच जणू बहुगुणा मुख्यमंत्री झाले आहेत असा आभास निर्माण केला जात आहे. 'काँग्रेसला विजयी केले तर श्री. बहुगुणांच्या नेतृत्वाखाली उत्तर प्रदेशाची ही घोडदौड अशीच पुढे चालू राहील, जनतेला वरच्या श्रेणीचे जीवन जगायला मिळून समाजवादाकडे वाटचाल करता येईल, व त्यामुळे सध्याच्या आर्थिक अरिष्टांवर मात करता येईल! हाच काँग्रेसच्या प्रचाराचा मुख्य गाभा आहे.

## पिछडेपणाची चीड

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी त्यांच्या अलीकडील उत्तर प्रदेशच्या दौऱ्यावर असताना, खुद्द झाशीला दोन प्रकल्पांची पायाभरणी केली. तिथे आज काहींना रोजगार उपलब्ध झाला आहे. ह्यावर बोलताना झाशीलाच, एक रेल्वे कर्मचारी नेता म्हणाला– 'प्रत्यक्ष निवडणुका न होता, दर चार चार महिन्यांनी नुसतीच निवडणुकीची हवा चालत राहिली पाहिजे. तसं झालं तरच, देशाची प्रगती झपाट्याने होणे शक्य आहे...' जॉर्जसाहेबांच्या रेल्वे मजदूर युनियनचा हा एक झाशीतला कार्यकर्ता होता...

खैर. आज एक गोष्ट मात्र निश्चित आहे. गेल्या २५ वर्षांच्या प्रदेशाच्या 'पिछडेपणा'ची पुरेपूर चीड प्रत्येकाच्या मनात बिंबली आहे आणि हा 'पिछडेपणा' दूर करण्यासाठी काँग्रेस प्रयत्नशील आहे हे दाखविण्यासाठी गेल्या १३० दिवसांत बहुगुणा सरकार प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. तरीदेखील संपूर्ण देशावरच जे आर्थिक सावट आले आहे, त्याची थोडी ना थोडी झळ उत्तर प्रदेशला लागत आहेच. महाराष्ट्र, गुजराथ, शेजारचा मध्य प्रदेश ह्यातून येणाऱ्या बातम्या उत्तर प्रदेशात निवडणुकांनंतर कदाचित येऊ घातलेल्या परिस्थितीची झलक दाखवून देत आहेत. काही आर्थिक–औद्योगिक आंदोलने इथेही उभी आहेत. त्या साऱ्यांचा उपयोग करून घेऊन काँग्रेस विरोधी प्रचार धडाक्यात चालू आहे. २५ वर्षे दुर्लक्षिल्या गेलेल्या जनतेच्या पचनी हा विरोधी प्रचार झटकन पडतो. त्यातच, जे धूमधडाका आर्थिक कार्यक्रम बहुगुणा शासनाने हाती घेतले आहेत, त्यांचा यथायोग्य प्रचारच काँग्रेसच्या अंतर्गत लाथाळीत होत नाही. खुद्द श्रीमती इंदिरा गांधींचा प्रभाव इथल्या जनतेवर विशेषतः ग्रामीण जनतेवर अद्यापही भरपूर आहे. तथापी खालच्या पातळीवर काँग्रेसमधल्या भ्रष्टाचाराविरुद्ध ह्याच समाजात आत्यंतिक चीडही मला जाणवली.

राय बरेली हा श्रीमती इंदिरा गांधींचा मतदार संघ. ह्याठिकाणी किशन ठाकूर हा पूर्वाश्रमीचा काँग्रेस कार्यकर्ता भेटला. तो म्हणतो, '...इंदिराजीके बारेमें तो हमें कोई संदेह नहीं. लेकिन इंदिराजीके जो यहाँके सरदार हैं, वे इंदिराजीका नहीं, बल्कि खुदका कारोबार बना रखते है. आपसी झगडेमें इन्हे लोगोंकी परवाहही नहीं होती है. ऐसे नुमाईदोको यदि हम भेजे विधान सभामें, तो उससे तो यह बेहतर है की, हम किसे वोटभी न दें...' ह्या मतदार संघात काँग्रेसचे विद्यमान आमदार, अपक्ष म्हणून अधिकृत काँग्रेस उमेदवाराशी टक्कर घेत आहेत. विद्यमान आमदाराला तिकीट न मिळाल्याने इथे काँग्रेस दुभंगली आहे. अर्थात, रायबरेली हे असे एकमात्र निर्वाचन क्षेत्र मात्र नाही. किमान शंभर तरी मतदार संघातून काँग्रेसांतर्गत दुफळीने उग्र स्वरूप धारण केले आहे. या निवडणुकीत काँग्रेसची ही सर्वांत मोठी डोकेदुखी ठरणार आहे. 'प्रदेशापुढे, देशापुढे एवढे असंख्य आर्थिक–सामाजिक प्रश्न उभे असताना, काँग्रेसी मंडळी आपसातल्या भांडणांना प्राधान्य देतात, ह्याचा उघड अर्थ एवढाच की, ही मंडळी जनतेच्या प्रश्नासाठी फारशी उत्सुक नाही. तेव्हा माझा तरी होरा असा आहे की, इथलं मत प्रायः काँग्रेस विरोधीच असेल. जनसंघ, भाक्रांद की संघटना काँग्रेस हे त्या त्या ठिकठिकाणच्या उमेदवाराच्या वैयक्तिक गुणावगुणांवर अवलंबून राहील...' इति श्री. ठाकूर.

उत्तर प्रदेशच्या मागासलेपणासंबंधी बऱ्याच तक्रारी मला सर्वत्र ऐकू आल्या. मुख्य रोष होता, २५ वर्षे अव्याहत शासन करणाऱ्या काँग्रेस पक्षावर. या मागासलेपणाचे काही आकडे मी सोबत दिले आहेत. त्यावरून 'देशातला हा सर्वांत मोठा प्रांत, आर्थिक-सामाजिक दृष्ट्या अतिशय मागासलेला आहे.' ह्या आरोपातले तथ्य उमगू शकेल. भारताचे तीनही पंतप्रधान ह्याच प्रदेशातले असूनही ही परिस्थिती आहे हे ह्या संदर्भात इथे लक्षात घेतले पाहिजे! देशाच्या तुलनेत, इथल्या लोकवस्तीची दर किलोमीटरी घनता दुप्पट आहे. (भारत १५५; उ. प्र. ३००.) पण त्याच वेळी इथल्या व्यक्तीचा वार्षिक सरासरी खर्च मात्र, राष्ट्रीय सरासरीपेक्षा खूप कमी आहे. (भारत रु. ५८५; उ. प्र. ५०६) ह्यातही विशेष लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे, १९५१ साली उत्तर प्रदेशातल्या व्यक्तीचा सरासरी दरडोई खर्च भारतीय सरासरीपेक्षा ५०% अधिक होता, आज तो १६% कमी आहे! एका राष्ट्रीय आयोगाच्या सर्वेक्षणानुसार, संपूर्ण देशात एकूण ५८ जिल्हे दरिद्री म्हणून घोषित झालेले आहेत. या ५८ जिल्ह्यांपैकी २२ जिल्हे उत्तर प्रदेशात आहेत. उत्तर प्रदेशात एकूण ५४ जिल्हे आहेत, त्यापैकी वरील २२ जिल्ह्यांसह एकूण ३६ जिल्हे मागासलेले म्हणून घोषित झालेले आहेत. या जिल्ह्यांमध्ये सरासरी मासिक आय केवळ पावणेअकरा रुपये ते ३२ रुपयेच आहे. उद्योगधंद्यांबाबतही उत्तर प्रदेश, देशाच्या तुलनेत खूप मागासलेला आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येच्या १७% लोक या प्रदेशात

राहतात, पण एकूण धनराशीच्या केवळ १% च गुंतवणूक उत्तर प्रदेशात आहे. देशाच्या एकूण उत्पादनाच्या केवळ ७% च उत्पादन उत्तर प्रदेशात होते. देशात साधारणतः दर दहा हजार लोकांमागे ९२ लोक उद्योगधंद्यात आढळतात तर इथे हे प्रमाण केवळ ४७ आहे.

उद्योगातला हा मागासलेपणा, शेतीत भरून निघतो आहे असे म्हणावं तर तसंही नाही. किमान ८०% लोक शेतीवर अवलंबून असूनही, सरासरी दर एकरी उत्पादन राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे (भारत १३९ रु., उ. प्रदेश १२३ रु.!) शेती योग्य पडिक जमीनही, देशात सर्वात ज्यास्त उत्तर प्रदेशात आहे. (१३,४५,००० हेक्टर!) एवढं असूनही खतं मिळण्याबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेतच!

शैक्षणिक दृष्टचाही उत्तर प्रदेश मागासलेला आहे. १९७१ च्या जनगणनेनुसार, भारतात शिक्षितांची संख्या ३०% आहे; तर उत्तर प्रदेशात तीच संख्या केवळ २०% च आहे. एवढं असूनही शिक्षित बेकारांची नोंदलेली संख्या उत्तर प्रदेशात, बंगालच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेशात, एकूण साडेतीन लाख शिक्षित बेकार आहेत, तर पदवीधारक बेकारांची संख्या दहा हजारांच्या घरात आहे, जी देशात सर्वात अधीक आहे.

एवढा सारा मागासलेपणा असूनही, विद्युत उत्पादन, बँकातर्फेच कर्जे, शैक्षणिक सवलती, अन्न धान्य पुरवठा, भूमिहीनांना मकान, वगैरे प्रत्येक बाबतीत उत्तर प्रदेशाला मिळणाऱ्या सवलती एकूण देशाच्या तुलनेत कमी आहेत. (गेल्या ३ महिन्यात मिळत गेलेल्या सवलती अर्थात अपवादात्मक होत!) ही आकडेवारी, ह्यातून सिद्ध होणारी उत्तर प्रदेशाची मागासलेली अवस्था ह्याचेच भांडवल प्रामुख्याने विरोधी पक्षीय मंडळी आपल्या निवडणूक प्रचारात करीत आहेत. लखनऊ येथील जनसंघ कार्यालयात, गेल्या २५ वर्षांतल्या काँग्रेसच्या कार्याचा आराखडा म्हणून ही आकडेवारी मला दाखवून देत श्री. सुब्रम्हण्यम स्वामी म्हणाले, '...इसीलिये हम हमेशा कहते हैं, यू. पी. याने उपेक्षित प्रदेश!...'

अर्थात असा स्वच्छ आरोप काँग्रेसवर संगठन काँग्रेस आणि भाक्रांदचे लोक करू शकत नव्हते. १९६९ पर्यंत ही मंडळी काँग्रेस-मध्येच होती. संघटना काँग्रेसचे उत्तर प्रदेशातले पुढारी, श्री. चंद्रभानु गुप्त हे स्वतः अविभक्त काँग्रेसचे उत्तर प्रदेशचे दोनदा मुख्यमंत्री होते. त्यांच्याशी व भाक्रांदचे श्री. चौधरी चरणसिह (हेही पूर्वाश्रमीचे काँग्रेसवालेच, व 'संविद' मधले मुख्यमंत्री) ह्यांच्याशी बोलताना जेव्हा, उ. प्रदेशच्या मागासलेपणाचा प्रश्न निघाला तेव्हा, गेल्हा २५ वर्षांत किमान १२ ते १५ वर्षे सत्ता या दोघा पुढाऱ्यांच्या मंत्रि-मंडळाच्या हातात होती याची मी त्यांना आठवण करून दिली. त्यांच्या काळातही उत्तर प्रदेशाची पिछेहाट चालूच राहिली होती हेही जेव्हा मी त्यांना सांगितले, तेव्हा दोघेही चांगलेच उसळले. श्री. चंद्रभानु गुप्तांनी या पिछेहाटीचा सारा दोष केंद्रावर टाकला. 'केंद्र सरकारने उत्तर प्रदेशाला सापत्न भावाने वागवलं, इथे गुंतवणूक केली नाही. म्हणून उत्तर प्रदेश मागासलेला राहिला.' असे म्हणून त्या पुष्टयर्थ त्यांनी स्वतःची आकडेवारीही मला दिली. त्यांच्या मते, 'पंचवार्षिक योजनांच्या एकूण कालावधीत केंद्र सरकारच्या एकूण गुंतवणुकीपैकी केवळ चार टक्के गुंतवणूकच ह्या राज्यात झाली. येथली लोकसंख्या देशाच्या एकूण १७% असूनही ...फक्त या प्रदेशाने तिन्ही पंतप्रधान पुरवले म्हणजे संपले (तेही फक्त एकाच घराण्यातून!) नंतर इतर काही मागू नये अशी केंद्राची भावना आहे. पण मला उत्तर प्रदेशाशी इमान राखायचं होते. म्हणून इथल्या लोकांच्या मागण्या घेऊन मी केंद्राशी झगडत राहिलो. नेहरूं-शीही भांडलो, पुढे 'देवी'शीही भांडलो...'

चौधरी चरणसिहाची प्रतिक्रिया साधारण अशीच होती. ते उलट म्हणाले, '...राज्याच्या मर्जीविरुद्ध केंद्राने उत्तर प्रदेशातल्या बड्या उद्योगपतींना सुमारे ७–८ कोटीची कर्जं देवविली. ह्या कर्जांच्या आधारे ह्या उत्तर प्रदेशातल्या उद्योगपतींनी राज्याबाहेर उद्योगधंदे काढले. ही कर्जं काँग्रेस शासनाने वसूल देखील केली नाहीत. वसुली केली ती माझ्या 'संविद' सरकारने!... 'संविद' शासनाने बऱ्याच चांगल्या गोष्टी केल्या, पण ते कोसळले ते काँग्रेसच्या चिथावणीने. काँग्रेसला ह्या बाबतीत केंद्राची फूस होती...'

अगदी अलिकडेच, उत्तर प्रदेशातल्याच एका प्रचार दौऱ्यात पंत-प्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी, उत्तर प्रदेशावर अन्याय झाल्याचे मान्य केले पण त्याचे खापर तिथल्या सरकारवर फोडले. '...हमें खेद है कि इस हमारे प्रदेशमें पिछले कई वर्षोंसे विकास की गती बराबर नही रही है. दुर्दैवसे यहा ऐसे मुख्यमंत्री मिले, जो प्रशासन के भांती केंद्रशासनसे झगडतेही बैठे. इसके बाद यहाँ आयी विपक्षी-योंकी खिचडी सरकार...यह अस्थिरता टालनी हो तो आप सांप्रदायी और जातीय, तथा भांडवलशाही शक्तीयोंसे दूर रहना अवश्य है! इस अस्थिरता का अक्सीर इलाज सिर्फ काँग्रेसही है!...'

## अण्णादुराईंच्या पावलावरून

उत्तर प्रदेशच्या ह्या परिस्थितीवरच सर्व पक्षांनी आपले निवड-णूक मोर्चे बांधले आहेत. अन्नधान्याच्या भडकत्या परिस्थितीत; बहुतेक पक्ष ह्याच प्रश्नावर मोठाली आश्वासने जनतेला देत आहेत. काँग्रेस, कम्युनिस्ट, समाजवादी इत्यादी बहुतेक सर्वांनी, गहू प्रकरणातले केंद्राचे अपयश ध्यानात घेऊन खुल्या बाजाराची ग्वाही दिली आहे, त्याबरोबरच, जनसंघाने, कै. अण्णा दुराईंच्या पावलावर पाऊल ठेवून '८६ पैसे किलो गहू व माणशी दरमहा १२ किलो रेशन' हे आश्वासन दिले आहे. सडका, रेल्वे, वीज, शिक्षण, मागा-सल्या जमातींना सवलती वगैरे बाबतीत सर्वच पक्षांनी रेलचेल आश्वासनांची खैरात केली आहे, (काँग्रेसचाही अपवाद नाही!)

आर्थिक दैन्यावस्था व काँग्रेस शासनाला देशाला सुस्थितीत आणून सोडण्यात आलेले अपयश ह्यावर जरी निवडणूक प्रचाराचा भर असला तरी, जात, पात, धर्म ह्यावरही ह्या निवडणुकात भर दिला जाणार आहे. ब्राह्मण, जाट, मिहीस क्षत्रीय, महार, मुसलमान त्यातही शिया–सूनी) वगैरे असंख्य गट इथे असून त्यावरच इथल्या उमेद-वारांचा विशेष भर आहे. मुसलमान मते सुमारे २०% आहेत तर मागास वर्गाचीही मते साधारणतः तेवढीच आहेत. आणि म्हणूनच या दोन गटात, निवडणूक निकालांना फार मोठी कलाटणी देण्याचे सामर्थ्य आहे. ह्याशिवाय जनसंघाशिवाय जवळ जवळ प्रत्येक पक्ष अंतर्गत कलहानी पोखरून निघाला आहे. ह्या अंतर्गत भांडणामुळेही निवडणूक निकालासंबंधीच्या तर्कांना जबरदस्त तडे पडण्याची शक्यता आहे. काँग्रेसमधली सुंदोपसुंदी जगजाहीर आहेच. संगठन

काँग्रेसची परिस्थितीही तीच आहे. भाक्रांदचे कार्यकर्ते, भाक्रांद मधून फुटून काँग्रेस, संघटना काँग्रेस किंवा अपक्ष म्हणून काम करताहेत. काँग्रेस-कम्युनिस्ट गठबंधन पसंत न पडून कित्येक कम्युनिस्टस काँग्रेस-विरुद्ध निवडणूक लढवीत आहेत. (काँग्रेसने कम्युनिस्टांसाठी सोडलेल्या ३२ जागांखेरीज आणखी ४५ जागांवर कम्युनिस्ट्स उभे आहेत, व शिवाय ३० जागांवर काँग्रेस विरोधी डाव्या आघाडीच्या उमेदवाराला पाठिंबा कम्युनिस्ट्स देत आहेत !) डाव्या आघाडीचा मुख्य गट असलेला समाजवादी पक्ष फुटला असून, त्यातल्या राजनारायण, रामसेवक यादव गटानी 'संसोपा' नावाखाली भाक्रांदशी समझौता केला आहे. मुस्लिम मजलिस मध्येही काही कुरबूर मला ऐकायला मिळालीच. उर्वरित डाव्या आघाडीतही समाजवादी पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्टांचे उमेदवार आपसात लढत आहेत.

हे सर्व छेद प्रतिछेद लक्षात घेतले आणि गेल्या निवडणुकांवर नजर टाकली तर, ४२५ जागांसाठी विविध पक्षाचे व अपक्ष मिळून जे चार हजाराहून अधिक उमेदवार आज रिंगणात उभे आहेत, त्यापैकी फक्त चार पाचच पक्षांच्या उमेदवारांचा गंभीरपणे विचार करावा लागेल.हे पक्ष असे– सत्ता.काँग्रेस (४०२),जनसंघ ३९८,भाक्रांद, (४००) (मु. मजलिस संसोपा) संघटना काँ. ४०२ ह्या चारी पक्षांनी निर्विवाद बहुमत मिळवण्याचा दावा केला आहे. ह्या खेरीज समाजवादी पक्षाचे २५० हून ज्यास्त उमेदवार उभे आहेत. स्वतंत्र, हिंदुसभा, रामराज्य परिषद, बलराज मधोकांचा लोकतांत्रिक संघ, रिपब्लिकन, फॉरवर्ड ब्लॉक, मार्क्सवादी कम्युनिस्ट, शो. का, व असंख्य अपक्ष उमेदवार रिंगणात आहेत. पण त्यांचा काही परिणाम एकूण निवडणुकांवर होईल असे वाटत नाही. मात्र मुस्लिम लीग (४५ उमेदवार+७० जागांवर पाठिंबा) प्रथमतःच निवडणूक लढवीत असूनही निकालांवर २०% मुसलमान मतांच्या जोरावर परिणाय घडवून आणू शकेल असे वाटते. ७ हिंदू हरिजन उमेदवार स्वतःच्या निशाणावर उभे करून आणि अन्यत्र किमान १५ हिंदू (सवर्ण आणि हरिजन देखील) उमेदवारांना खुल्ला पाठिंबा देऊन मुस्लिम लीगने मागास वर्गियांची मते देखील आकर्षित करायचा प्रयत्न चालवलेला आहे. 'दलितांप्रमाणेच आम्हीही इथल्या समाजात उपेक्षितच आहोत. त्यांनी व आम्ही एकत्र येऊन हिंदू जातीयवादांचा मुकाबला करणे ही म्हणूनच आज काळाची निकड आहे.' असे मुस्लिम लीगचे स्थानिक नेते श्री. इक्रम खानसाहेब सांगतात आणि दलितांना आपल्या बाजूला ओढतात...

प्रामुख्याने ह्या पाच सहा पक्षातच खरी सुंदोपसुंदी होऊन निवडणुकीचे महाभारत गाजेल असे झांशीहून कानपूर, प्रयाग, रायबरेली करीत मी कानपूरमार्गे लखनौला पोचलो तेव्हा माझे मत बनले...

लखनऊच्या अमिनाबाद पार्कच्या बाजूच्याच हॉटेलात मी आपले बाड-बिस्तर लावीत होतो. तो कळले शेजारच्या पार्कवर साथी अशोक मेहतांची सभा आहे. बाड बिस्तर जेमतेम लावून मी अमिनाबाद पार्कवर गेलो. लांबवर जनसंघाची जीप कार्ण्यातून ओरडत धावत होती, महागाई, भ्रष्टाचार, अकाल रोकना है? रोक सकते हैं? –हाँ रोक सकते है कौन ?– आप और जनसंघ !...

अमिनाबाद पार्कवरच्या व्यासपीठावरून कुणीतरी ओरडत होता–

'इंदिरा तेरी क्या पहचान ?– भूखा, कंगाल हिंदुस्थान !

'युवा वर्ग जाग उठा– बहुगुणा भाग गया !'

सभा सुरू होत होती. बाजूला विद्यार्थ्यांच्या आंदोलनांचे, उत्तर प्रदेशातल्या इंजिनियर्सच्या महिनाभर चालू असलेल्या संपाचे किस्से लोक एकमेकांना सांगत होते. अशाच घोळक्यातला एक म्हणाला, 'ये सभी असंतुष्ट युवक है जो पहिली बार मत देने जा रहे हैं। उनकी संख्या भी काफी है– २० प्रतिशत !'

मनाशी म्हटले 'ये भी एक जंक्शन पॉईंट है !' आणि त्याचा छडा लावायचा मनाशी ठरवून, मी अशोक मेहतांचे भाषण ऐकू लागलो...

## प्रमुख विरोधी पक्ष

लखनऊच्या अमिनाबाद पार्कवरची अशोक मेहताची सभा. पाच सात हजाराचा जमाव एकीकडे संघटना काँग्रेसचे स्थानिक नेते श्री. चंद्रभानु गुप्ता उत्तर प्रदेशात स्वतःचे सरकार बनवायच्या घोषणा करीत असतांना, मेहतांजीनी ह्या सभेत ठामपणे सांगून टाकले, "सत्तारूढ काँग्रेससह कुठल्याही एका पक्षाला निश्चित बहुमत मिळणार नाही." अशोक मेहता, संघटना काँग्रेसणा प्रचार करीत संपूर्ण प्रांतभर हिंडून लखनऊला येऊन बोलत होते. संगठन काँग्रेसच्याच प्रचार सभेत तेव्हा संघटना काँग्रेसच्या स्थानिक कार्यकर्त्यांपेक्षा वेगळा अंदाज व्यक्त करून, ते बरेच काही आतले, किमान त्या पक्षासंबंधी तरी सांगून गेले असेच मला वाटले ! बाकी इतर सभेत फारसा काही राम नव्हता. "Indira Hatao Slogan during 1971 elections boomranges against us and we were defeated" असे भूतपूर्व मुख्यमंत्री श्री. चंद्रभानु गुप्ता माझ्याशी बोलताना म्हणाले खरे, पण वर उल्लेखिलेल्या सभेत किंवा इतरत्रच्या प्रचारात, सत्तारूढ काँग्रेस व त्यांतही प्रामुख्याने इंदिराजी ह्यांच्याविरुद्धच्या हल्ल्यांशिवाय मला दुसरं कांहीही आढळले नाही. संघटना काँग्रेसचा जो जाहीरनामा प्रकाशित झाला आहे, यातही सत्तारूढ काँग्रेसच्या गेल्या पाच वर्षातील अपयशांच्या वर्णनानीच बराच भाग व्यापला आहे. प्रत्यक्ष आर्थिक कार्यक्रमांबद्दल उलट सुलट उडचाच आहेत. नियंत्रण उठवायच्या घोषणा आहेत, त्याचबरोबर न्याय्य वाटपाच्याही घोषणा आहेत ! सामाजिक कार्यक्रमांचेही तेच. मुसलमान, दलित याना प्रामुख्याने चुचकारायचा प्रयत्न ह्या घोषणा पत्रात केला आहे. इ. ८ वी पर्यंत ऊर्दू प्रत्येकाला अनिवार्य विषय करण्यात येईल. मात्र ऊर्दूला दुसऱ्या राजभाषेचा दर्जा देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही." असेही पिल्लू हिंदी समर्थकांना चुचकारण्यासाठी सोडलेले आहे.

असे असले, तरी श्री. सी. बी. गुप्ताच्या घरी झालेल्या गप्पा मात्र रंगल्या खास. त्याना संघटना काँग्रेस विजयी होईल ह्यात कसलाही संदेह वाटत नव्हता. "आपण म्हणता त्याप्रमाणे संघटना काँग्रेसचे सरकारच इथे अधिकारावर येवो अशी मी पण इच्छा करतो. पण समजा दुर्दैवाने तसे घडले नाही, कुणालाच बहुमत मिळाले नाही, तर संयुक्त सरकारात तुम्ही सहभागी व्हाल का ?' ह्या माझ्या प्रश्नावर गुप्ताजी प्रथम तर उखडलेच. पण नंतर, थोडे शांत होत म्हणाले,

"ते त्यावेळच्या परिस्थितीवर अवलंबून राहील. पण काही झाले तरी, सत्तारूढ काँग्रेसशी हातमिळवणी कधीच होणार नाही, निदान जोपर्यंत त्यांची 'लाल' धोरणे बदलत नाहीत तोपर्यंत तरी निश्चितच नाही. I am deadly against the Communists." कामराज–इंदिरा सहकार्याकडे बोट दाखवताच ते पुन्हा उसळले. "ती कामराजांची करणी आहे. तिथे 'द्रमुक' पक्षाचा खतरा इंदिरा काँग्रेस (इं) पेक्षाही मोठा आहे..."

मी महाराष्ट्रातला म्हटल्यावर त्यांनी श्री. यशवंतराव चव्हाण व श्री. वसंतराव नाईक ह्या दोघांविरुद्धचा आपला राग भडाभड बोलून दाखवला. "The most opportunists and traitors to the Parly" अशी शेलकी विशेषणं वापरून ते म्हणाले. "त्यांच्या संधिसाधू निर्णयामुळे इंदिराजींचे पारडे जड झाले. इंदिरा–विरोधात हेच दोघे आघाडीवर होते, नंतर ते फेन्सींगवर गेले नि शेवटी खुर्च्यांच्या लालसेने लालभाईशी चुंबाचुंबी करणाऱ्या इंदिराजींच्या गोटांत जाऊन बसले– निती अनितीची चाड न बाळगता."

खुद्द श्री. चंद्रभानु गुप्ता लखनऊहूनच निवडणूक लढवीत आहेत. सत्तारूढ काँग्रेसचे डॉ. चरणसिंग (पूर्वाश्रमीचे समाजवादी !), जनसंघाचे श्री. बद्रीप्रसाद अवस्थी, आणि 'भाक्रांदचे श्री. सच्चिदानंद हे त्यांचे प्रमुख विरोधक आहेत. ह्याखेरीज आणखी नऊ जण रिंगणात आहेत. एकंदर प्रचाराच्या रागरंगावरून, व प्रत्यक्ष काही लोकांशी बोलणं झालं त्यावरून मुख्य लढत डॉ. चरणसिंग ह्यांच्याशीच होईल असे दिसत आहे. श्री. गुप्तांचं स्वतःचे वजन, कित्येक वर्षांची पुण्याई आणि लोकात आजही त्यांच्याविषयी असलेला आदर लक्षात घेता, ते विजयी होतील असा अंदाज आहे...

संघटना काँग्रेसच्या चंद्रभानु गुप्तापेक्षा, भाक्रांदचे 'सर्व काही' आणि उत्तर प्रदेशचे भूतपूर्व मुख्यमंत्री श्री. चौधरी चरणसिंग हे तसे 'लकी' आसावेत. मीरत जिल्ह्यांतल्या चपरौली मतदारसंघातून त्यांच्याविरुद्ध असलेले आपले उमेदवार संघटना काँग्रेस व जनसंघाने मागे घेतले आहेत. त्याचे आता एकमात्र महत्त्वाचे प्रतिस्पर्धी आहेत सत्तारूढ काँग्रेसचे श्री. प्रीतमसींग. संघटना काँग्रेसने आपला उमेदवार श्री. चरणसिंगासाठीच मागे घेतला आहे. तर जनसंघाचे श्री. सुब्रम्हण्यम स्वामी ह्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी त्या उमेदवाराला मागे घेतला आहे तो चरणसिंगांना पाडण्यासाठी. काही का असेना त्यांचा मुख्य सामना आहे सत्तारूढ काँग्रेसशी (इतरही पांच उमेदवार मैदानात आहेत !) आहे, आणि मीरत–काँग्रेस (सत्ता) अंतर्गत मतभेदांनी पोखरलेली आहे. "...संपूर्ण प्रदेशातच आमच्या त्रिपक्ष युतीचा (भाक्रांद, संसोपा, मु. मजलिस) मुख्य सामना सत्तारूढ काँग्रेसशीच आहे. तो अंतर्गत गटबाजी, भ्रष्टाचार, जातीयता यांनी एवढा पोखरलेला आहे की त्याला ह्यावेळी बहुमत मिळणे शक्यच नाही. अशावेळी त्रिपक्ष युती (Tripple Alliance) हाच एकमात्र पर्याय जनतेपुढे आहे. आणि मला खात्री आहे की, संसोपा व मजलिसच्या सहाय्याने किमान ३०० जागा जिंकून आम्ही स्वच्छ आणि नेटके प्रशासन उत्तर प्रदेशाला, उत्तर प्रदेशच्या इतिहासात प्रथमच देऊं शकू... 'संविद' सरकारातल्या जनसंघियांच्या कारवायांनी जनता जनसंघाला विटली आहे. जनसंघाला ह्यावेळी जनता अखेरचा टोला हाणील आणि सध्याच्या ३९ जागा जरी त्या पक्षाला टिकवता आल्या तरी मी म्हणेन जनसंघाने बरेच कांही साधले... काँग्रेस ओ ही खरी पार्टीच नाही. काँग्रेस इ., त्रिपक्ष युतीने तिकिटे दिली नाहीत. पळत्या पार्टीकडे– असे सगळे काँगोचे उमेदवार ! काँगीची मते फोडण्यापलीकडे तिला फारशी किंमत नाही."

एकंदर परिस्थितीचे असे विश्लेषण केल्यावर श्री. चरणसिंग पुनः एकदा 'संविद'च्या शक्यतेवर बोलताना म्हणाले, '... ती शक्यता तर दिसत नाही. I am absolutely confident we will form the Govt. पण तरीही तसे झालेच तर जातीयवादी जनसंघाशी आमचा कसलाही संबंध राहाणार नाही हे निश्चित ! संघटना काँग्रेस, समाजवादी आघाडी (सो. पार्टी, मार्क्स कम्यु. फॉरवर्ड ब्लॉक, रिपब्लिकन्स वगैरे वगैरे) आणि काही अपक्ष ह्यांच्या सहकार्याने सरकार बनवण्याची शक्यता मी अगदीच नाकारीत नाही...' भाक्रांदचा जाहीरनामा वाचल्यावर आपण संघटना काँग्रेसच्या घोषणापत्राची नक्कल वाचीत आहोत की काय असा आभास निर्माण व्हावा इतके त्यात साम्य आहे. जनतेवर बड्या बड्या आश्वासनाची खैरात करण्यात आली आहे. मुस्लीम मजलीस ह्या मुसलमानामधल्या अधिक कडव्या संघटनेला हाताशी धरून भाक्रांदने मुसलमान मते आपल्याकडे खेचायचा प्रयत्न केला आहे. अलिगड मुस्लिम विद्यापीठ विद्यार्थी संघटनेचा उपाध्यक्ष, मुस्लिम विद्यार्थ्यांचे नेते मुश्ताक अहमद खान ह्यांना भाक्रांदच्या तिकिटावर मोरादाबाद शहर मतदार संघातून उभे केले गेले आहे, तेही मजलिसच्या झेंड्याखाली जमलेल्या मुस्लिम युवकांना त्रिपक्ष युतीकडे आकर्षित करण्यासाठीच ! जाट, आहिरी आदि जमाती व प्रगतशेतकऱ्यामध्य व विशेषतः पूर्व भागात 'भाक्रांद'चा जोर आहेच. ग्रामीण भागात, सत्तारूढ काँग्रेसच्या तोलाने खोलवर मुळे ह्यांचीच पसरली आहेत. २०% मुसलमान मते आकृष्ट करायला मजलिस आहेच. तर शहरी विभागात चंचुप्रवेश करायला भाक्रांदने संसोपाला जवळ केले आहे. राजनारायण, रामसेवक यादव अनंतराम जयस्वाल आदि संसोपा (हे सर्व संसोपा-प्रसोपा एकत्रिकरणांतून तयार झालेल्या समाजवादी पक्षांतून फुटून पुनः संसोपा झेंड्याखाली जमा झाले आहेत !) नेत्यांचे वजन काही काही भागातून चांगले आहे...

## लखनौच्या कॉफी हाऊसमध्ये ...

भाक्रांदच्या विजयाचे हे गणित मांडले जात असले तरी तशी शक्यता मला स्वतःला कमी दिसते. काही ग्रामीण भागात व जाट जमातीत श्री. चरणसिंगाची लोकप्रीयता आजही असली तरी सत्तारूढ व संघटना काँग्रेसनेही त्याच जातीजमातींना आवाहन करून उभे केलेले उमेदवार भाक्रांदची मते खाल्ल्याशिवाय राहणार नाहीत. मुस्लिम मजलिसच्या बाबतीतही तोच प्रकार आहे. डॉ. फरिदींचे नेतृत्त्व जरी कितीही कणखर असले तरी मुस्लिम लीगचा शह त्यांना बसल्याशिवाय राहाणार नाहीच. त्याचप्रमाणे सत्तारूढ काँग्रेस आणि संघटना काँग्रेस ह्या दोघांनीही मुस्लिम बहुसंख्य असलेल्या मतदारसंघातून मुसलमानच उमेदवार उभे केले आहेत हे ही इथे लक्षात घेतले पाहिजे. संसोपा प्रभावाची कथाही यापेक्षा वेगळी नाही. समाजवादी पक्षाची पुनः ताजी फाटाफूट होताना सर्वच जुनी मंडळी संसोपात परत आलेली नाहीत. किमान नऊ माजी संसोपा आमदार आज काँग्रेसमध्ये आहेत. ह्यातले तीन टी. एन्. सिंग मंत्रिमंडळातही

होते. समाजवादी पक्षाचे उमेदवारही आजच्या संसोपा उमेदवारा-विरुद्ध आहेतच ! त्रिपक्ष युतीची पक्षनिहाय अवस्था थोडक्यात ही अशी आहे. ह्याखेरीज ह्या पक्षाच्या दृष्टिने अस्वस्थ करणारा मुद्दा म्हणजे, शहरी भागातून श्री. चरणसिंगांची प्रतिमा बरीच डागाळली आहे. विशेषत: त्रिपाठी मंत्रिमंडळ बनण्यापूर्वी व नंतर ते कोसळल्यावर, त्यांनी इंदिरा काँग्रेसशी हातमिळवणी करून मुख्यमंत्री व्हायचे जे प्रयत्न केले त्यामुळे लोक त्यांच्यावर नाराज आहेत ! काँग्रेसचा वारसा सांगणाऱ्या ह्या पक्षाला देखील दुहीचा शाप आहे तो वेगळाच ! ह्या सार्‍यांची गोळाबेरीज केली तर साधारणत: ७०-७५ जागा ह्या पक्षानी जिंकल्या तर खूप असं मला म्हणावेसे वाटते ! जाट-स्थानची निर्मिती हे प्रलोभन जाट मंडळीना भाक्रांदच्या तर्चस्वाखाली ठेवण्यासाठी-भाक्रांदनी दाखवले असले तरी त्रिपक्ष युतीत ह्या प्रश्नावर मतभेद आहेत...

कानपूरला चरणसिंगांना भेटल्यावर आणि मीरत आदी ठिकाणांना भेटी दिल्यावर मी पुन्हा लखनौला परतलो. हॉटेलवर पोचताना जनसंघाचे 'सायकल-दल' हिंडताना दिसले. सत्तारूढ काँग्रेसचीं जीप पथके आहेत. संघियांनी सायकल पथके उभी केली आहेत. प्रत्येक मतदाराशी प्रत्यक्ष संपर्क, छोटया छोटया कॉर्नर-मीटिंग्ज ह्याच्यावर जनसंघाचा भर आहे. 'मतदारांचा सध्याचा 'मूड' बघता जनसंघाला निर्विवाद बहुमत मिळायला हरकत नाही. पण शेवटी निवडणुकीतले यशापयश अवलंबून असते, सुमारे १० टक्के असलेल्या फ्लोटिंग व्होटवर. Jan-Sangh laeks resources necessary to mobilise this Vote, and there whcre Jan Sangha looses ground Congress R.' लखनौच्याच कॉफी हाऊसमध्ये राजनाथ सिंग ह्या पक्षीय पत्रकाराने केलेली ही निवडणूक मीमांसा ! तर जनसंघाच्या प्रांतिक ऑफीसमध्ये श्री. सुब्रह्मण्यम स्वामी मला म्हणाले, '.. आमच्याकडे साधने कमी आहेत हे नक्कीच. पण निष्ठावान कार्यकर्त्यांचा ताफा, तरुणांचा-विद्यार्थ्यांचा-शिक्षकांचा जनसंघाकडे वळलेला ओघ आणि जनतेतून आम्ही गोळा केलेला पैसा ह्यांच्या बळावर आम्ही नक्कीच किमान २५० जागा मिळवू ह्याची मला खात्री वाटते. तिन्ही काँग्रेस (सत्तारूढ व संघटना काँग्रेस व एके काळच्या काँग्रेसवाल्यांनीच स्वार्थी दृष्टिकोनातून बनवलेली भाक्रांद ही तिसरी काँग्रेस !) व त्यांचे पुंजीपती मित्र ह्यांनी ओतलेल्या पैशाविरुद्ध आमचे काम, आमचे निष्ठावान कार्यकर्ते ह्यातून जनता योग्य ती निवड करील ह्याची मला खात्री आहे...'

### जनसंघाच्या दोन घोषणा


जनसंघ कुणाशीही समझौते वगैरे न करता स्वतःच्या बळावर ४०० उमेदवार लढवीत आहे. इतराप्रमाणेच त्यांनीही जनतेला आर्थिक सामाजिक प्रश्नावर मोठाली आश्वासने दिली आहेत. उत्तर प्रदेश निवडणुकात उर्दूसाठी आग्रह न करता तिला विरोध दर्शविणारा जनसंघ हाच एकमात्र पक्ष आहे. संघटना काँग्रेस किंवा भाक्रांद हे दोन्ही पक्ष अनुक्रमे श्री. सी. बी. गुप्ता आणि श्री. चरणसिंग ह्यांच्या व्यक्तिगत सामर्थ्यामुळे महत्त्वाचे गट गणले जातात. संसोपा, मजलिस ह्यांचीही तीच गत आहे. जनसंघामागे मात्र शिस्तबद्ध पक्षीय संघटना आहे... जनसंघाने इतर सर्व पक्षांच्या मानाने फार मोठाली आश्वासने दिली आहेत, भरीव आर्थिक कार्यक्रमाचा देखावा उभा केला आहे. ह्या सर्वात 'दरमाणशी महिन्याला १२ किलो धान्य व तेही केवळ ८५ पैसे किलो भावात' व 'शेतकऱ्याला गव्हाला किमान १०५ रु. क्विंटल हा भाव' ह्या दोन जनसंघाच्या महत्त्वाच्या घोषणा आहेत. किलोला '१·०५ पैसे शेतकऱ्याला देऊन गहू विकणार मात्र ८५ पैशांना, हे गणित काही मला उमगत नाही ?'

माझ्या ह्या प्रश्नावर श्री. स्वामी म्हणाले, 'सरकारी मदत (Subsidy) देऊन ही तूट आम्ही भरून काढू. खुद्द शेतकरी वर्गाला किंवा अगदी ग्रामीण भागातही हा धान्यपुरवठ्याचा प्रश्नच येत नाही. ते स्वतःच्याच उत्पादनावर स्वतःची गरज भागवू शकतात. प्रश्न येतो तो शहरी विभागांचा अशी Subsidy देऊन तूट (दर किलोमागे २० पैसे दराने) भरून काढताना साधारणत: पन्नास कोटींचा ज्यादा खर्च शासनाला येईल. उत्तर प्रदेश सरकारचे सालीना बजेट ८०० कोटी रुपयांचे असते. ह्यातले किमान २०० कोटी रुपये 'Miscallinious' ह्या नावाने खर्च होतात. प्रशासन सुधारून काटकसर करून ह्या दोनशांतले ५० कोटी मिळवणे आम्हाला शक्य आहे. ते आम्ही मिळवूच; व जनतेला ८५ पैसे दराने गहू पुरवूच ! ! शेतकऱ्यालाही १०५ रु. प्रति क्विंटल भाव मिळणार असल्याने एकाधिकार खरेदीचा आग्रह न धरताही गहू सरकारी खरेदी योजनेतच जमा होईल. आमची ही दोन्ही आश्वासने निव्वळ निवडणूक स्टंट नसून त्यामागे अर्थशास्त्रीय आधार आहे ! ! ...

जनसंघाच्या ह्या स्पष्टीकरणावर सर्वांचेच मतभेद होतील. पण तरीही एक गोष्ट मात्र निश्चित आहे. जनसंघाच्या, '८५ पैसे किलो गहू' ह्या घोषणेने जनमानसावर भरपूर परिणाम केला आहे. ह्या संदर्भात द्रमुक नेते 'कै. अण्णादुराई ह्यांची मला आठवण येते. १९६७ च्या निवडणुकांत' १ रुपया किलो तांदूळ' हीच घोषणा चालवून त्यांनी काँग्रेसला, कामराजना मद्रासेतून उखडून लावले होते ! जनसंघाची दुसरी महत्त्वपूर्ण घोषणा म्हणजे, 'कर कमी करण्याची ! 'सध्याच्या परिस्थितीत कर कमी करण्याची घोषणा हास्यास्पद वाटण्याची शक्यता आहे. पण ती अगदी योग्य आहे. कर कमी केले तर करबुडवेपणाही कमी होतो, व त्यातून प्रत्यक्ष महसूली उत्पन्न वाढते. एक साधे उदाहरण मी देतो. लखनऊ पालिकेत जनसंघ अधिकारावर येण्यापूर्वी सायकल कर वर्षाला ३॥ रुपये होता. तो बुडविणारे अनेक होते. त्याच्या वसूलीसाठी करण्यात येणाऱ्या योजनांचा खर्च प्रत्यक्ष करापासून येणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त होता. जनसंघाने हा कर वार्षिक एक रुपया आणला. आश्चर्य हे की कर कमी करताच, सायकल करापासूनचा महसूल अक्षरश: तिपटीने वाढला. हाच अनुभव जनसंघाच्या दिल्ली प्रशासनालाही आला आहे...

जनसंघाचे निवडणूक गणित प्रामुख्याने तरुणांच्या मतावर आणि लीग मजलिस उमेदवारांवर अवलंबून आहे. १९६९ मध्ये, 'संविद' कोसळल्यावर जनसंघाला फार मोठ्या लोकक्षोभाला तोंड द्यावे लागले. १९७१ च्या इंदिरा लाटेच्या वेळीही जनसंघ धुतला गेला तरी देखील एकंदरीत जनसंघाला २० टक्के मतदान झाले. निर्विवाद बहुमतासाठी ३५ टक्के मतदान संघाला होणे, आजच्या बहुकोणीय संघर्षाच्या परिस्थितीत अवश्य आहे. सुमारे ३० ते ३५ टक्के मतदार युवक वर्गातले आहे. जनसंघाच्या चळवळी, विद्यार्थी

पृष्ठ २८ वर



# शहादे तळोदे आघाडीवरील
# नवी आगेकूच

आजम निजम हा कुरंगीचा रहिवासी, त्याचे शेत खेतिया (म. प्र.) ची एक बाई करीत असे. तीन-चार वर्षे तीच उत्पन्न खात होती. शेत आजमच्या नावावर होते. मी नेहमीप्रमाणे कुरंगीला गेलो. आजमने हकिकत सांगितली. तो म्हणाला, 'शेतात दादर आहे. बाई मला घेऊ देत नाही. मला दम देते, की तुला मध्य-प्रदेशच्या पोलिसांकडून तुरुंगात टाकीन. कोण मला अडवतो ते पहाते. मी म्हणजे अर्धे सरकार आहे.' मी आजमला सांगितले, 'तिला पोलिसांना आणू दे. शेत तुझ्या नावावर आहे. तू घाबरू नकोस.'

दुसरे दिवशी मी श्रीखेड येथे बसलो होतो. तोच आजम निजम धावत आला. तो म्हणाला 'बाई ऐकत नाही. तीन मजूर लावून दादर कापायला सुरुवात केली आहे. आपण ताबडतोब चला.' श्रीखेडच्या २–३ माणसांना घेऊन मी निघालो. शेतात गेलो. मी बाईला सांगितले, 'बाई तू दादर कापू नकोस. जमीन आजम निजमच्या नावावर आहे, तुझा काही अधिकार नाही.' बाई संतापली. माझे पैसे माझे पैसे म्हणून बोंबलत सुटली. मी मजुरांना सांगितले, 'तुम्ही दादर कापू नका. दादर आजमची आहे. त्याच्या परवानगीशिवाय कापली तर फजिती होईल.' मजुरांना ते पटले. त्यांनी काम थांबवले.

मग बाई खेतियास जाऊन ४–६ लोक व खेतियाच्या एका पुढाऱ्याला घेऊन आली. मी तिला विचारले, 'बाई खेत कुणाच्या नावावर आहे?' 'आजम निजमच्या'– ती म्हणाली. 'मग तू दादर का घेतेस?' 'माझे त्याच्याकडे पैसे आहेत' 'ठीक आपण दोन-तीन वर्षाच्या उत्पन्नाचा विचार करू व तुझे पैसे फिटले का ते पाहू.' मी म्हणालो.

तरी बाई काही ऐकेना. मग मी तिला अखेरचे सांगितले, 'बाई खाते उताऱ्यात तुमच्या पैशांचा कोठेच उल्लेख नाही. शेत आजम निजमच्या ताब्यात आहे. तेव्हा मी काय करायचे ते आताच शहाद्यास जाऊन करतो. तू काय करायचे ते ठरव.' एवढे बोलून मी निघालो. बाई घाबरली व तिने मला परत बोलावले. ती म्हणाली, 'समझोता करू. मी अर्धे पैसे माफ करते व खेत त्याला देऊन टाकते.' मी म्हणालो, 'तुला एक फद्या देखील मिळणार नाही. उलट चोरी केली म्हणून तुरुंगात टाकतो थांब!' शेवटी बाई काकुळतीला आली व म्हणाली, 'बाबा माझी चूक झाली, पण मला बाकी काही नको, थोडीशी तरी दादर द्या.' मग आजम निजम तयार झाला. व मग बाईने सर्वांना चहा पाजला व प्रश्न सुटला.

### श्रीखेड

त्या शिवारातील जमिनीचे मूळ मालक बाबाजी विकला, देवाजी विकला व वेलजी विकला हे होते. त्यांच्या आईने त्यांची समजूत घालून तिचा एक भाचा सुपा लुडचा याला थोडीशी म्हणजे तीन एकर जमीन दिली. नंतर सुपा लुडचा ह्याने सावकारी पद्धत वापरायला सुरुवात केली व बाबाजी विकला व देवजी विकला ह्यांची जमीन बळकावून टाकली. आज फक्त वेलजीच्याच नावावर जमीन होती. फक्त घोटाळा असा होता की, जमिनीच्या 'ड' पत्रकात अशी नोंद होती की बाबाजी विकलाला फॉरेस्ट जमीन दिली आहे. आणि म्हणून बाबाजी विकलाने स्वखुशीने सुपा लुडचाला जमीन दिली आहे. प्रत्यक्षात ह्याच्याकडून फसवून बळजबरीने जमीन घेतलेली होती. ही हकीकत ग्रामस्वराज्य समितीला समजल्यावर समितीमार्फत संबंधित अधिकाऱ्याकडे अर्ज गेले. मग देवाजी विकलाचे जाबजबाब झाले.

सुपा लुडचाला हे समजले. तो भडकला. त्याने दम द्यायला सुरुवात केली, 'बघतो कोण जमिनी सोडवून घेतो ते. एकेकाला ठोकून काढीन. अंगाची सालडी काढीन, खून करून टाकीन. अरे मी सावकार आहे, शहाद्याला पैसे पेरीन तर खून करून सुद्धा मोकळा फिरेन.' पण आता गरीब आदिवासी धीट झाला आहे. त्यांची एकजूट आहे. ते म्हणाले, 'तू सावकार असलास तर घरचा. ह्याच्या अंगाला हात तर लावून बघ. तुला बघतोच.'

### तळवे

तळोदे तालुक्यात तळवे नावाचे गाव आहे. या गावात सावित्रीबाई किडघा नावाची आदिवासी स्त्री राहते. तिच्या वडिलांची जमीन वारसाहक्काप्रमाणे तिच्या

पुंजऱ्या अमावास्या नावाच्या भावाला आणि सावित्रीबाई व आणखी तिच्या दोन बहिणींना मिळाली. तशी नोंद सरकारी हक्कपत्रात केली आहे. तळोदे तालुक्यात प्रतापपूर नावाचे गाव आहे. तळवे गावापासून तीन मैलावर प्रतापपूरला रहाणाऱ्या उखा काशीराम या जमीनदाराने पुंजऱ्या आमावस्याच्या भोळेपणाचा गैरफायदा घेऊन ह्या जमिनीचा त्याला मोबदला करायला लावला. मोबदला करताना तिन्ही बहिणींना काहीही कळवले नाही. पुंजऱ्या आमावस्याला मोबदल्यात जी दुसरी जमीन मिळायला हवी होती तीही मिळाली नाही! पुंजऱ्या मेल्यावर सावित्रीबाईने जमीन मिळावी म्हणून अनेक अर्ज केले. उपयोग झाला नाही. दोन वर्षापूर्वी पन्नास बायांना घेऊन तिने स्वतःच्या जमिनीत जाण्याचा प्रयत्न केला. उखा काशीरामने इतर जमीनदारांना बरोबर घेऊन बायांना मारहाण केली. सरकारी दवाखान्यात त्यांच्यावर उपचार केले गेले. उखा काशीरामने उलट सावित्रीबाईवरच फौजदारी केली. तारखांवर तारखा लागल्या. अखेर सावित्रीबाई या छळातून सुटली. परंतु जमीन काही मिळाली नाही. प्रांतसाहेब, तहसिलदारसाहेब यांच्याकडे अर्ज केले. प्रांत, तहसिलदारसाहेब यांनी जबाब घेतले. कितीवेळा खेपा घातल्या त्याची गणतीच नाही. सावित्रीबाईचा नवरा चक्कीवर कष्ट करून कसाबसा संसार करतो. तलाठ्यापासून कोर्टकचेरीमधील लोकांपर्यंत सगळ्यांनी लाच घेऊन त्याला लुबाडले. खोटी आश्वासने मिळत पण अजूनही बिचारी सावित्री जमीन मिळावी म्हणून वणवणत आहे! केवढी निषिद्ध फसवणूक आहे ही! शासकीय अधिकाऱ्यांची दिरंगाई गरिबाला नाडताना कशी मगरूर होते पहा. जमीन हरवून बसलेल्या माणसाला जमीन परत मिळण्याचा ध्यास कसा लागतो, त्याच्या मनाला किती त्रास होतो, याची पुसटशी जाणीवदेखील रोम्या डोक्याच्या व निर्दय हृदयाच्या शासनाला नसते हेच सिद्ध होते!

मोबदल्याच्या व्यवहारात पैशांची देवाणघेवाण होत नसल्याने ज्यावेळी व्यवहार होतो त्यावेळी मामलेदारापुढे व्यवहार करणाऱ्या दोन्ही बाजूंच्या लोकांना हजर केले जाते. मामलेदार विचारतो, 'पैसे घेतलेस का?'

## गोंडाळे

नवीन शर्तीची जमीन तशीच ठेवून काही आदिवासी सावकारांनी आपल्या किंवा आपल्या नातेवाइकांच्या नावावर दुसऱ्या गरीब आदिवासींच्या जमिनी तलाठी, सर्कल यांना पैसे चारून व दारू पाजून करून घेतल्या. यामध्ये आपल्या दडपणाखाली राहणाऱ्या आदिवासींच्या नावावर जमिनी करून त्यांच्यावर तावा ठेवून उत्पन्न खाण्याचे पुण्यकर्म करणारे बड्या जमीनदारांतले महाभाग कमी नाहीत. या प्रकारात खूप विनोदी तऱ्हा दिसतात. कुणी कुणाचा नातेवाईक असो किंवा नसो, तो तसा आहे असे सरळ सरळ खोटे लिहून त्याच्या नावावर जमीन केली जाते. मग हक्कपत्रात नोंद होते ती मजेशीर असते. रखेली आदिवासी असेल तर ती कुणाची मुलगी आहे असे दर्शवून जमीन घेतली जाते.

स्वतःची पत्नी जिवंत असलेला गोंडाळे गावी राहणाऱ्या मोती खंडू नावाचा इसम चमारी कुत्र्या नावाच्या बाईला चोळी लुगडे म्हणून खुशीने आपली जमीन देऊन टाकतो! कारण कुत्र्या पावरा हा करडे गावात राहणारा चमारीचा नवरा त्या भागातला 'दादा' असतो. तो तलाठ्याला दारू पाजतो. त्याला आंगठी बक्षीस देतो. मोती खंडूला दम भरून त्याचा अंगठा घेतो आणि बायकोच्या नावावर केलेली जमीन स्वतःच्या कब्जात ठेवतो. मोती खंडू मेल्यावर त्याची विधवा पत्नी नबीबाई भ्रतार मोती अर्ज करते. तिचा जबाब घेतला जातो. कलेक्टरकडे अशा केसेस पाठवून वर्ष वर्ष निघून जाते, पण जमीन 'दादा' लोकच कसत असतात.

या सगळ्या प्रकारांनी व्यवहार करण्यात आदिवासींचे खूपच हाल केले जातात. दमदाटी, 'बंदुकीने फुंकून टाकू'च्या धमक्या, शिवीगाळ, कोंडून मारठोक, बेफामपणे आणलेल्या पोलीस-गाड्यांचा वचक! किती म्हणून सांगावे! आजारी असताना, बेसावध असताना, दारू पाजून नशेत असताना, भयंकर छळामुळे अर्धमेला झालेला असताना त्यांच्याकडून अंगठे घेतले जातात. ते घेण्याचे ठिकाण मामलेदार कचेरीच असते असे नाही. ते कधी जमीनदाराचे घर असेल, आदिवासीचे घर असेल, पटवारी–सर्कल इन्स्पेक्टरचे घर असेल, एखादे हॉटेल असेल किंवा झाडाखालची जागा असेल. आंगठा घेताना कशावर आंगठा देतोय हे वाचून दाखवले जात नाही. वारसाहक्काप्रमाणे अधिकार असलेल्या सर्वांना न कळवता कच्चा माणूस पकडून आंगठा घेऊन परस्पर व्यवहार केला जातो. खुद्द कलेक्टरची परवानगी लागत असतानाही तहसिलदार किंवा खूप वेळा सर्कल वा तलाठीही मंजुरी देऊन टाकतात व व्यवहार पक्के होतात!

## उमरी

आदिवासी बड्या जमीनदाराने आदिवासीला मोबदला करावा म्हणून खरे म्हणजे हजारोंची रक्कम देण्याचे कबूल केलेले असते. १००–२०० रुपये दिलेलेही असतात. आंगठा दिल्यावर इतर पैसे द्यायचे ठरलेले असते. आंगठा देऊन आदिवासी बाहेर पडतो तेव्हा त्याच्या तोंडाला पाने पुसली जातात! बडा जमीनदार जमीन हडप करतो. हात वर करतो. रोख पैसे नंतर कधीच दिले जात नाहीत. पूर्वीचे कधीतरी घेतलेले धान्य चक्रवाढ व्याजाने फुगवायचे. इतके की, 'तूच माझे देणे लागतोस. पैसे वगैरे आता काही मिळणार नाहीत' असे सांगितले जाते. बोलल्याप्रमाणे जादा जमीन देणे, विहीर खणून देणे, बँकेची व सोसायटीची सर्व कर्जे फेडणे हे काहीच केले जात नाही. कर्जफेडीच्या नोटीसा आदिवासीला लागतच राहतात. मोबदल्यात मिळालेल्या (जर नशीबाने मिळालीच तर!) हलक्या जमिनीतून निकृष्ट पीक घेऊन फसवलेले जीवन जगण्याचा हताश प्रयत्न आदिवासी करीत राहतो. मोबदल्याच्या व्यवहारात जमीन कमी कशी दिली जाते पाहा–

उमरी गावचा अभिसिंग फुलसिंग स्वतःची १३ एकर १० गुंठे जमीन मोबदल्यात मोयदे गावच्या संभू रामजी पाटलाला देण्यास तयार नसतो. संभू रामजी अभिसिंगला १७ एकर जमीन देण्याचे सांगून नाखूश अभिसिंगला गुलवतो. रामू स्वतःच प्रांताकडे मोबदल्यास परवानगी मिळावी म्हणून अभिसिंगच्या तर्फे अर्ज करतो. प्रांत परवानगी नाकारतो. संभू कलेक्टरकडे अपील करतो. कलेक्टर निकाल देतो–अभिसिंगची १३ एकर १० गुंठे जमीन संभू रामजीने घेऊन त्याची सलवाडी शिवारातील १७ एकर १० गुंठे

जमीन अभिसिंगला तो देईल. कलेक्टरने दिलेल्या निकालानुसार मोबदल्याचा व्यवहार पक्का होतो. अभिसिंगला किती जमीन प्रत्यक्षात मिळते? १० एकर. संभू किती जमीन हडप करतो? तेरा एकर दहा गुंठे! सतरा ऐवजी १० एकर जमीन मिळालेला अभिसिंग चकीत होतो. पण त्याला केवळ चकीत होता येणेच शक्य असते. न्याय मिळणे कसे जमणार? केलेल्या अर्जाची रीतसर चौकशी करून संभू रामजीला शासन का होत नाही? अभिसिंगला कलेक्टरच्या निकालाप्रमाणे साधा न्याय का मिळत नाही? कारण लबाडी करणाऱ्या संभूचे सरकार आहे. आदिवासी अभिसिंगचे ते नाही.

अशा फसवून घेतल्या गेलेल्या जमिनी आदिवासी किसानांना परत मिळवून देण्यासाठी शहाद्याच्या ग्राम स्वराज्य समिती व श्रमिक संघटना या संस्थांनी पुन्हा आंदोलनाचा नवा पवित्रा घेतलेला आहे. गावोगाव सभा घेऊन या आंदोलनाची पूर्वतयारी प्रथम केली गेली. शेवटची सभा तळव्याला (ता. तळोदे) दहा फेब्रुवारीला झाली व या सभेच्या शेवटी आंदोलन सुरू झाल्याचे जाहीर करण्यात आले. या सभेत वाटण्यात आलेले पत्रक असे आहे–

---

## तळोदे तालुक्यातील गरीब शेतकरी भावांनो !
## उठा आणि न्याय मिळवा

श्रीमंत शेतकरी-सावकार यांनी फसवून हडप केलेल्या आपल्या जमिनी परत मिळविण्यासाठी, आपल्यावर अन्याय करणाऱ्या कायद्याचा भंग करून जमिनीतल्या उत्पन्नाचा व जमिनीचा शांततेने ताबा घ्या. मालदारांनी मारहाण केली तरी शांततेने सहन करा,

### ही कायदेभंगाची चळवळ शांततेने करा

सरकारपर्यंत आवाज पोचवून अन्यायकारक कायदा बदलून सरकारने आपल्या जमिनी परत द्याव्यात या हेतूने शेवटचा उपाय म्हणून ही कायदेभंगाची चळवळ आपण करायची आहे.

शांतता पाळा ! जमिनी ताब्यात घ्या !
श्रमिकांच्या एकजुटीचा विजय असो !

श्री. अंबरसींग सुरतवंती
ग्रामस्वराज्य समिती, शहादा

श्री कुमार शिराळकर, इंदास निकुंभ
श्रमिक संघटना, शहादा-तळोदा

---

आणि बारा फेब्रुवारीला पहिली तार आली–

Peaceful. No activist arrested.

तेरा फेब्रुवारीला दुसरी तार आली–

Total 73 arrested. 28 women taken to shahada court. DSP, Collector, 6 P. S. I. still peaceful.

तसे शहाद्या-तळोद्यात गेली दोन वर्षे सतत काही न काहीतरी घडतच आहे. कार्यकर्ते मुळापर्यंत पोहोचले आहेत. पास-सहा केंद्रे– उपकेंद्रे या दोन तालुक्यातून आतापर्यंत निर्माण झालेली आहेत. शेकडो गोरगरीब आपापल्या तक्रारी घेऊन या केंद्रावर येत असतात. यातून गावकरी आणि कार्यकर्ते यांच्यात दैनंदिन विश्वासाचे, सहकार्याचे वातावरण निर्माण होत राहते. मग वर्षातून एकद–दुसरे शिबिर होते. यात ठिकठिकाणच्या कामांचे एकसूत्रीकरण, नवीन कार्यकर्त्यांची जडणघडण, पुढचा व्यापक कार्यक्रम इत्यादी बाबींवर निर्णय घेतले जातात. असे हे आंदोलन भुईतून झाड दर यावे, वाढत राहावे तसे वाढते आहे, त्याला वेळच्यावेळी हवे तेवढे खतपाणी, सूर्यप्रकाश मिळत आहे. तरीपण तेथे सध्या काय काम चालू आहे, याची कल्पना सर्वांना अधूनमधून तरी यावी. म्हणून वर हा सगळा विषय पुन्हा एकदा सांगितला. आंदोलन पूर्वीचेच–भूमुक्तीचे. पहिल्यांदा अगदी कागदोपत्री सुद्धा ज्या जमिनी आदिवासींच्या होत्या पण ज्या सावकारांनी गैरमार्गाने लाटल्या होत्या, त्या परत मिळवण्याचा कार्यक्रम ठरला. तो पार पडला. जवळजवळ तीनचार हजार एकर जमीन अशी परत मिळाली. आता पुढचा टप्पा, कागद सावकरांच्या नावचे असले तरी प्रत्यक्षात फसवाफसवी, लाचलुचपत, दमदाटी, मारहाण करून हे कागदपत्र बनवले गेले आहेत. तेव्हा या कागदपत्रांची प्रतिष्ठा तरी किती समजायची, जपायची हा एक प्रश्नच आहे– सर्वांनी यावर विचार केला पाहिजे. हा विचार होईल तेव्हा होईल, सरकारला जाग येईल तेव्हा येईल. तोवर आपल्या शहाद्या-तळोद्यातील गरीब आदिवासी मित्रांनी हे कागदपत्र भिरकावून देण्यासाठी चळवळ सुरूही करून टाकलेली आहे. ही यशस्वी होणार यात शंकाच नाही. कारण कागदी न्याय कुणाच्याही बाजूचा असला तरी सामाजिक न्याय हा या गरीब मित्रांच्या बाजूचा आहे.

# सोल्झेनित्सिन

## लेखन स्वातंत्र्यासाठी निर्भय झुंज

वा. दा. रानडे

लोकोमोटिव्ह एंजिनिअर इनोशिन यांच्या घरावर रशियन गुप्त पोलिसांनी छापा घातला. इनोशिन यांचे छोटे अर्भक नुकतेच मरण पावले होते. खोलीत त्याच्या शवपेटीपाशी ते उभे होते. पोलिसांनी शवपेटिकेतून मुलाचे शव बाहेर फेकून देऊन ती तपासली. घरातल्या आजारी माणसांना त्यांनी बिछान्यावरून हलवून तपास केला. एवढेच नव्हे तर जखमांना बांधलेले बँडेज उलगडून त्यात काही दडविले आहे काय हेही पाहिले.

पौर्वात्य भाषातज्ज्ञ नेव्हस्की यास अटक करून पोलिसांनी त्याच्याजवळची तांगुई लिपीतील हस्तलिखिते जप्त केली. या लिपीचा अर्थ लावल्याबद्दल पंचवीस वर्षांनी नेव्हस्कीला लेनिन पारितोषिक मरणोत्तर देण्यात आले.

नोव्हेचेरकास्क येथील एन. के. व्ही. डी. (गुप्त पोलीस) कचेरीत १९३७ साली एक स्त्री आली. तिच्या शेजारणीला अटक झाली होती व लहान मूल दुधासाठी तडफडत होते. त्या मुलाची काय व्यवस्था, असे तिने विचारले. अधिकारी म्हणाले, 'बसा, सांगतो.' दोन तास ती तेथे बसून होती नंतर अधिकाऱ्यांनी तिलाच कोठडीत डांबले.

तुला जगायचे आहे? जी. पी. यू. चे (गुप्त पोलीस) आवारातून तुला बाहेर यावे न लागता येथल्या येथे तुला गोळी घालून ठार करायला श्रम पडणार नाहीत हे तुला माहीत आहे? पण तुझ्यासाठी व आमच्यासाठी तू एक नाटक केले पाहिजे. अट एकच. आम्ही सांगतो तसे शेवटपर्यंत वागायचे, समाजवादी समाजाच्या हितासाठी खटला चाललाच पाहिजे.

स्टालिनच्या काळातील बनावट राजकीय खटले अशा पद्धतीने उभे करण्यात आले.

दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या फौजांनी केलेली लेनिनग्राडची नाकेबंदी फोडून बाहेर निसटण्याचा प्रयत्न रशियाच्या सेकंड शॉक आर्मीचे सेनानी लासॉव्ह यांनी ७ जानेवारी १९४२ ला सुरू केला. फेब्रुवारीत ते जर्मन हद्दीत ७५ किलो मीटरपर्यंत आत घुसले होते पण वरिष्ठ सेनानींकडून त्यांना सैन्य व दारूगोळा यापैकी कोणत्याच रुपाने कुमक मिळाली नाही. लासॉव्हची सेना ज्या भागातून कूच करीत होती तो सारा दलदलीचा प्रदेश एप्रिलच्या पुढे चिखलमय झाला. रस्ते नाहीत. हवाई कुमक नाही, अन्न नाही. अशी या सेनेची अवस्था झाली होती. तरीही तिला माघार घेण्यास परवानगी नाकारण्यात आली होती. अशा असहाय्य स्थितीत ही सेना नष्ट झाली.

जंगलातून व दलदलीतून भटकत लासॉव्ह ६ जुलैला सिव्हरस्काया भागात जर्मनांना शरण गेला. पूर्व प्रशियातील लेझेनजवळच्या जर्मन अधिकाऱ्यांकडे त्याला नेण्यात आले. तेथे त्याच्याप्रमाणे अनेक रशियन सेनानींना आणले होते. लासॉव्ह त्यांचा नेता झाला. एप्रिल १९४५ च्या अखेरीस प्रागजवळ त्याने अडीच डिव्हिजन सेना उभारली. प्राग शहर शत्रूच्या हाती चांगल्या स्थितीत लागू नये म्हणून ते उध्वस्त करण्याची तयारी जनरल स्टेनर करीत होता. लासॉव्हने आपल्या फौजांना चेक बंडखोरांच्या मदतीस जाण्याचा हुकूम दिला. जर्मनांच्या कैदेत तीन वर्षे रहावे लागल्याने या हल्ल्यात जर्मनांविरुद्ध त्यांचा सारा त्वेष व क्रोध उफाळून आला. अनपेक्षित दिशेकडून हल्ला करून त्यांनी जर्मनांना प्रागबाहेर पिटाळले.

प्राग शहर कोणत्या रशियनांनी वाचविले हे सर्व चेक नागरिकांना तरी माहित आहे का? आपला इतिहासही या बाबतीत विकृत आहे. रशियन फौजांनी प्राग वाचविले असा दावा त्यात केला आहे पण रशियन फौजा तेथे वेळेवर पोचणे शक्य नव्हते.

हे उतारे आहेत 'गुलाग आर्चिपेलागो' या पुस्तकातील. स्टालिनच्या काळातील अमानुष दडपशाहीचे हे विदारक चित्र रेखाटणारे रशियातील नोबल परितोषिक विक्रेते साहित्यिक अलेक्झांडर सोल्झेनित्सिन यांना रशियन राज्यकर्त्यांनी नुकतेच हद्दपार केले. 'गुलाग आर्चिपेलागो' हे कैद्यांच्या छावणीतील जीवनावरचे पुस्तक आहे. छोटया बेटांचा समूह किंवा पुंजका असावा तशा गुलागजवळ या छावण्या होत्या. तेथे एका वेळी एक कोटीवर कैदी असत व त्यापैकी निम्मे राजकीय कैदी असत. सोल्झेनित्सिन गेली वीस वर्षे या कैद्यांच्या छळासंबंधी माहिती गोळा करीत होते, तुरुंगातील स्वत:चा अनुभव आणि २२७ कैद्यांनी सांगितलेल्या अनुभवांवर हे पुस्तक आधारलेले आहे. खोटया गोष्टी लिहून सोल्झेनित्सिन रशियन राजवटीची बदनामी करीत आहेत असा आरोप या पुस्तकावर रशियन सत्ताधाऱ्यांनी केला पण यातील माहिती खोटी असल्याचे सिद्ध करा, असे आव्हान सोल्झेनित्सिन यांनी त्यांना दिले आहे.

सोल्झेनित्सिन यांनी रिदिफर्स्ट सर्कल कॅन्सर वॉर्ड, वन डे इन दिलाइफ ऑफ आयव्हॅन डेनेसोव्हिच आणि दि लव्ह गर्ल अँड दि इनोसंट हे नाटक अशी इतर पुस्तके लिहिली आहेत. यापैकी 'वन डे इन दि लाइफ ऑफ आयव्हॅन डेनिसोव्हिच' या पुस्तकाचा रशियाचे माजी पंतप्रधान क्रुश्चोव्ह यांनी गौरव केला होता. राज्यकर्त्यांनी दडविलेल्या गोष्टी उघडकीस आणून जगापुढे सत्य ठेवणे हा सोल्झेनित्सिन यांचा उद्देश आहे.

रशियन विचारवंतांचा लेखन स्वातंत्र्यासाठी चाललेला झगडा हा रशियन समाजवादात लोकशाही आणण्याच्या व्यापक लढ्याचा भाग आहे. रशियन क्रांतीला ५६ वर्षे उलटून गेल्यानंतरही दडपशाहीच्या मार्गाचा अवलंब तेथील सत्ताधाऱ्यांना अजून करावासा वाटतो. यावरून तेथील लोकशाहीचा लढा किती खडतर आहे याची कल्पना येईल.

हा लढा कशा पद्धतीने चालवावा, पाश्चात्य राष्ट्रांची मदत त्यासाठी कितपत घ्यावी याबद्दल रशियन विचारवंतांतच मतभेद निर्माण झाले आहेत. पाश्चात्य राष्ट्रांची मदत घेण्याकडे सोल्झेनित्सिज आणि रशियन हैड्रोजन बाँबचे निर्माते साकारोव्ह यांचा कल आहे तर इतिहासकार रॉय मेडव्हेडेव्ह यांना हा लढा आपला आपणच लढला पाहिजे असे वाटते. पाश्चात्य राष्ट्रे या बाबतीत फारसे काही करायला तयार नाहीत. कारण केवळ आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांच्या दृष्टीने ही राष्ट्रे रशियाशी सहकार्य करू इच्छितात. रशियाच्या अंतर्गत प्रश्नात ती लक्ष घालणार नाहीत.

हुकूमशाही, दहशत व दडपशाहीच्या तंत्राचा अवलंब करणे क्रांतीच्या सुरुवातीच्या काळात अपरिहार्य होते असे मानले तरी आता त्याची आवश्यकता नाही. समाजवादात लोकशाही आणण्याचे दृष्टीने आता निश्चित पावले टाकली गेली पाहिजेत. जागतिक समाजवादी चळवळीत हे तत्व स्वीकारले जाण्यासाठी जगातील डाव्या व समाजवादी पक्षांनीच एकत्र येऊन आग्रह धरला पाहिजे.

## कथा कथाकाराची

# गाय डी मोपासा

सौ. सुमती देवस्थळे

अगदीं सहज शिळोप्याच्या गप्पा माराव्यात तसा मोपाँसा खुसखुशीत गोष्टी लिहू लागला. हलकीफुलकी कथा, नर्मविनोदी शैली, उपहास, उपरोध यांचा भरपूर उपयोग, सामाजिक भोंदूपणावर निर्भयपणे केलेले हल्ले, हास्य आणि अश्रू यांचे अप्रतीम मिश्रण, समाजाच्या मर्मावर नेमका प्रकाशझोत....या सर्व वैशिष्टयांमुळे वाचकवर्ग मोपाँसाच्या कथेवर निहायत खूष होता. मोपाँसाच्या लिखाणात प्रसन्न सहजता होती. नॉर्मण्डीतील झाडे जशी भरपूर सफरचंदांनी लगडलेली असतात तशा प्रकारे मोपाँसाच्या मनात अनेक कथाबीजे वहरत होती. वाचक गुंग झाले होते....

मानवी स्वभावात किती चमत्कारिक विसंगती एकत्र नांदत असतात ! गाय-डी-मोपाँसा हा फ्रेंच साहित्यिक हा अशा विलक्षण विसंगतींचे नेमके उदाहरण आहे. जितका प्रसन्न तितकाच उदास, जितका प्रकृतीने सुदृढ तितकाच मनाने दुर्बळ, जितका मातृभक्त तितकाच स्त्रीद्वेष्टा, जितका बुद्धिमान तितकाच वेडा झालेला असा हा फ्रेंच कलावंत अनेकांच्या कुतूहलाचा विषय होणे अगदी स्वाभाविकच आहे. मोपाँसाचे सर्व साहित्य, विशेषतः लघुकथा चिरनूतन आहेत. लघुकथेच्या क्षेत्रात त्याने एक नवे पर्वच सुरू केले. लघुकथा या साहित्यप्रकारावर मोपाँसाने जे विलक्षण प्रभुत्व मिळविले, त्यामुळे तो एमिल झोलांच्या तोडीचा कलावंत ठरला, वैभवाच्या शिखरावर पोहोचला. मोपाँसाच्या जीवनाची अखेर मात्र अत्यंत करुणास्पद झाली. त्याच्या सुंदर कथांइतकीच त्याची स्वतःची जीवन कथाही वाचकांना खिळवून टाकणारी आहे.

मोपाँसाचा जन्म खानदानी घराण्यात झाला. त्याचे आजोबा तंबाखूचे मोठे व्यापारी होते. त्या व्यापारात त्यांनी भरतूर मालमत्ता कमावली. गुस्टेव्ह हा त्याचा मुलगा ‘ बडे बापके बेटे ’ अशा प्रकारचा होता. ख्यालीखुशालीत रहायचे, सारे छंदफंद करायचे आणि त्यातून वेळ उरलाच तर थोडेफार पेंटिंग करायचे असे त्याचे आयुष्य चाललेले होते. त्याला मित्रमैत्रिणी भरपूर. पैकी अल्फ्रेड पाँटेविन् (Alfred Poittevin) आणि त्याची बहीण लॉरा पाँटेविन् यांच्याशी घनिष्ट मैत्री होती. पाँटेविन् बहीणभावंडे अत्यंत बुद्धिमान, संवेदनाशील, रसिक, विद्वत्तेची आवड असलेली होती. त्यांच्या स्वभावात अतिरेकीपणा होता, मनस्वीपणा होता. गुस्टेव्ह डी मोपाँसाने लॉराशी लग्न केले, आणि आपली बहीण लुइसा हिचे अल्फ्रेडशी लग्न लावून टाकले. अशा रीतीने मोपाँसा बंधुभगिनी आणि पाँटेविन बंधुभगिनी यांचे आपसात नाते तयार होऊन दोन्ही घराणी जोडली गेली. साटेलोटे हा प्रकार फ्रेंच मंडळींना नामंजूर असावा. १८४६ च्या नोव्हेंबरमध्ये रॉएन (Rouen) या गावी लॉरा व गुस्टेव्ह यांचा विवाह झाला.

लॉरा ही मोपाँसाची आई. ती विलक्षण बुद्धिमान होती. माहेरची खूप श्रीमंत होती. लग्नानंतर वडिलांकडून तिला भरपूर इस्टेट–(जमिनी) मिळाली होती. लॉरा दिसायला सुस्वरूप होती. तिचे आपल्या भावावर अति प्रेम. अल्फ्रेड साहित्य व तत्त्वज्ञानाचा अभ्यासक होता. लॉरानेही लहानपणापासून तत्त्वज्ञानाचा व साहित्याचा अभ्यास करायला सुरुवात केली. तिची बुद्धी कुशाग्र असल्यामुळे लहानवयातसुद्धा ती शेक्सपिअर-इंग्लिशमधून वाचू शकत असे. वृत्तीने ती निर्भर-निर्भय, स्वतंत्र अशी होती. वेषभूषेतही ती स्वतंत्र असे. सायकलवर बसत असे – सिगारेट ओढण्यात तिला संकोच वाटत नसे. ती एकंदर मनस्वी, अन् थोडीशी तऱ्हेवाईक होती.

लोकांना तिच्याविषयी कुतूहल वाटत असे. लग्नाच्या वेळी ती २५ वर्षांची होती; गुस्टेव्हचे वयही तेवढेच होते. लॉराबरोबर 'हुंडा' म्हणून भरपूर संपत्ती, जमिनी घरात आलेल्या होत्या. गुस्टेव्हला मिळालेल्या वडिलार्जित संपत्तीहूनही जास्त संपत्तीची ती मालकीण होती. एकंदर संसार सुखाचा होता. लग्न झाल्यावर जिवाभावाचा अल्फ्रेड दुरावला ही गोष्ट तिला बेचैन करीत असे. दुर्दैवाने नंतर दोनच वर्षांनी अल्फ्रेड कालवश झाला. त्याचा मृत्यू ही मोपॉसा कुटुंबाला धक्का देणारी घटना होती. गुस्टेव्ह फ्लॉबर्ट ('मदाम बोव्हारीचा' लेखक) हा अल्फ्रेड व लॉराचा दोस्त. अल्फ्रेडच्या मृत्यूनंतर फ्लॉबर्टने लॉराला जी सान्त्वनपर पत्रे धाडलेली आहेत, त्यातून उत्कट मित्रप्रेम व लॉराविषयीची सद्भावना अगदी स्पष्ट दिसून येतात.

नॉर्मंडी येथे लॉरा व गुस्टेव्हचा संसार सुरू झाला. एका मोठ्या नॉर्मन् मॅन्शनमध्ये ते रहात. जवळच चर्च होते. त्या ठिकाणी ५ ऑगस्ट १८५० रोजी पहाटे गायचा जन्म झाला. त्याचे संपूर्ण नाव हेन्री-रेने-अल्बर्ट-गाय-डी-मोपॉसा असे होते. मुलगा अरूणोदयाच्या वेळी जन्मला. पहाटेनंतर सूर्य जसा आकाशात अधिकाधिक प्रकाशमान होत जातो, त्याचप्रमाणे हा मुलगाही मोठा होईल, त्यास उज्ज्वल भविष्य लाभेल अशी मोठ्या माणसांची श्रद्धा! असे सांगतात की गाय जन्मल्याबरोबर डॉक्टरांनी त्याचे डोके गुडघ्यात धरले, अन् कुंभाराने मडक्याला गोलवा द्यावा तसे हाताने गोल गोल चोळून छानपैकी आकार दिला. 'पहा तुमच्या मुलाचे डोके कसे सफरचंदासारखे केलेय् ते!' डॉक्टर म्हणाले, 'आता त्याची बुद्धी चांगली तल्लख होईल – खूप हुषार होईल तुमचा मुलगा!' डॉक्टरांचे हे शब्द लॉरा कधीच विसरली नाही, कारण त्याचे प्रत्यंतर तिला पुढे सारखे येतच होते.

मोपॉसा नॉर्मण्डीतील एका लहानश गावी रहात होता. घरची मोठी शेतीवाडी होती. त्यात इकडे तिकडे उनाडक्या करण्यात तो मग्न असे. निसर्गाच्या सांनिध्यात डोळसपणे सारे खेळ चालायचे. चाणाक्षपणे निसर्गाचे सारे विभ्रम तो टिपून घेत असे. जिज्ञासा फार. एकदा त्याने उंच वाढलेल्या गवतात काही खजबज ऐकली. तो आवाजाच्या रोखाने तिकडे गेला. पहातो, तर एका मांजराला सापाने विळखा घातला होता. सर्पदंशामुळे मांजराच्या अंगात वीष भिनले होते. मांजराची नुसती तडफड तडफड चालली होती. ते दृश्य गाय अगदी तटस्थपणे पहात होता. वास्तविक भलीमोठी काठी आणून, किंवा कुन्हाड आणून सापावर प्रहार करणे ही गोष्ट काही अशक्य नव्हती. परंतु मांजराच्या जीवघेण्या यातना पहाणे हा एक चित्तथरारक अनुभव होता. मंत्रमुग्ध होऊन गाय पहात उभा होता... अगदी मांजराचा प्राण जाईपर्यंत! कुतूहल इतके तीव्र, की मांजर मेल्यावर त्याची शेपटीसुद्धा ओढून पाहिली. जिज्ञासेने त्याला त्या दृश्याशी बांधून टाकले होते. तटस्थपणे निरीक्षण करीत उभे रहाणे, मांजराच्या सुटकेची खटपट न करणे ही गोष्ट क्रूरपणाची आहे हा विचारही गायच्या मनाला शिवला नाही.

लहानपणापासूनच गायची समजशक्ती तीव्र होती – लहान वयात नसावी इतकी समज त्याला होती. त्यामुळे आपल्या आईवडिलांचे परस्परांशी वागणे कसे आहे, हे त्याला स्पष्ट जाणवत असे. वडील चंगीभंगी आहेत – त्यांची बाहेर कुलंगडी आहेत, आईवर अन्याय होतो आहे, ही जाणीव त्याला वयाच्या ५ व्या वर्षापासून होती. त्या ५ वर्षांच्या पोराचा धाक! एकदा एका ठिकाणी पार्टीला जायचे होते. गायचा धाकटा भाऊ हार्वे हा आजारी असल्याने आई येणार नव्हती. गायच्या वडिलांना जाण्याची घाई! वडील अशी घाई का करीत आहेत याची गायला संदिग्ध कल्पना होतीच. वडील गायला घाई करू लागले तेव्हा तो म्हणाला, 'तुम्ही कशाला मला इतकी घाई करता? माझ्यापेक्षा तुम्हीच तिकडे जाण्यास उत्सुक आहात हे मला ठाऊक आहे?'

वडील चरकले, अन् म्हणाले, 'बरं बरं – चल, लवकर बुटाचे बंद बांध!'

'नाही बांधत – तुम्हीच बांधा!'

बाप अवाक्!

'अरेच्या! माझ्या बुटाचे बंद बांधा म्हणतो ना! तुम्ही बंद बांधल्याशिवाय मी येणार नाही – साफ सांगतो.'

बाप अवाक्... जरा वेळ वाट पाहून मुकाट्याने त्यांनी गायचे बंद बांधले, आणि बापलेक मार्गस्थ झाले.

वडिलांच्या बाहेरख्यालीपणाचा तात्काळ परिणाम असा झाला की आपली आई ही गायला सर्व सद्गुणांची पुतळी भासू लागली. ती बुद्धीमान आहे, सुंदर आहे, कर्तृत्ववान आहे, विद्वान आहे, धनवती आहे... त्या मानाने वडील क्षुद्र आहेत. आईची त्यांना किंमत नाही, फडतूस सुखाच्या (?) मागे ते धावतात – त्यापायी आपल्या सात्विक आईवर भयंकर अन्याय होतो असे गायला वाटत राही. अर्थात इतक्या स्पष्टपणे ते त्याला सांगता आले नसते, पण आपल्या घरात काहीतरी मूलभूत विसंगती आहे याची त्याला नेमकी जाणीव होती. त्याच्या मनोरचनेवर या बालवयातील जाणिवांचा कायम परिणाम झाला.

गाय जेमतेम ७–८ वर्षांचा होता तेव्हाची गोष्ट. सुटीचे दिवस... सुंदर सकाळ...कोवळे ऊन...गाय मोकळ्या रानातून एकटाच चालला होता. वाळलेली पाने पायाखाली चुरडून जाताना मजेदार आवाज होत होता. कोवळ्या पालवीशी गुजगोष्टी करीत, स्वारी अगदी मजेत चालली होती. इतक्यात थोड्याशा अंतरावर कोणीतरी असल्याचा त्याला भास झाला. जरा निरीक्षण करताच आपले आईवडीलच आहेत हे लक्षात आले. त्यांच्या मागून हळूच लपत छपत जावे, त्यांना आश्चर्यचकित करावे असा त्याच्या मनात विचार आला. तो आडून आडून पण भराभर चालू लागला. अगदी जवळ येताच त्याला आईवडिलांचे भांडण ऐकू आले; निरागस बालमन गोठून गेले. आईच्या माहेराहून मिळालेल्या जमिनी वडिलांना आपल्या नावावर करून हव्या होत्या. तसे कागदपत्र करून देण्यास आई तयार नव्हती, 'या जमिनी तुम्हाला कशासाठी हव्या आहेत ते मला ठाऊक आहे. व्यसनापायी उधळपट्टी करायला त्या जमिनी मी देणार नाही!' आईचा हा विरोध वडिलांना सहन झाला नाही. त्यांनी लॉरावर हात टाकला. तिला खाली पाडले, लाथाबुक्क्याचा मारा केला. गायला ते दृष्य बघवले नाही. सारी गात्रे बधीर झाली. पाय जडशीळ झाले. त्या प्रसंगावर लिहिलेल्या कथेत तो म्हणतो, त्या दिवसापासून साऱ्या गोष्टी मला अगदी वेगळ्याच दिसू लागल्या. प्रत्येक

दृष्याची विरुद्ध बाजू–वाईट बाजू तेवढीच मला दिसू लागली. त्या दिवसापासून शुद्ध, निरामय, सत् असे काहीसे मला दिसू शकले नाही !'...श्रद्धा उडाली ! बालमनावर असह्य आघात झाला.

गाय ११ वर्षांचा झाला. आईवडिलांनी विवाहाचे बंधन १५ वर्षे पाळले. पण त्यांच्यात समरसता मुळीच नव्हती–आता वितुष्टे विकोपाला गेली. एकत्र राहून सुखाचा बहाणा करणे कठीण झाले. उभा दिवस भांडणाने पेटून निघण्यापेक्षा घटस्फोट घ्यावा असे ठरले. तथापी मोपॉसा मंडळी प्रतिष्ठित होती. त्याकाळी थोरामोठ्यांच्या बायका असे कोर्टात जाऊन विवाहविच्छेद करीत नसत. घटस्फोटितेचा शिक्का मारून घेण्यापेक्षा संसारातच राहून कुचंबणा सहन करणे श्रेयस्कर समजत असत. लॉरा स्वतंत्र बुद्धीची होती. तिने मॅजिस्ट्रेटसमोर आपली बाजू मांडून कायदेशीर फारकत (Legal Separation) मिळविली. स्त्रीधन तिच्यापाशी राहिले. मुलेही तिच्या जवळच रहायची होती. त्यांच्यासाठी वडिलांनी ठराविक रक्कम द्यावी असे ठरले. वडील घरातून हद्दपार झाले. गायच्या मनात आईविषयी आदर, करुणा, प्रेम.. आणि वडिलांविषयी दुरावा–तिरस्कार होता... अगदी शेवटपर्यंत !

गायला प्रथम चर्चमधल्या जवळच्या शाळेत घातण्यात आले. शाळेत गणित, व्याकरण, लेखन, लॅटिन् भाषा असे विषय शिकवले जात. घरी आई निरनिराळ्या गोष्टी सांगत जाई. फ्रेंचमधून शेक्सपिअरची नाटके वाचून घेई. शाळा आपली यथातथाच होती. शिकण्यापेक्षा कोळ्यामाळ्यांच्या मुलात रमणे हाच गायचा मुख्य उद्योग चालायचा. त्याची प्रकृती निकोप, सुदृढ होती. वागणे लाघवी, डोळे बोलके, टपोरे...सगळ्यात मिळून मिसळून वागण्याची स्वयंसिद्ध कला...त्यामुळे गाय साऱ्या बाळगोपाळांचा म्होरक्या होई. त्याचे नेतृत्व सर्वजण मान्य करीत. गायचे दिवस मजेत चालले होते.

लवकरच गावातल्या शाळेतले शिक्षण पुरे झाले. पुढील शिक्षणासाठी आईपासून ताटातूट होण्याची वेळ आली. जवळच्या गावातील एका सेमिनरीत गायची रवानगी झाली. सेमिनरीमध्ये पारंपरिक धार्मिक शिक्षण व वाङ्मयाचा अभ्यास अशा शिक्षणक्रम होता. गायसाठी धार्मिक शाळा निवडण्यात खरे तर मोठीच चूक झाली होती. त्याचे मन त्या मलूल अध्यात्मिक वातावरणात रमणे शक्य नव्हते. सर्वत्र कडक, उग्र, अप्रसन्न वातावरण ! गायचा जीव गुदमरून जाई. धार्मिक वाचन अगदी नकोनकोसे होई. १६ व्या वर्षी एका धर्मगुरूची कुचेष्टा केल्याच्या आरोपावरून गायला शाळेतून काढून टाकले. त्याबद्दल त्याला कितपत वाईट वाटले असेल कोण जाणे ! उलट अध्यात्मिक परिभाषेच्या कचाट्यातून सुटल्याचा मुक्त आनंद झाला आणि आईजवळ रहाण्याची संधी मिळाली.

बाळपणापासून मोपांसाला खेळण्याची भारी हौस. पोहोणे, झाडावर चढणे, कुस्ती, घोडदौड, बोट-होड्या वल्हवणे. त्यात शर्यती लावणे असले उद्योग चालायचे. त्याची प्रकृती कणखर, आंगलट बलदंड, डोळे बोलके, गर्दन बैलासारखी भरदार...! गोरगरिबांची गावरान भाषा बोलताना त्याचा उच्चकुलीनपणा कधीही आड आला नाही. घरात आई अभिजात साहित्याची दीक्षा देत असे; भरपूर वाचन करण्यास मार्गदर्शन करीत असे. परिणामत: वयाच्या १४ व्या वर्षापासून गाय काव्यरचना करू लागला. बॉल्हेट (Bouilhet) या कवीशी त्याचा परिचय झाला आणि त्याच्या संगतीत गायच्या संस्कारक्षम मनावर उत्तम संस्कार झाले. गाय जेमतेम १९ वर्षांचा झाला तोच कविराज निधन पावले. तत्पूर्वी त्यांनी गायच्या मनात साहित्यनिर्मितीची व विशेषत: काव्यलेखनाची उत्कट इच्छा रुजवून ठेवली.

### लेखनाचा सूर सापडला

वयाच्या विसाव्या वर्षी कायद्याचा अभ्यास करण्यासाठी मोपॉसा पॅरिसला गेला. आता स्वत:च्या पायावर उभे राहूनच शिक्षण पदरात पाडून घ्यायचे होते. त्यासाठी त्याने सरकारी ऑफिसात (नेव्हल मिनिस्ट्रीमध्ये) कारकुनाची नोकरी पत्करली. विद्यार्जन आणि अर्थार्जन असा दुहेरी उपक्रम सुरू झाला. गायसारख्या कलंदर वृत्तीच्या माणसाला कारकुनीत ठाणबंद होणं ही गोष्ट असह्य होती. सरकारी ऑफिसातले ते परंपराग्रस्त मरगळलेले, बेरकी वातावरण, वरिष्ठांचा विनडोकपणा, बरोबरीचे केविलवाणे कारकून, एकंदर घटनाहीन गतिशून्य वातावरण त्याला आवडेना. जीव गुदमरून जाऊ लागला. काव्यरचनेची नस जागी होती. एवढाच काय तो दिलासा.

जाणत्या वयापासूनच मोपॉसाचा गुस्टेव्ह फ्लॉबर्टशी पत्रव्यवहार सुरू होता. फ्लॉबर्टच्या मानाने गाय म्हणजे कोवळा अननुभवी, साहित्यप्रेमी तरुण, प्रिय मित्राचा-अल्फ्रेडचा भाचा, लॉराचा–मैत्रिणीचा मुलगा. या साऱ्या गोष्टी जेमस धरता फ्लॉबर्टला गायविषयी खास आपुलकी वाटणे स्वाभाविक होते. गायही त्या साहित्यिकाच्या प्रेमास अनुरूप असाच होता. लेखनकला गायच्या रक्तातच होती. ती आनुवंशिक देणगी आईकडून लाभलेली होती. लॉराने काही साहित्य वगैरे लिहिलेले नाही, तथापी तिची जी पत्रे प्रसिद्ध झाली आहेत, त्यावरून तिचे लेखनकौशल्य सहज समजण्यासारखे आहे. गाय काव्यरचना करीत असे आणि दर रविवारी फ्लॉबर्टला आपले लिखाण दाखवीत असे.

फ्लॉबर्टकडे दर रविवारी साहित्यिकांची बैठक भरे. त्यात हा पोरगेलासा गाय उत्साहाने भाग घेई. काव्यरचनेची दीक्षा त्याला मिळालेलीच होती–आता सुजाण रसज्ञतेचे खतपाणी लाभले. काव्यनिर्मितीत जीव रमू लागला, साहित्यात रस वाटू लागला. कायद्याच्या रुक्ष अभ्यासावरून मन उडाले. गायला साहित्यातल्या बारीकसारीक खाचाखोचा शिकविण्यास फ्लॉबर्टने पद्धतशीरे सुरुवात केली. फ्लॉबर्टकडे अल्फान्सो डॉडेट, टर्जिनिव्ह, गॉन्कार्ट यासारखे खंदे लेखक जमत असत. त्यांच्या मनमोकळ्या चर्चेतून गायला अभावितपणे मार्गदर्शन होत राही. मग त्याने दर आठवड्याला कथा लिहिण्यास सुरुवात केली. लघुकथा हा वाङ्मयप्रकार त्यावेळी अत्यंत लोकप्रिय होता. झोला, डॉडेट यांच्या कथासंग्रहावर लोक अक्षरश: तुटून पडत होते. या साहित्यप्रान्तात नवेनवे प्रयोगही सुरू होते. मोपॉसाने कथालेखनास सुरुवात केली; आणि त्यात सूर सापडल्याबरोबर कायद्याचा अभ्यास सोडूनच दिला.

शिक्षण सोडण्यास आणखीही एक कारण झाले. जेमतेम अभ्यासाचा सूर लागतो न लागतो तोच प्रशियाशी युद्ध सुरू झाले. गाय सैन्यात दाखल झाला. गायला युद्ध आवडत नव्हते, तिटकाराच होता. पण केवळ नाइलाजाने त्याने सैन्यात प्रवेश केला होता. त्याच्या रेजिमेंटला शस्त्रपुरवठा न झाल्याने ते सतत पिछाडीवर राहिले. माघार घेण्यात मात्र त्याची तुकडी आघाडीवर होती. सैनिकी जीवनाचे

अगदी जवळून निरीक्षण करण्याची संधी मिळणे एवढाच या युद्धाचा मोपाँसाला फायदा झाला. युद्ध आटोपले आणि गायच्या आजोबांना तंबाखूच्या व्यापारात अनपेक्षित खोट आली. त्यामुळे मोपाँसाच्या वडिलांना घरबसल्या आजोबाकडून मिळणारा पैसा बंद झाला. परिणामी गायला वडिलांकडून मिळणारा पैसाही बंद झाला. पैशासाठी नोकरी केल्याशिवाय गत्यंतरच उरले नाही.

साहित्यिकांच्या सहवासात त्याला स्वतःच्या जीवनाचे खरेखुरे प्रयोजन सापडत गेले. रविवारी फ्लॉबर्टकडे तशीच गुरुवारी एमिल झोलाकडे साहित्यिकांची बैठक असे. दोन्ही बैठकींना गाय उपस्थित राही. फ्लॉबर्टकडे त्याची भूमिका स्वयंसेवक विद्यार्थ्यांची असे–उमेदवारी चालायची–पण झोलांकडे मात्र तो स्वतंत्र लेखक म्हणून वावरत असे. फ्लॉबर्टच्या प्रोत्साहनाने तो वर्तमानपत्रात स्फुटलेखन करू लागला.

गाय तरुण होता–पॅरिससारख्या मोहनगरीत रहात होता–घरात मोठ्या माणसांचे बंधनही नव्हते. विषयवासनांना चाळविणारी आकर्षणे सर्वत्र विखुरलेली होती. मोहापासून अलिप्त रहाणे जवळ जवळ अशक्य होते. गाय स्वभावतः गमत्या, विनोदी, प्रसन्न होता. नौकाविहार, पोहणे, पोरीबाळींची भयंकर थट्टामस्करी करणे हे नित्याचे. असा हा 'चंट' मुलगा आईला पत्र लिहिताना मात्र हळवा–शाळकरी पोरासारखा भावविवश बनून जाई. वयाच्या १६ व्या वर्षापासून त्याला स्त्रीमोहाची चटक लागली होती. ते एक सुखोपभोगाचे साधन एवढीच भावना! त्यात सात्त्विक किंवा निकोप असा भाव मुळीच नव्हता. सारी स्त्रीजात त्याला क्षुद्र वाटे. स्त्रियांविषयी तो उपहासाने बोलू लागला, की त्याची आई म्हणे, 'काय रे गाय...माझ्याबद्दल काय वाटते तुला? मीसुद्धा स्त्रीच आहे!'

'तसं नाही ग आई! तू काही इतर बायकांसारखी नाहीस. तू वेगळीच आहेस...अगदी वेगळीच आहेस!'

आई तेवढी श्रेष्ठ–वेगळी–आदरणीय–पूजनीय! इतर सर्व स्त्रिया म्हणजे उपभोग्य वस्तू. ही गोष्ट गायच्या मनावर पक्की ठसली. त्याचा हा दृष्टिकोन अर्थातच विकृत होता, चुकीचा होता. परंतु वस्तुस्थिती तशीच होती. त्या काळात फ्रान्समधील स्त्रीपुरुषांची एकंदर सामाजिक वागणूक विलक्षण सैल–विषयासक्त अशी असे. अनीतीचे प्रमाण भयंकर वाढलेले होते. त्याची थोडीशी झलक झोलांच्या Restless House मध्ये दिसते. इतक्या विषयांध समाजात गायचा दृष्टिकोन विकृत बनला तर आश्चर्य मानण्याचे काहीही कारण नाही.

वयाच्या सोळाव्या वर्षापासूनच गायच्या मनातला 'मधुकर' जागा झालेला होता. स्वैर वर्तणुकीपायी २५–२६ व्या वर्षी त्याला सिफिलिस्‌ची बाधा झाली. लक्षणे एकदम स्पष्ट झाली नाहीत, पण हळूहळू तो त्या रोगाची शिकार ठरला. शरीराबरोबर मन कमकुवत झाले. चमत्कारिक निराशा, औदासिन्य, व्यर्थता सर्वत्र भरून राहिल्यासारखे त्याला वाटत असे. त्याच्या आईच्या नर्व्हज् दुबळ्या होत्या–तोच मनोदौर्बल्याचा वारसा गायपर्यंत आला. त्यात आणखी या रोगाची भर. एरव्ही हसणारा, खिदळणारा मिस्किल तरणाबांड, या रोगामुळे बावरून गेला–एकाकी बनला. दशदिशा ओस झाल्यासारखे त्याला वाटे. त्याने आईला लिहिले, 'आई ग. अगदी विकल झालो आहे मी. इतका असहाय...इतका एकाकी...! माझा विलक्षण अधःपात झाला आहे. संध्याकाळी तर ही एकलेपणाची आग अगदी असह्य होते...जीवन किती कंटाळवाणे...किती भयप्रद आहे म्हणून सांगू!'

## पंचवीस वर्षाच्या तरुणाचे हे उद्‌गार!

आणि त्याची आई त्याला पत्रोत्तरात लिहीत होती... 'गाय, मी अगदी निःशक्त होऊन गेले आहे रे! मला काऽही सहन होत नाही. पार शक्तिपात झाला आहे...काय करू?'

आई कमकुवत, उदास, अशक्त, असुखी.. अन् मुलाचीही स्थिती तीच! मात्र या तीव्र औदासिन्याचे खरे कारण मोपाँसाने मानले नाही. तो स्वतःची थोडीफार फसवणूकच करीत राहिला. सरकारी कचेरीमधील फडतुस कारकुनीमुळेच आपल्याला वैताग आला आहे, हुरूप वाटत नाही, आपण काही काम करू शकत नाही, मन पार वांझोटे बनले आहे, सारे अर्थशून्य वाटत आहे अशी त्याने स्वतःची समजूत करून घेतली.

स्वतःपासून लपवलेला रोग डॉक्टरांपाशी लपवता आला नाही. मनाचे ओढाळ जनावर ठाणबंद न केल्यापायी अनर्थ घडलेला होता. फ्लॅबर्टच्या कानावर या गोष्टी गेल्या. फ्लॅबर्ट म्हणजे मोपाँसावर वडिलांसारखी माया करणारा–त्याला दुःख वाटले. त्याने मोपाँसाला चार शहाणपणाच्या, समजुतीच्या गोष्टी सांगितल्या.ज्याला आयुष्यात काही विशेष करून दाखवायचे आहे, त्याने मोहाच्या जाळ्यात गुंतून पडणे इष्ट नाही हे वडिलांच्या वात्सल्याने सांगितले. मोपाँसासारखा रुबाबदार, सुंदर, बलदंड, प्रतिभासंपन्न तरुण स्त्रीमोहापायी फुकट जावा हे फ्लॉबर्टला बरे वाटेना. पण मोपाँसाने आपली जीवितपद्धती काही बदलली नाही. आपल्या मनात जी असीम उदासी साकळलेली आहे त्याचे कारण सिफिलिससारखा रोग नसून सरकारी ऑफिसातली कारकुनी आहे अशीच त्याने स्वतःची समजूत करून घेतली. सतत आकडेमोडीने डोके फिरून जाते, ही त्याची तक्रार. झोला व फ्लॉबर्टच्या घरच्या साहित्यिक चर्चा त्याला जगवीत होत्या. त्यावेळी झोलांचा 'Naturalism' फार जोरात होता. मोपाँसाने मात्र कोणत्याही विचारप्रणालीचे कंकण बांधले नाही. स्वतंत्र राहिला. कवितेत रमून गेला. १८३० मध्ये–वयाच्या तिसाव्या वर्षी त्याने आपला पहिला (आणि अखेरचा) कवितासंग्रह प्रसिद्ध केला. अत्यंत भक्तिभावाने त्याने ते पुस्तक फ्लॉबर्टला–आपल्या वाङ्‌मयीन पित्याला–अर्पण केले. मेण्डेस, झोला, डॉडेट, फ्लॉबर्ट, टर्जिनिव्ह इ. सर्व ज्येष्ठ साहित्यिकांनी त्याच्या काव्यसंग्रहाचे स्वागत केले. पहिल्याच महिन्यात ३ आवृत्त्या काढाव्या लागल्या. झोलांच्या गटातील लोकांना वाटले की, मोपाँसाची प्रतिभा मुख्यतः काव्यासच अनुरूप आहे. आता तो स्फुटे, कथा वगैरे लिहीत होता. असला उपद्व्याप त्याने करू नये असा अनाहूत सल्ला आला 'काही झाले तरी तुम्ही गद्य लिहीत जाऊ नका बुवा!'–या झोलांच्या सूचनेकडे मोपाँसाने पाठ फिरविली. फ्लॉबर्टचे प्रोत्साहन महत्त्वाचे धरले. Gil Blas, Society Chronical आणि Figaro या वर्तमानपत्रातून त्याने लिखाण करण्यास सुरुवात केली.

साहित्यातील Naturalism चे झोला अध्वर्यु! Naturalismला पोषक असे उत्तम प्रात्यक्षिक रसिकांच्या नजरेपुढे ठेवण्याच्या उद्देशाने

झोलांनी एक प्रातिनिधिक कथासंग्रह प्रकाशित करण्याचे ठरविले... Soirees de Medan हे त्या कथासंग्रहाचे नाव. हे ग्रंथकर्तृत्व एकट्या आपल्याकडे न घेता नव्या पिढीतील नवोदित कलावंतांनीही त्यात कथालेखन करावे अशी झोलांची इच्छा होती. गुरुवारच्या बैठकीस हजर रहाणाऱ्यांच्या लिखाणातून कथांची निवड केली गेली. त्यात मोपाँसाची Ball of Fat ही सुप्रसिद्ध कथा निवडली गेली. ही दीर्घकथा हृदयाचा सरळ सरळ ठाव घेणारी–अत्यंत वेधक होती. त्या कथेमुळे मोपाँसाला खूप प्रसिद्धी मिळाली–आत्मप्रत्यय आला, आत्मविश्वास वाटला. साहित्यावर आपली उपजीविका होऊ शकेल अशी खात्री वाटली. मग आणखी विचारांची पिंजण करीत न बसता त्याने नोकरीचा राजीनामा देऊन टाकला. त्याने आर्थिक स्थैर्याचा विचार न करता अशा रीतीने साहित्याच्या बेभरवशाच्या क्षेत्रात स्वतःला झोकून देऊ नये असा व्यवहारी सल्ला पुष्कळांनी दिला– अगदी झोलांनीसुद्धा ! पण मोपाँसाला त्याच्या प्रतिभेने इतके जबरदस्त आश्वासन दिले होते की, त्याला असले व्यवहारी उपदेश मुळीच मानवले नाहीत. नोकरीची अवघड बेडी निखळल्यावर या कलंदर कलावंताचा स्वच्छंद विहार सुरू झाला. निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून स्फुटलेखन करायला गायने सुरुवात केली. लहानमोठे चुटके, आख्यायिका यांवर आकर्षक लघुकथांचा साज चढू लागला. त्याच्या आत्मविष्काराला लघुकथेचा बाज अगदी जमून गेला. अगदी सहज शिळोप्याच्या गप्पा माराव्यात तसा मोपाँसा खुसखुशीत लिहू लागला. हलकीफुलकी कथा, नर्म विनोदी शैली, उपहास, उपरोध यांचा भरपूर उपयोग, सामाजिक भोंदूपणावर निर्भयपणे केलेले हल्ले, हास्य आणि अश्रू यांचे अप्रतीम मिश्रण, समाजाच्या मर्मावर नेमका प्रकाशझोत...या सर्व वैशिष्टयांमुळे वाचकवर्ग मोपाँसाच्या कथेवर निहायत खूश होता. मोपाँसाच्या लिखाणात प्रसन्न सहजता होती. नॉर्मंडीतील झाडे जशी भरपूर सफरचंदांनी लगडलेली असतात तशा प्रकारे मोपाँसाच्या मनात अनेक कथाबीजे वहरत होती. कथा सांगत होता–वाचक गुंग झाले होते.

### कादंबरीलेखनाकडे

दोन वर्षे उलटली. थोडीशी विश्रांती घेण्यासाठी तो नदीकिनाऱ्यावर वसलेल्या सर्टोव्हिल गावात गेला. आराम करण्याच्या उद्देशाने आला होता खरा, पण तेथे सारी अनुकूलता असूनही मोपाँसाला बरे वाटेना. रोग बळावत होता, अंतर्बाह्य शरिराचा ताबा घेत होता. डोके अतिशय दुखत राही. मेंदूत असह्य कळा येत. ठोके पडत असत. मेंदूतल्या कळा थांबविण्यासाठी तो ईथर हुंगत असे, ती सवयच जडून गेली. तो कॉर्सिकाची सफर करून, नेपोलियनच्या गावाला, अजॅशिओला जाऊन आला. तेथील रहिवाशांनी या लाडक्या फ्रेंच लेखकाचे भव्य स्वागत केले. मोपाँसाला मात्र स्वतःच्या रोगाची काळजी होती. तशातही त्याने त्याने La Maison Tiller हा कथासंग्रह प्रसिद्ध केला. (१८८१) प्रकाशक काही हे पुस्तक छापायला तयार नव्हता, कारण त्यातल्या कथा फार चावट, अश्लील आहेत असा आरोप ! झोलांनी आग्रह धरल्यामुळेच कथासंग्रह प्रसिद्ध होऊ शकला. हा कथासंग्रह खूप लोकप्रिय झाला खरा परंतु सर्वसामान्य वाचकांना तो काही निर्दोष वाटला नाही. लेखकाची विकृती चटकन जाणवावी इतकी स्पष्ट होती.

मोपाँसाला स्वच्छ प्रखर सूर्यप्रकाशाची फार आवड. त्या वातावरणात प्रकृती व मन प्रसन्न राहील अशी आशा. खेरीज नवे नवे अनुभव घेऊन आपली प्रतिभासृष्टी समृद्ध करण्याची इच्छाही होतीच. हे सारे साधण्यासाठी तो अफ्रिकेतील अल्जीरियात गेला. तो मुलूख फ्रेंचांच्याच ताब्यात होता. अगदी वेगळ्या वातावरणातील लोकजीवन समजावून घेण्याचा त्याचा मुख्य हेतू. आफ्रिकेच्या सफरीविषयी बोलताना तो म्हणे, तेथले वाळवंट, पिरॅमिडस, फिनिक्स पक्षाची प्रतिमा. इ. वैशिष्टये कोणाच्याही नजरेसमोर कल्पनासृष्टीत उभी राहू शकतील. पण तिकडचा सर्वसामान्य न्हावी कसा दिसतो याची प्रतिमा काही कोणाच्या मनावर उमटणार नाही. मला तर असे वाटते की केवळ न्हाव्याच्या प्रतिमेपेक्षासुद्धा त्याच्या डोक्यात काय चालले आहे ते पहाणे अधिक अर्थपूर्ण असणार !' अल्जीरियातील फ्रेंच लष्करात त्याला खूप लोकप्रियता मिळाली. एका ओअॅसिसमधून दुसऱ्या ओअॅसिसमध्ये भटकण्यात तो रमून जात असे. तिकडे मायदेशात figcro मधून या उमलत्या कलावंतावर खूप स्तुतिसुमने वाहिली जात होती. वर्तमानपत्रातून स्फुटे किंवा छोटया छोटया गोष्टी लिहिण्यापेक्षा त्याने कादंबरी लिहावी, सर्वशक्तीपणाला लावून अभिजात वाङ्मय लिहावे असा आग्रह होत होता. आईची देखील तशीच इच्छा होती. झोलांचा आग्रह होता. त्याला स्वतःलाही आपल्या प्रतिभेची ताकद समजली होती. परत येताच आपले लिखाण रशियन भाषेत भाषांतरित होत असल्याची गोड बातमी आली. तेव्हा या सर्व उत्साहवर्धक तपशिलाच्या बळावर त्याने कादंबरी लिखाणास सुरुवात केली. 'UneVie' ही गायची कादंबरी हप्त्याहप्त्याने प्रसिद्ध होऊ लागली. शैलीवर फ्लॉबर्टची छटा होती. कथासूत्र फारसे रेखीव नव्हते. आपल्या आईच्या जीवनातल्या प्रसंगाचे चित्रण होते. एकंदर पुस्तक चित्तवेधक होते खास !

पुस्तक जरी उत्कृष्ट होते, तरी ते सेन्सॉरला काही पटले नाही. विकृत वाटले, 'कुटुंबात वाचण्यास अयोग्य' असा शेरा आला. रेल्वे स्टेशनवरील पुस्तकाच्या दुकानात ते पुस्तक ठेवण्यास बंदी झाली. असल्या दडपशाहीमुळे पुस्तकाविषयी कुतूहल वाढते. जास्त लोक ते वाचण्याची धडपड करतात ही गोष्ट काही सेन्सॉरबोर्डाच्या लक्षात आली नाही.

¤

Une Vie या कादंबरीमुळे मोपाँसा साहित्याच्या क्षेत्रात सुप्रतिष्ठित झाला. टॉलस्टॉयला ही कादंबरी अतिशय आवडली. ला मिझरेबलनंतर फ्रेंचमध्ये लिहिली गेलेली सर्वश्रेष्ठ कादंबरी असे टॉलस्टॉयने Une Vie चे वर्णन केले. फ्रान्समधील सर्वश्रेष्ठ १० कादंबऱ्यात या पुस्तकाचे स्थान आहे असे चिकित्सक टीकाकारसुद्धा मानतात. यानंतर मोपाँसाला लिखाणावर भरपूर मानधन मिळू लागले. मग त्याने जीवनाचे रहाणीमान बदलले. 'बदनाम' वस्तीतली जागा सोडून प्रशस्त जागा घेतली. घराजवळून रेल्वेचा फाटा गेलेला होता. घर सुंदर होते, पण त्यात घरधनीण नव्हती. उपऱ्या स्त्रिया असंख्य होत्या. जवळ जवळ ६० स्त्रियांशी झालेला पत्रव्यवहार प्रसिद्ध झालेलाच आहे. मोपाँसा बेछूट जीवन जगत होता. स्त्रियांना काही भावभावना असतात हे त्याला मान्य नव्हते, त्यांची तो मोजदादही ठेवीत नव्हता. आई थोर, सारे सौंदर्य, मांगल्य

पावित्र्य तिच्या ठिकाणी केंद्रित झालेले. बाकी सर्व स्त्रिया म्हणजे उपभोग्य वस्तू अशी त्याची धारणा. विशेषतः विवाहित स्त्रीच्या नवऱ्याचा प्रतिस्पर्धी बनण्यात त्याला मोठे आव्हान वाटत असे. कोणाला तरी डिवचायचे, खिजवायचे, चिडवायचे, पुढ्यातला घास व्रात्यपणे हिसकावून घ्यायचा असला सारा प्रकार होता. प्रेम आणि विवाह या दोन कल्पना एकरूप असणे शक्य नाही अशी त्याची धारणा होती. लैंगिक आकर्षणातून काही भावनांची गुंतागुंत अनुस्युत असते हे त्याला मान्य नव्हते. त्याच्या कथातूनही हाच दृष्टिकोन आहे. साधेसुधे सरळ वैवाहिक जीवन सुखी, तृप्त असणे शक्य कोटीतले आहे असे त्याला वाटतच नसे. त्यामुळे मोपाँसा आपल्या कथातून असमाधान, अतृप्ती, तडफड, विफलता यांच्याच तारा छेडीत राहिला.

## कलंदर, बेफाट, बेफिकीर

वयाच्या ३४ व्या वर्षी त्याने एट्रिअॅटमध्ये स्वतःचे घर बांधले. फ्रँकॉसिस हा नोकर ठेवला. हा फ्रँकॉसिस मोपाँसाला अतिशय आवडत असे. तो नोकर नव्हे, तर मित्रच बनून गेला. मोपाँसाच्या मृत्यूनंतर त्याने धन्याच्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत. दिवसेंदिवस मोपाँसाची प्रतिभा प्रतिष्ठित पुरंध्रीसारखी आत्मविश्वासाने वावरू लागली. The Necklace ही जगप्रसिद्ध कथा याच सुमारास लिहिली गेली. कथेची सुरुवात व शेवट चमकदार असे. मोपाँसा आता अगदी ऐन रंगात आला होता. विलक्षण वेगाने तो लिखाण करीत होता. त्याच्या मेंदूची शक्ती एकदम इतकी प्रदीप्त होणे हाही एक रोगाचाच अविष्कार होता. बुद्धी खूपच प्रदीप्त झाली. १८८३–८४ मध्ये मोपाँसा सारखे लिहीत होता. त्याच्या कथाबीजात लैंगिक विकृतीच्या असंख्य खुणा दिसत, अस्वस्थता दिसे. लिखाणातून उरलेल्या वेळात तो मित्रांसमवेत पोहोणे, बोटिंग करणे आणि इतर छंदीफंदीपणा करणे यात मग्न असे. कोणत्याही एका स्त्रीत गुंतून पडायचे नाही हा त्याचा निश्चय. एकादी भावडी पोर प्रेमाचे जाळे पसरतेसे दिसले की लगेच तो तिला सफाईने तोडून टाकीत असे. गायला वाचनाचा छंद मुळीच नव्हता. त्याच्याकडे पुस्तके बरीच असत, पण ती सारी मित्रांकरिता. प्रत्यक्ष जगूनच तो जीवन समजावून घेई, त्यासाठी शब्दाच्या माध्यमावर अवलंबून रहाणे त्याला पटत नव्हते. मोठा कलंदर, बेफाट, बेफिकीकर असा होता गाय दि मोपाँसा. खूप लिहायचे, पोहायचे, बोटीतून लांब लांब सफरी करायच्या, नाटके वगैरे पहायची, मजा करायची असा त्याचा एकंदर जीवनक्रम होता. तो प्रकृतीने निकोप, रुबाबदार होता. लिखाणामुळे प्रसिद्धी मिळालेली, आणि खेरीज अविवाहित ! त्यामुळे अनेक स्त्रिया त्याच्या संगतीची अपेक्षा धरीत असत. त्याला आलेली शेकडो प्रेमपत्रे पहाता स्त्रियादेखील त्याची छेड काढत होत्या, अशी उदाहरणे सापडतील. त्याकाळातली फ्रान्समधील सामाजिक नीतिमत्ता रसातळाला गेलेली होती. अनेक स्त्रिया अनुनय करीत, त्यांना फटकारून टाकता टाकता तो बेजार होत असे. प्रसिद्धीच्या शिखरावर असणाऱ्या पुरुषांच्या मागे असली कटकट लागावी ही दुर्दैवाचीच गोष्ट आहे. त्यातून एखादा, धीरोदत्त, निकोप मनोवृत्तीचा पुरुष सहीसलामत सुटणार नाही असे नाही, पण ती गोष्ट अवघड, निदान फ्रान्समध्येतरी त्यावेळी अवघड !

१८८४ मध्ये मोपाँसाने Bel Ami ही कादंबरी लिहिली. वर्तमानपत्रातील वातावरण त्यांत रंगविले होते. पॅरिसमधल्या पत्रकारांच्या जीवनातील व्यक्तिगत उल्लेख होते; उपमर्द होता; प्रतिष्ठितांच्या टोप्या उडविल्या होत्या Bel Ami ही मोपाँसांची सर्वांत लोकप्रिय ठरलेली कादंबरी. पुढील वर्षी गायने इटालीत सफर केली. व्हेनिस, सिसिली इ. ठिकाणास भेटी दिल्या. सफर चालू असता वर्तमानपत्रांसाठी प्रवासवर्णन लिहिण्याचा उपक्रम चालूच होता. त्याबरोबरच आणखी एक कादंबरी लिहिण्यासाठी त्याने सुरुवात केली. पुढील वर्षी मोपाँसाने लंडनची सफर केली. बरोबर ब्लांची रूझेवल्ट ही अमेरिकन सुंदरी होती. ब्लाछी सौंदर्याची मूस म्हणून प्रसिद्ध होती. अतिशय संवेदनाशील लेखिका अशीही तिची प्रसिद्धी होती. मोपाँसाचे कायमचे साहचर्य लाभावे ही तिची अपेक्षा ! पण गायला लग्नाचा खोडा नकोच होता. मेरी बँशक्रिट्सेफ या रशियन् पोरीचीही मोपाँसापायी अगदी दशा दशा झाली होती. तिचा गायवर जीव जडलेला होता. खूप सुंदर सुंदर पत्रें लिहायची ती. ती लेखिका होती, उत्तम पेंटिंग करीत असे. आणि दिसायला लोभस होती. तिला मोपाँसा हवा होता तो सर्वस्वी तिचा म्हणूनच. प्राणपणाने उत्कट प्रेम करायचे होते. गायला त्या उत्कटतेची नस कधी समजलीच नाही.

## मानसिक विकृतीचा शोध

मोपाँसाचे कथालेखन वेगाने सुरु होते. त्यात वेडया, दुबळ्या, विकृत, तऱ्हेवाईक मनाची स्पंदने स्पष्ट जाणवतात. Lo Horla ही कथा अतिशय गाजली. अनातोल फ्रान्सला ती इतकी आवडली कीं त्याने मोपाँसाला " दि प्रिन्स ऑफ स्टोरी टेलर्स " अशी कितावत बहाल करून टाकली. वाचकाला अगदी खिळवून टाकणारी ही कथा मोपाँसाच्या मानसिक प्रकृतीशी अगदी मिळती जुळती होती. (वेडाच्या भरात नायक प्रेयसीचे घर पेटवून देतो... दुष्ट शक्तींचा वास आहे या कल्पनेने घर पेटवतो ही कथा वस्तू ) याच सुमारास मोपाँसाचा चार्कॉट् या मानसशास्त्रज्ञाशी परिचय झाला. हिप्नॉटिझमच्या सहाय्याने चार्कॉट् मनोविकृती ओळखीत असे व त्यावर मानसशास्त्रीय उपाययोजना करीत असे, त्या अनुषंगाने त्याचे प्रयोग चालत.या मानसशास्त्रज्ञाशी मानसिक विकृतींबद्दल तो चर्चा करीत असे दुभंगलेले व्यक्तिमत्त्व, वेड, हिस्टेरिया, फोबिया, न्यूरॉसिस् इ. अनेक मनोविकृतींचे अविष्कार, त्यांची कारणे, इ. विषयांची शास्त्रीय चर्चा चालत असे– MAD FEAR, NIGHTMARE या कथा मनोविकृतींवरच आधारलेल्या असून अत्यंत प्रभावी आहेत. त्या कथा इतक्या प्रत्ययकारी होण्याचे कारण, त्यातच मोपाँसाला स्वतःच्या मनोविकृतीचा सूर सापडला असावा– अर्थात नेणिवेच्या स्तरावर !

गायची आई हिस्टेरिक् होती. मामाही तसाच होता आणि दुर्दैवाची गोष्ट म्हणजे पाठचा भाऊ हार्वे हा तर ठार वेडा होता. हार्वेला लहानपणापासूनच डोके कमी होते– जवळ जवळ अर्धवटच होता तो– सैन्यात भरती केला होता– नंतर घरीच तो बागकाम करीत असे. तेवढाच त्याला छंद. तो पाहून गायने त्याला एक नर्सरी काढून दिली खुल्या जीवाचा छंद पुरविला. गरिबाच्या मुलीशी लग्न लावून दिले– पुढे हार्वेला एक मुलगीही झाली. ( हीच पुढे गायची वारसदार ठरली ) तथापी हार्वेचे डोके वयाबरोबर बिघडतच गेले. आणि अखेर त्याला ठार वेड लागले. गाय स्वतःच भावाला वेडयाच्या इस्पितळात टाकून आला. तो प्रसंग अत्यंत हृदयद्रावक

होता. गायच्या संवेदनाशील मनावर तीव्र परिणाम झाला. १० वर्षापूर्वीपासून सिफिलिस्... आई, मामा यांच्या मानसिक शक्तीपाताची जाणीव... आणि भावाचे वेड ही जीवघेणी शोकांतिका ! चार्कॉट्शी केलेली मानसशास्त्रीय चर्चा– मानसिक विकृतींचे विश्लेषण– स्वतःच्या अशक्तपणा– डोळ्याला उजेड सहन न होणे– सौम्य पॅरॅलिसिस् (डोळ्यांना)– काळा चष्मा वापरण्याची सक्ती... या सर्वांचा समवाय म्हणजे गाय मनाने दुबळा बनला. १८८९ मध्ये हार्वे वेडच्या हॉस्पिटल्मध्ये मरण पावला. भाऊ इतका अशक्त झाला होता, की तो आदल्या दिवशी मरायचा. पण– गायला पहाण्यासाठी त्याने आपले प्राण जणू कांही थोपवून धरले होते. गाय आल्यावर त्याला ओळखून, हाक मारून मग हार्वेने प्राण सोडला. भावाचा मृत्यू गायला असह्य वाटला. विलक्षण बेचैनी आली. वेडाची छटा आनुषंगिक आहे या विचाराने तो अस्वस्थ झाला. आपणही वेडे होऊ काय ?... धास्ती ! सतत धास्ती... ! त्यामुळे आणखीच विफलता ! मनोबळ संपले ! शक्तिपात झाला ! खरोखरच त्याच्या वागण्यात वेडाची लहर दिसू लागली. एकदम संतापाने– विसंगत बोलत राही. –लिखाण होईना– बुद्धी जणू लुळीपांगळी बनली– मनोवृत्तीवर औदासिन्याची दाट काजळी साचत गेली. मोपॅसा शरीराने आणि मनाने अत्यंत दुबळा बनला.

## भरपूर अर्थप्राप्ती

वास्तविक मोपॅसा १८८० पासून लेखक म्हणून पुढे आला. अवघ्या १० वर्षांत त्याने इतके लिखाण केले होते कीं तेवढे लिहायला सामान्य लेखकाला ५० वर्षे पुरली नसती. कथा, कादंबऱ्या नाटके, स्फुटलेखन या सर्व क्षेत्रात त्याच्या प्रतिभेने अनिरुद्ध संचार केला. भरपूर अर्थप्राप्ती. एका कथेला तो ५०० फ्रॅन्क्स घेत असे परभाषेतूनही त्याचे साहित्य भाषांतरित होई. मानधन भरपूर मिळे– आपोआप त्याची गणना उच्चभ्रू वर्गात होऊ लागली. तथापी त्या वर्गाशी गायला समरस होता येईना. भावाचे वेड, आईचे मनोदौर्बल्य, आनुषंगिक आजार, यापायी त्याच्या मोकळेपणाला भयंकर मर्यादा पडत. वैताग येई. डोके दुखे– मेंदूतल्या कळा थांबविण्यासाठी तो गुंगीची औषधे घेत राही. त्याबाबतीत ईथर, कोकेन्, मॉर्फिन् या सर्वांचा आळीपाळीने उपयोग व्हायचा. हरपलेली संवेदना जागी झाली की पुनश्च मेंदूत कळा सुरू होत.– पुनश्च गुंगीची औषधे ! हळूहळू डोकेदुखीच्या जोडीला पोटाची तक्रार सुरू झाली. प्रकाश हवासा वाटे पण सहन होत नसे. नवीन कादंबरी लिहायला घेतली होती. चित्त स्वस्थ नव्हते. मध्यंतरी मेरी कान्ह व लोलिया कान्ह या बहिणींविषयी त्याला आसक्ती वाटली. परंतु जीवाचे सान्त्वन करणारे असे निर्भर प्रेम त्यातून निर्माण होणे अशक्य होते. मोपॅसा हा स्वभावतःच बंधनांच्या पार होता. 'विवाहा'ला बंधन समजत होता, वेडी मानीत होता. त्या बंधनातच प्रेमाची नीरव फुंकर असू शकते, याची त्याला जाणीव नव्हती. आपण जसे मधुकर वृत्तीचे आहोत तसेच इतरही असणार हे त्याने गृहीत धरलेले होते. ती भयंकर चूक गायने कधीही सुधारून घेतली नाही. परिणामी बुद्धी, भावना व शरीर विकल झाले ती वस्तुस्थिती अमान्य करण्यासाठी तो मोठमोठ्याने बोलत राही. खूप लिहिण्याचा प्रयत्न करी. उसनी उत्कटता फारसा टिकाव धरू शकत नसे. मानसिक शक्तीला कृत्रिम उधाण आणले तरी परिणाम विकृतच होई. अधिक विकलता– अधिक बेचैनी– क्लांतभ्रांत मन... असहाय्यता... बुद्धीलाही एकप्रकारचा झटका येई. मग 'Autoscopia' हा अनुभव वारंवार येऊ लागला. ( = स्वतःची प्रतिमा दिसणें ).

## मानसन्मानांची पर्वा नाही

असाच एकदा गाय रात्री– अपरात्री परतला. आरामखुर्चीत असून आपण पुस्तक वाचीत आहोत असा त्याला भास झाला. वस्तुस्थिती व भास यांचे इतके चमत्कारिक मिश्रण झाले की गाय भेदरून मागच्यामागे पळाला. मित्राच्या घरी गेल्यावर पुनश्च पोहोचवायला आला– भीती निराधार असल्याचे स्पष्ट झाले. १८८३ मध्ये एकदा असा भास झालेला होता, १८९० नंतर त्याची आवर्तें वाढली. अनेक प्रकारच्या अकारण भीतीचे गंड (फोबिया) तयार होऊ लागले. कोळ्याच्या जाळ्यांचीच त्याला खूप भीती वाटे. एकसारखी जाळी झाडून काढण्याची वेडी मोहीम सुरू होई. जागा बदलण्याचा सपाटा सुरू. कोणत्याही नव्या जागेत चैन पडत नसे. चित्त्यासारखा हॉलभर फेऱ्या घालत राही. रात्रभर या फेऱ्या चालायच्या. ११ ते २ या रात्रीच्या वेळी तर त्याला झोप लागतच नसे. ३–४ वेळा नोकर उठे; देखभाल करी... नोकर हा आता जीवाभावाचा दोस्त झाला होता. एकनिष्ठ उपासक बनला होता.

इ. स. १८८९ साली ईफेल टॉवर बांधून पूर्ण झाला. असली 'मेटॅलिक सर्कस्' उभी करून पॅरिसची स्कायलाइन् बिघडवू नये म्हणून अनेक नामवंत कलावंतांनी निदर्शने केली होती. निषेध नोंदविला होता. मोपॅसाची गणना त्या विरोधकातच होती. त्या उंच टॉवरची पॅरिसवरील सावली त्याला सुंदर कागदावर शाई सांडल्यासारखी विशोभित वाटे. त्याने पॅरिस सोडले – डॉक्टरी उपचार सुरू होते. पण त्यात स्थिरता नव्हती. वर्षभरात १२–१३ डॉक्टर्स बदलून झाले. मुळात मनातच अस्वस्थता होती – बेचैनी होती. जागा आणि डॉक्टर्स बदलले तरी मनातला अस्वस्थ स्थायीभाव कसा बदलणार ? हळू हळू बोलण्याचालण्यातही विसंगती स्पष्ट होऊ लागल्या.

इ. स. १८९० मध्ये मोपॅसाला पॅरिस अॅकादमीकडून लीजन् ऑफ ऑनर हा बहुमान मिळण्याची संधी आली. पण त्यासाठी आवश्यक ते उपचार पाळण्यास त्याने नकार देऊन ही सुवर्णसंधी धुडकावून लावली. सरकारी मानसन्मानांचा त्याला काही विधिनिषेध नव्हता. प्रकृती खालावली होती. आपण अगदी एकटे आहोत ही भावना बेचैन करू लागली. उद्रेक होई – जीवाचा संताप होई – आपण का तडफडतो आहोत तेच त्याच्या लक्षात येत नसे. या संदर्भात एकदा एका प्रतिष्ठित बाईंना तो म्हणाला,

'आता मी आत्महत्याच करणार आहे !'

'अहो असं काय वेडयासारखं बोलताय् ?'

'वेड्यासारखं !... हो ! वेड्यासारखं ! तुम्हाला माहीत आहे का, माझा भाऊ वेडा आहे – दवाखान्यात ठेवलाय त्याला. आता माझी पाळी कधी येते तेच बघायचं !'

या घटनेपूर्वी एक महिना (२३ नोव्हेंबर १८८९) रोएन येथे फ्लॉबर्टच्या पुतळ्याचे अनावरण व्हायचे होते. मोपॅसा हा फ्लॉबर्टचा वाङ्मयीन सुपुत्र ! तेव्हा तो येणार हे रास्तच होते. मोपॅसा समा-

रंभाला आला. त्याचवेळी त्याच्या व्यक्तिमत्त्वात कमालीचा फरक झाल्याचे प्रत्येकाच्या लक्षात आले. हा काही आता फार दिवसाचा सोबती नाही ही यातनामय जाणीव सर्वांना झाली. कित्येकांनी तर त्याला ओळखलेसुद्धा नाही – डॉक्टरांनी त्याला घराबाहेर न जाण्याचा सल्ला दिला. घरातच तो मादक द्रव्यांचे सेवन करून पडून रहात असे – जागेपण सहन होईना. डोळ्याची तक्रार – वाचन लेखन बंद! कमालीचा अशक्तपणा! नंतर Bel Ami वर (हे कादंबरीचे नाव बोटीलाही दिलेले होते) त्याने काही दिवस मुक्काम केला. पण त्याला कोठेही बरे वाटेना. तो डॉक्टरांना म्हणे, 'खरं सांगा, मला वेड लागणार आहे का? तसे असेल तर स्पष्टच सांगा. मी आत्महत्या करीन. वेड लागण्यापेक्षा मरण बरे!'

## वाङ्मयचौर्याचा आरोप

मोपॉसाची साहित्यिक क्षेत्रातली कीर्ती सतत वाढत होती. नाना भाषातून भाषांतरे होत होती. कुठल्या लांबलांबच्या देशातून लोक त्याची मुलाखत घ्यायला येत. त्यांच्याशी कित्येकदा तो अक्षरही बोलत नसे. मोपॉसांची जी प्रतिमा मनात घोळवीत लोक येत, त्यांना या आवडत्या लेखकाला पाहून धक्का बसत असे. इतक्या हलक्या फुलक्या प्रसन्न कथा लिहिणारा माणूस इतका वैतागलेला, उदास कसा?

याच सुमारास दुबळ्या मनाच्या जखमेवर मीठ चोळणारे काही प्रसंग घडले. कोणा एका नगण्य टीकाकाराने मोपॉसावर वाङ्मय-चौर्याचा आरोप केला. 'तुमचा आरोप ऐकून मी हसून हसून बेजार झालो,' असे त्याने लिहिले खरे, पण या दुष्ट टीकाकाराच्या धारिष्टाची त्याला भयंकर तिडीक आली.

न्यूयॉर्क मधून निघणाऱ्या स्टार या वर्तमानपत्राच्या रविवारच्या अंकात एक लघुकादंबरी छापण्यात येत असे. ही कथा प्रसिद्ध लेखकाची असावी असा दंडक होता. टॉलस्टॉयची 'क्रुझर सोनाटा' अशीच स्टारमधून प्रसिद्ध झालेली होती. (इंग्लिश भाषांतर) १३ जुलै १८९० च्या स्टारमध्ये मोपॉसाची Last will & Testament of Madam de Courcil! ही दीर्घकथा प्रसिद्ध झाली. मोपॉसाला संताप येण्याचे कारण म्हणजे भाषांतरकाराने वाटेल तेवढे स्वातंत्र्य घेतलेले होते. एवढेच नव्हे तर मूळ कथावस्तूत फरक केला होता. वास्तविक इंग्लिश भाषांतराचे सर्व हक्क स्वाधीन असता भाषांतर-काराने आपल्या साहित्यकृतीस असा धक्का द्यावा हे काही गायला सहन झाले नाही. पुनश्च २५ जानेवारी १८९१ ला असाच अन्याय झाला. तेव्हा मात्र मोपॉसा संतापाने वेडापिसा झाला. संपादकावर केस करण्यासाठी वकिलाकडे धावला. असा संतापाचा उद्रेक त्याच्या दुबळ्या मनाला पेलणारा नव्हता. मनोविकार ताब्यात रहावेत म्हणून डॉक्टर्स औषधे देत होते – पण असल्या घटना सारी औषध-योजना विस्कटून टाकीत होत्या. स्टारपत्र लवकरच बंद पडले आणि कोर्टकचेऱ्या करण्याची वेळ आली नाही. तथापी आपल्या लिखाणाशी असला पोरखेळ केलेला त्याला सहन झाला नाही.

१८९१ च्या अखेरीस मोपॉसाच्या वागण्यात वेडाच्या छटा स्पष्ट दिसू लागल्या. आपल्या हातापायावर त्याची हुकमत उरली नाही. धड उभे राहता येईना. दररोज रात्री आपला मेंदू वितळतो आणि त्याचा द्राव नाकातोंडातून वहातो अशी त्याची कल्पना! फ्रेंच भाषेवर मोपॉसाचे केवढे प्रभुत्व! पण आता साधी पत्रे लिहिताना त्याच्या हातून चुका होत. विस्कटलेली वाक्ये – स्पेलिंगच्या चुका! कानात सतत आवाज घुमत राही...एकदा त्याने बाजारातून ३०० छड्या विकत आणल्या. छडीने लढाई करायला सुरुवात केली. (शत्रु-सैन्य म्हणजे तीन पिपे)...त्याला जरा बरे वाटावे म्हणून बेल एमी-वरून त्याला चक्कर मारायला नेले खरे, पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. त्याच्या डोळ्यात आता नजरच उरली नव्हती. तो या जगात होता – आणि नव्हताही! अनेक भीषण आभासांनी त्याचे दुबळे मन हादरून जात असे.

१८९२ साल उजाडले. नव्या वर्षाच्या शुभेच्छांचा पाऊस! केवढी दुर्दैवाची गोष्ट! किती चमत्कारिक उपरोध! गायला सकाळी दाढी करता येईना. चेहेरा व आरसा यात दाट धुके दिसू लागले. न्याहारी-नंतर अन्हिक उरकले. सकाळपासून खूपसे पाहुणे येत होते. नवे वर्ष शुभंकर जावे अशी सदिच्छा व्यक्त करीत होते. सकाळी १० च्या गाडीने तो नाइस येथे आईकडे गेला. आई, वहिनी, छोटी पुतणी, मावशी यांच्याबरोबर त्याने जेवण घेतले. दुपारभर झोपून राहिला ...बाहेर कुठे फिरायला जायचेच नव्हते. रात्री पावणे दोनला त्याच्या खोलीतून ओरडा ऐकू आला. फ्रँकॉसिस धावत जाऊन पहातो, तर त्याला भयंकर दृष्य दिसले. मोपॉसाने वस्तऱ्याने गळा कापून घेतला होता. फ्रँकॉसिसच्या हृदयाचे पाणी झाले. मोपॉसा त्याला म्हणाला, 'अरे बघ मी काय करून घेतले आहे ते! गळा कापून घेतलाय माझा! हा वेडाचा प्रकार आहे बरं!' ताबडतोब डॉक्टरांना बोला-वण्यात आले. जखम शिवून टाकली. फ्रँकॉसिस दिवा धरून उभा होता. पण त्याला धड उभे रहावेना. हातपाय थरथरत होते. दिवा धाडकन खाली निसटलाच!

## अत्यंत आनंदी, अत्यंत दुर्दैवी

दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी मोपॉसा अगदी शांत होता. नंतर अचानक युद्धाची आठवण झाली. फ्रँकॉसिसला युद्धावर चलण्याची तो घाई करू लागला. 'अरे चल लवकर तयारी कर–प्रशियन आपल्या देशावर हल्ला करीत आहेत. त्यांना चोपून काढू या...' आता रोगी अगदी हाताबाहेर गेला हे उघड झाले. लाडक्या बेल एमीच्या सह-वासात तरी मूळची प्रसन्नवृत्ती जागी होते का ते पहाण्याची खटपट करण्यात आली. काही उपयोग झाला नाही. डोळ्यात नजरच उरलेली नव्हती. नंतर डॉ. ब्लांची यांच्या पॅसी येथील वेड्याच्या इस्पितळात मोपॉसाला ठेवण्यात आले.

डॉक्टर ब्लाँची यांना मोपॉसाची जबाबदारी फार मोठी वाटत होती. एवढ्या थोर लेखकाला आपण ट्रीटमेंट देऊ शकू का? यश येईल का? या काळजीने डॉक्टर स्वतःच आजारी पडले. इतके अनुभवी डॉक्टर, पण मोपॉसांची जबाबदारी आल्यावर महिना-भराच्या आत त्यांनी देह ठेवला. मानसिक ताण सहन झाला नाही. झोप पार उडाली आणि दुःखद देहांत झाला. फ्रँकॉसिस मालकाला भेटायला इमानेइतबारे येत असे. पण पुढे पुढे त्याच्या येण्याला काही अर्थच उरला नाही. मोपॉसाचे वेड ही आईला सहन न होणारी घटना होती. ती त्याला भेटायला हॉस्पिटलमध्ये कधीही आली नाही. त्या स्थितीत आपल्या लाडक्या लेकाला पहाणे शक्य नव्हते. तिला स्वतःला हिस्टेरिक अॅटॅक्स येत असत. त्याभरात तिने २–३ वेळा

आत्महत्येचा प्रयत्नही केला होता. तिचीही रवानगी हॉस्पिटलमध्येच व्हायची होती, पण तेवढी वेळ आली नाही इतकेच !

मोपॉसा पुनश्च माणसात येईल अशी थोडीशी आशा होतो, तीही लवकरच मावळली. आपल्या डोक्यातल्या कल्पना उडून जात आहेत असा त्याला भास होई. फुलपाखराला पकडायला लहान मुले उड्या मारतात, धावतात, तसा तो आपल्या डोक्यातल्या कल्पना पकडायला धावत असे ! त्याचे वेड पहाणे हा हृदयभेदक अनुभव होता !

मोपॉसाचे वेड वाढत जाऊन अखेर ६ जुलै १८७३ रोजी तो मरण पावला. दिव्यातले तेल संपत आल्यावर ज्योत विझून जावी तितके स्वाभाविक मरण आले. ही वार्ता त्याच्या वडिलांना कळविण्याचे कोणाच्याही लक्षात आले नाही. आईवडील त्याच्या अंत्यसंस्कारास आले नाहीत. फ्रँकॉसिस, ब्लांछी रुझवेल्ट, झोला, इतर काही मोपॉसा-वर लुब्ध असणाऱ्या स्त्रिया आणि असंख्य वाचकांचा समुदाय त्याच्या अंत्ययात्रेस उपस्थित होता. अखेर एमिल झोलांनी हृदयाद्रावक श्रद्धांजली अर्पण केली. जगातला अत्यंत आनंदी व अत्यंत दुर्दैवी–दुःखी असे गायचे वर्णन केले...

मोपॉसाच्या मृत्यूनंतर ५ वर्षांनी वडील व १० वर्षांनी आई मरण पावली. लॉराला आपल्या लाडक्या लेकाची दुर्दैवी अखेर कधीही सहन झाली नाही. त्या विषयी ती म्हणे, 'देव जर असेलच, तर मी त्याला भेटणार आहे, अन त्याच्याशी चांगली भांडणार आहे !' मोपॉसाची ३ अनौरस मुले कोठे कोठे वाढत असल्याची वदंता होती. त्यासंबंधी कोणी सूचक प्रश्न विचारलाच तर मोपॉसाच्या पुस्तकांकडे बोट दाखवून ती म्हणे, 'गायची मुले ? मला फक्त त्याची एवढीच मुले माहीत आहेत !' गायच्या जन्मग्रामी त्याच्या पुतळ्याचे अनावरण झाले. त्या समारंभास लॉरा गेली नाही–तिला जाववलेच नाही. ती देखील खूप दुबळी झाली होती. अंधारात पडून असे. गायच्या संपत्तीचा वारसा हार्वेच्या मुलीला मिळाला.

मोपॉसाने कथावाङ्मयात एक नवे युग निर्माण केले. फ्रान्समधल्या जेष्ठ व श्रेष्ठ साहित्यिकात त्याची गणना आहे. त्याची साहित्यिक कारकीर्द अवघी १०–११ वर्षांची ! पण तेवढ्यात त्याने विस्मयकारी कर्तृत्व दाखवले. त्याची कीर्ती फ्रान्सपुरती मर्यादित न रहाता जगभर पसरली.


# टॉलस्टॉय–एक माणूस


लेखिका : सौ. सुमती देवस्थळे

## पूर्वग्राहक : विनामूल्य भेट : योजना

कागद, छपाई, बांधणी इत्यादींचे भडकते भाव पहाता टॉलस्टॉय–एक माणूस लेखिका : सौ. सुमती देवस्थळे या चरित्रग्रंथाची किंमत अगाऊ निश्चित करता येत नाही. तरी ती रुपये तीस ते चाळीसच्या घरात जावी असा अंदाज आहे. आपण वीस रुपये भरून पूर्वग्राहक म्हणून नोंदणी करावी. ग्रंथ पाठविण्याचा टपाल-पॅकिंग इत्यादी खर्च मात्र आपल्याला करावा लागणार आहे. [ वीस रुपये दोन सारख्या हप्त्यात भरण्याचीही सवलत आपण घेऊ शकता. ]

- पाच वर्षांची साप्ताहिक माणूसची किंवा चित्रवार्ता पाक्षिकाची रुपये शंभर ही वर्गणी आपण एकदम भरली तर हा ग्रंथ आपणास विनामूल्या मिळेल. पाठवणी-खर्च आपल्याकडे राहील.
- पाच वर्षांसाठी रुपये शंभरची ठेव 'राजहंस प्रकाशन'कडे ठेवली तरी हा ग्रंथ विनामूल्य मिळू शकेल. पाठवणीखर्च ठेवीदाराचा.
- सव्वाशे रुपये किमतीची राजहंस प्रकाशने आपण विकत घेतलीत तर हा ग्रंथ विनामूल्य देण्यात येईल. पाठवणीखर्च ग्राहकाचा.
- ग्रंथ १९७४ अखेर प्रसिद्ध होईल.
- ठेव असल्यास 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्ट किंवा म. ऑ. ने रक्कम पाठवावी.
- पाच वर्षांची वर्गणी पाठविणे असल्यास ड्राफ्ट 'व्यवस्थापक माणूस' या नावावर पाठवावा व सोबतच्या पत्रात चित्रवार्ता पाक्षिक किंवा साप्ताहिक माणूस यापैकी कुठला अंक हवा त्याचा खुलासा करावा.
- चेकने रक्कम पाठवणाऱ्यांनी वटणावळ म्हणून एक रुपया अधिक पाठवावा.
- या टॉलस्टॉय पुस्तक योजनेची मुदत ३१ मार्च १९७४ पर्यंत आहे.

**राजहंस प्रकाशन १०२५ सदाशिव पुणे–४११ ०३० दूरध्वनी : ५७३५९**




# जर असं घडलं तर

## बाळ कोल्हटकरांचे नवे नाटक

—पुष्पा भावे

या नव्या नाटकाच्या शीर्षकात जर-तरची भाषा होती, जाहिरीतीत 'प्रारंभ चुकवू नका' अशी हिचकॉकटाइप प्रेमळ सूचना होती. चारूशीला ओक या नव्या नायिकेला प्रथमच व्यावसायिक रंगमंचावर पाहा, असे नाट्यवृत्तरकाने सांगत होते. एकूण प्रेक्षकांची उत्सुकता खूप ताणून 'जर असं घडलं तर' या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाचा पडदा बाजूला झाला. पडदा बाजूला झाला आणि 'प्रेमकहाणी'च्या पद्धतीच्या प्रेक्षकसंवादाला प्रारंभ झाला. मात्र पात्रांची ओळख अगदी खास पोरकट पद्धतीने झाली. सुमारे दहा-पंधरा वर्षांपुर्वी गणेशोत्सवी नाटकातील पात्रे अशी प्रारंभी प्रेक्षकांसमोर 'परेड' करीत असत. असो. मग एकदाचे नाटक सुरू झाले. एका रेल्वेयार्डाच्या पार्श्वभूमीवर (आता ही रेल्वेवॅगन काही दिवस मराठी रंगमंचावर राहायला आलेली दिसते.) फूटपाथवरील एक संसार दिसतो. स्वच्छ वर्णाची व वाणीची तरुणी, राणी (सौ. चारूशीला ओक), ही येताजाता सुभाषिते फेकीत असते. अर्थात नाटककाराने या तपशीलाला समर्थन निर्माण केले आहे, राणी ही एका कीतर्न-काराची मुलगी आहे. कीर्तकाराची मुलगी असूनही ती सनातनी नाही, 'पंजाब, सिंध, गुजराथ, मराठा...' सारे आपले देश...सारी माणसे आपली भावंडे मानते. प्रत्येक वेळी राष्ट्रगीताची संपूर्ण ओळ म्हणून आपला हा विशाल दृष्टिकोन पसरलेल्या हाताने सिद्ध करते. जिप्सी पोशाखात असणारी एक मुलगी, मुक्याकाका आणि राणीची रुग्ण आई हे एक कुटुंब आहे. अर्थातच कोल्हटकरी नाटकातली गरीब माणसे फार काळ गरीब रहात नाहीत. या नाटकात तर राणीला गरिबीतच स्वर्ग दिसत असूनही तिच्या हाती सत्ता आणि श्रीमंती दोन्ही देणारे दोन देवदूत येतात. नेहमीप्रमाणे परदेशी जाऊन श्रीमंत होऊन निपुत्रिक मरणारा एक नातेवाईक आणि एक दिव्य प्रेम करणारा श्रीमंत प्रियकर. अलीकडे मराठी नाटककाराच्या आर्थिक कल्पनाशक्ती-विषयी केली जाणारी तक्रार खोटी ठरवणारी भरभक्कम रक्कम आणि एक पदवी (सुभाषितांसाठी) राणीला बहाल करून पहिला अंक संपतो.

दुसरा अंक व तिसरा अंक म्हणजे राणीच्या मुखाने वदविलेले नाटककाराचे राजकीय तत्त्वज्ञान! प्रचलित राजकारणा-वर अप्रबुद्ध टीका हा मराठी नाटककारांचा आवडता छंद आहे; कारण अशा टीकेला सामान्य प्रेक्षक (जो लोकलमध्ये अशीच टीका करीत असतो) चटकन दाद देतो. आदिमानवी अवस्थेला म्हणजे प्रत्येकाने आपल्यापुरते धान्य पिकवायचे, या अवस्थेला समाज धरत गेला की समाजसुखाची गुरु-किल्ली हाती लागली असे या नाटकातील 'बाळ'बोध राजकीय स्वप्न आहे. असो.

या नायिकाप्रधान नाटकात उपकथानक अर्थातच प्रेमाचे...परंतु हे ध्येयवादी, संस्कृती-वादी नाटक असल्यामुळे या नायिकेचे दोन प्रियकर एक दरिद्री, आंधळा, कवी (बाळ कोल्हटकर) आणि दुसरा श्रीमंत (धनंजय भावे) दोघेही तिच्यावर उत्कट प्रेम करतात. हे प्रेम उच्च असल्यामुळे त्या दोघात स्पर्धा नाही; उलट त्यांची एकमेकांशी मैत्री आहे. दैवाशी सतत झुंज घेणाऱ्या राणीला घशाचा कॅन्सर झाला आहे. नियतीवर मात करण्या-साठी ती आपल्या प्रियकरांना विनंती करतें की रोगाने अंत होण्याच्या आत तुमच्या हाती माझा अंत होऊ दे. याचवेळी तिच्या अंध प्रियकराच्या डोळ्यांवर औषधोपचार चालू आहेत. इकडे दुसरा प्रियकर पिस्तु-लाच्या गोळीने राणीचा अंत करतो आणि दृष्टी आलेला प्रियकर राणीला पहायला धावत येतो! (इति 'राणीचा बाग') इतकेच नाही तर तो अशीही बातमी घेऊन येतो की राणीला कॅन्सर झालाच नव्हता; फक्त ध्वनीक्षेपकातील कार्बन तिच्या घशात गेला होता. दैवानेच तिच्यावर मात केली. नाटकात या शेवटच्या प्रसंगापूर्वी बाळ कोल्हटकरांनी प्रेक्षकांचे चित्त विचलित करण्यासाठी योजलेला प्रसंग अत्यंत हास्या-स्पद नव्हे, माझ्या मते, अश्लील आहे. राणीचा प्रियकर तिचे आयुष्य संपवायला तयार झाल्यावर, 'मी आधी देत असते; मग घेते' असे वाक्य उच्चारून राणी आपल्या प्रियकराला शयनगृहात घेऊन जाते. रंगमंचावर संपूर्ण काळोख होतो आणि क्षणा-नंतर साडीवर गाऊन घालीत राणी बाहेर येते. राणीच्या व तिच्या प्रियकराच्या संभाषणातून तो तिच्यावर बौद्धिक प्रेम करतो म्हणून त्याने तिचे दान नाकारले आहे असे कळते. मग रंगमंचावर काळोख करून, मुद्दाम वरील वाक्याने प्रेक्षागृहात खसखस पिकवण्याचे प्रयोजन काय? ते नाटकाला संपूर्णत: अप्रस्तुत म्हणून अश्लील आहे. कोल्हटकरांसारख्या संस्कृती संरक्षणाचा पावित्रा घेतलेल्या नाटककाराने प्रेक्षकांना अशा गुदगुल्या कराव्यात हे आश्चर्यच!

अशा स्वरूपाचे ठोकळेबाज कथानक घेऊन आलेल्या नाटकात अभिनयाला वाव असणार कसा? हां आता एक उद्धट परंतु मायाळू मुलगी, एक आंधळा, एक मुका, एक तडफ-दार नायिका, एक प्रेमळ प्रियकर अशी सोंगे वठवायला वाव होता. नव्याने व्यावसायिक रंगमंचावर येणाऱ्या चारुशीला ओक या नटीला मी अलीकडेच प्रादेशिक नाट्य-स्पर्धेत 'नवी कहाणी, स्मृती पुराणी' या नाटकातील मुख्य भूमिकेत पाहिले होते. तिच्याविषयी काही आशा बाळगायला हरकत नाही असेही वाटले होते. पण या नाटकात तिच्या अभिनयात कृत्रिमता, शरीर अवघडलेपणा (विशेषत: घडीच्या बाहुली सारखी कमरेत लचकण्याची सवय), हात अतिरिक्त वापरणे, जागोजाग पाठांतरा-साठी अडणे, असे अनेक दोष जाणवले. याला लेखक-दिग्दर्शकही जबाबदार असण्याची शक्यता आहे. पण या शक्यता असणाऱ्या नटीला प्रथमत:च अशा नाटकात भूमिका करायला लागणे म्हणजे दुर्दैवच आहे. धनंजय

भावे हे गेली काही वर्षे मराठी रंगमंचावर आहेत. परंतु त्यांच्या वाट्याला बहुधा इतक्या रंगहीन भूमिका येतात की त्यांना अजून स्वतःचा कस पारखण्याची संधी मिळाली नसावी. या नाटकातील त्यांची भूमिकाही या नियमाला अपवाद नाही. अलीकडे दुर्मिळ झालेला एक गुण या नटाजवळ आहे. तो म्हणजे लख्ख वाणी ! बाळ कोल्हटकर त्यांच्या नेहमीच्या शैलीत शब्द ओढून फेकीत बोलत होते. दृष्टी नसणारा मनुष्य उभा करण्यासाठी सतत मान उजवी डावीकडे द्रुतगतीने हलविण्याची महाविलक्षण लकब त्यांनी पत्करली होती. कोल्हटकरांनी या नाटकात निसर्गाच्या तांडवाचे वर्णन करणारी कविता साभिनय म्हटली-त्यावेळी प्रकाशाचे नृत्यही दर्शविण्यात आले. (नाटकातील दृश्यात्मकता ?)

दृश्यात्मकतेवरून आठवले; या नाटकाचे नेपथ्य चंद्रकांत विटणकर यांचे आहे. दुसऱ्या अंकात राणीच्या महाल कचेरीचा जो देखावा आहे त्यात पार्श्वभूमीला सुंदर, मध्यम जांभळा रंग वापरला आहे. पण एकूण सजावटीत जिन्याला भडक निळा, मंहिरपीत हिरवा-मातीचा रंग, बैठकीचे आच्छादन भडक गुलाबी ह्या रंगाची उधळण डोळ्याला त्रास देणारी होती. अलीकडे कोल्हटकरी नाटकाला असते तसे याही नाटकाला नामवंत वाद्यकारांचे संगीत होते. पण मुळात नाटकातच जीव नाही तर ह्या कलेवरावरला शृंगार काय कामाचा ?

कोल्हटकरी नाटकाच्या सर्व मर्यादा मान्य करूनही त्यांना नाट्यरचनेचे एक सुटसुटीत तंत्र अवगत आहे असे आपण म्हणत होतो. आता तोही धागा त्यांच्या हातून निसटलेला दिसतो. नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला सामान्य प्रेक्षकही असमाधानी होते. त्यातीलच एक प्रेक्षक नाटक संपता संपता म्हणाला—' यापेक्षा पुन्हा ' सुरुंग 'सुद्धा पाहायची तयारी आहे. आपली. '

---

# तुम्ही व्यवस्थित आहात काय ?

**डॉ. शरद अभ्यंकर**

' अमुक गृहस्थ म्हणजे फारच व्यवस्थित बुवा, ' असे तुम्ही काहीजणांच्याबद्दल निश्चित म्हणत असाल. व्यवस्थितपणा अंगी बाणवणे म्हणजे कठीण नाही. अगदी पु. ल. देशपांड्यांच्या चौकोनी कुटुंबातल्या मंडळींच्या इतके नाही तरी सर्वसाधारण व्यवस्थित व्हायला खालील प्रश्न मदत करतील. प्रत्येक अ उत्तरास ३ गुण, ब उत्तरास १ गुण व क उत्तरास शून्य गुण आहेत. प्रामाणिकपणे उत्तरे द्या व आपले गुण वाढविण्यास यापुढे मदत करा !

१ : तुम्ही नियमित दैनंदिनी ठेवता काय ? अ. बरीच वर्षे. ब. अधूनमधून. क. नाही.

२ : रोजचा जमाखर्च तुम्ही मांडता का ? अ. शिल्लक जमेपर्यंत. ब. सर्वसाधारण. क. नाही.

३ : तुम्हाला आलेल्या पत्रांची उत्तरे तुम्ही केव्हा देता ? अ. लगेच त्या दिवशी. ब. १—२ दिवसांत. क. तसे ठरलेले नसते.

४ : तुमचे सर्व मित्र व नातेवाईक यांचे पत्ते तुमच्याजवळ लिहिलेली एकत्र आहेत काय ? अ. होय. ब. काहींची आहेत. क. नाहीत.

५ : तुम्ही घेत असलेल्या वृत्तपत्राचा आठ दिवसापूर्वीचा अंक कोणी मागितल्यास तुमच्याकडे मिळेल काय ? अ. लगेच. ब. शोधावा लागेल. क. नाही.

६ : तुमचे नाव, पत्ता, फोन नंबर इ. लिहिलेले कार्ड तुमच्याजवळ असते काय ? अ. नेहमीच. ब. प्रवासात वगैरे असते. क. नसते.

७ : तुमच्याजवळ मोटार वा स्कूटर असल्यास त्याला ठराविक तारखेला वा ठराविक अंतरानंतर तेलपाणी तुम्ही करून घेता काय ? अ. होय. ब. नवीन असताना घेत होतो. क. नाही.

८ : तुमची, पत्नीची व तुमच्या मुलांची जन्मतारीख तुम्हास सांगता येईल का ? अ. होय. ब. माझी व पहिल्या मुलाची सांगता येईल. क. नाही.

९ : ज्या आमंत्रणावर ' आपल्या उपस्थितीबद्दल कृपया कळवावे ' असा शेरा असतो त्याचे उत्तर तुम्ही पाठवता काय ? अ. नेहमी ब. कधी कधी. क. नाही.

१० : ज्या समारंभास तुम्ही हजर रहात नाही त्यांना दिलगिरीचे पत्र पाठवता काय ? अ. नेहमी. ब. कधी कधी. क. नाही.

११ : तुमच्या घरी तुम्ही नसताना कोणी आल्यास निरोप लिहून ठेवण्यासाठी पॅड व पेन्सिल ठेवलेली आहे काय ? अ. होय. क. नाही.

१२ : तुम्ही दहा वर्षांपूर्वी घेतलेल्या एखाद्या किंमती वस्तूची पावती (सायकल, घड्याळ इ.) तुमच्याजवळ मिळू शकेल काय ? अ. निश्चित. शोधावी लागेल. क. नाही.

१३ : नेहमी न लागणाऱ्या परंतु उपयुक्त वस्तू (उदा. आयोडीनची बाटली, बॅटरी, दाभण इ.) तुमच्याकडे चटकन सापडू शकतील काय ? अ. होय. ब. काही सापडतील. क. नाही.

१४ : तुमचा केस कापण्याचा दिवस कोणता ? अ. महिन्याचा विशिष्ट रविवार. ब. कोणताही सोयीचा रविवार. क. केस वाढल्यानंतरचा कोणताही दिवस व रात्र.

१५ : तुमचे ड्रायव्हिंग लायसेन्स, रेडिओ लायसेन्स, स्पिरीट लायसेन्स इ. गोष्टी योग्य वेळी रिन्यू केल्या जातात का ? अ. हमखास. ब. लक्षात राहिल्यास केल्या जातात. क. नाही.

१६ : डॉक्टरांचे बिल एखाद्या महिन्यात अगदीच किरकोळ आले तर तुम्ही काय करता ? अ. पगार होताच देतो. ब. पुढच्या बिलाबरोबर देईल असे सांगतो. क. डॉक्टरच पुढच्या बिलात मिळवतात.

१७ : तुम्ही एखाद्या सभेला वा समारंभाला उशीरा गेलात तर इतर मित्र काय म्हणतात ? अ. जोशी नेहमी वेळेवर येणारे. आज कसा काय उशीर झाला बुवा ? ब. विशेष काही म्हणत नाहीत. क. जोशा ना ? अर्धा घंटा लेट. लिहून ठेवा !

१८ : रेल्वे वा एस. टी. चे तुम्हाला नेहमी लागणारे वेळापत्रक तुमच्याकडे आहे काय ? अ. आहे. ब. शेजारच्या अण्णांच्याकडे आहे. क. नाही.

१९ : प्रवासास जाताना तुमच्या बॅग, बेडिंगवर तुम्ही नाव व पत्त्याचे लेबल लावता का ? अ. होय. ब. कधी कधी लावतो. क. नाही.

२० : वरील प्रश्नांची तुम्ही प्रामाणिकपणे उत्तरे दिली आहेत काय ? अ. होय. ब. काहींची दिली आहेत. क. आम्हाला माहीतच आहे, आम्हाला शून्य मार्क पडणार, तेव्हा दिली झालं !

### विदेशी चित्रपट

# सेक्सला धीटपणे सामोरे जाणारे कॅनेडियन चित्रपट

ह. शि. खरात

गेल्या महिन्यात मुंबईच्या आकाशवाणी चित्रगृहात कॅनेडियन चित्रपट महोत्सव साजरा झाला. तो अनेक बाबतीत लक्षणीय ठरला. सरकारी पातळीवरसुद्धा चांगले चित्रपट निघू शकतात–त्याला प्रचारी स्वरूप किंवा सरकारी वास येत नाही–हे त्या चित्रपटांनी सिद्ध केले आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. माझ्या ह्या विधानाची साक्ष तुम्हाला रशियन चित्रपट देतील. अर्थात सारेच रशियन चित्रपट प्रचारी असतात असे मला म्हणावयाचे नाही, परंतु ते चित्रपट पाहताना आपले समाधान होत नाही. आपल्या माथ्यावर काहीतरी लादले जात आहे ह्याची जाणीव सतत होते. तसेच अतिशय मंदगती व सरळ धोपट छायाचित्रण किंवा टेकिंग असल्याने ते बहुतांशी कंटाळवाणे ठरतात.

कॅनेडियन चित्रपट, चित्रपटमाध्यम जो कॅमेरा ह्याची जाण ठेऊन निर्माण केलेले आढळले. कथेची निवड, पटकथा तयार करताना कॅमेऱ्याचा केलेला विचार, डायलॉगबाजी न करता कॅमेराच जास्त बोलका करणे, मूळ कथेला न्याय देऊन ती वस्तुनिष्ठ पातळीवर चित्रित करणे, संगीताचा योग्य वापर करणे, कलाकारांची योग्य निवड करणे (म्हणजे मालमसाल्यासाठी त्यांचा वापर न करणे) ह्या अनेक गोष्टींमुळे कॅनेडियन चित्रपट लक्षणीय ठरले. पण ह्या सर्वांहूनही मला हे चित्रपट वेगळे वाटले ते त्यातील सेक्सच्या चित्रीकरणामुळे. ह्या सर्व चित्रपटातून जे सेक्सचे स्वरूप आढळले ते कॅनेडियन चित्रपटांचे खास वैशिष्ठ्य म्हणावे लागेल. अमेरिकन व फ्रेंच चित्रपटाची कॅनेडियन चित्रपटावर छाप असली तरी ' सेक्स 'च्या बाबतीत हे चित्रपट आपला वेगळेपणा दाखवीत आहेत. अमेरिकन किंवा फ्रेंच चित्रटात केवळ सेक्ससाठी सेक्स आणण्याची प्रवृत्ती ह्या चित्रपटात आढळत नाही. ह्याला थोडासा अपवाद म्हणून ' डेथ ऑफ लुम्बरजॅक 'चा उल्लेख करता येईल. परंतु मानवी जीवनातील सेक्सचे स्थान, त्याची अपरिहार्यता व कथेतील त्याची अढळता लक्षात घेता कॅनेडियन चित्रपट सेक्सला धीटपणे सामोरे जाण्याचा प्रयत्न करतात. जीवनातील विविध पातळ्यातून ' सेक्स 'चा शोध घण्याचा, त्याचे स्वरूप शोधण्याचा प्रयत्न करतात. ही गोष्ट खरोखरच चिंतनीय आहे. केवळ मसाल्यासाठी किंवा चित्रपट ' हॉट ' करण्यासाठी सेक्स न आणता येथे केलेले सेक्सचे चित्रण कलात्मक व वास्तव वाटते. अर्थात त्यामुळे हे चित्रपट पाहताना कोठेही ते अश्लील व किळसवाणे वाटले नाहीत. उलट कॅनेडियन चित्रपटांनी सेक्सचे एक वेगळेच सौंदर्य कॅमेऱ्यात पकडण्याचा चांगला प्रयत्न केला आहे आणि हे सर्व सरकारी पातळीवर करण्याचा प्रयत्न आहे. म्हणून तो कौतुकास्पदही.

कॅनेडियन चित्रपट महोत्सवात एकंदर सात चित्रपट सादर केले गेले. सारेच चित्रपट काही ' मास्टरपीसेस ' किंवा ' ग्रेट ' नव्हते. परंतु चित्रपटांची निवड चोखंदळपणे केलेली आढळली. कॅनेडियन जीवनाचा वस्तुनिष्ठ छेद घेणारे असे विविध विषयावरील हे सात चित्रपट होते. सर्वच चित्रपटांची निर्मितीमूल्ये उच्च दर्जाची असली तरी उत्कृष्ट चित्रपट म्हणून आपल्याला ' कामुरास्का ' आणि ' रेजिना पादोवनी' ह्या चित्रपटांचा अवश्य उल्लेख करावयास हवा. कामुरास्का लक्षात राहतो तो त्यातील ' जिनिव्ह बुजो ' ह्या ग्रेट नटीमुळे. ह्या नटीचे व्यक्तिमत्वच मोठे भारून टाकणारे आहे. वेधक आणि बोलके डोळे व विविध भावनांचे इंद्रधनुष्य निर्माण करणारा लवचिक चेहरा. ह्यामुळे ह्या नटीला मिळालेल्या भूमिकाही तेवढ्याच तोलाच्या असतात. तसेच संवादाची फेक करण्याची पद्धतही हृदयंगम असल्याने ती एकदम अंतःकरणाचा वेध घेते.

' कामुरास्का ' ह्या चित्रपटातील तिची भूमिका फारच प्रभावी वाटते. कामुरास्का ही एलिझाबेथ नावाच्या नायिकेच्या व्यभिचाराची कथा आहे. ज्याच्याशी लग्न केले तो नवरा लंपट व व्यभिचारी आहे हे कळल्यावर त्याच्याबद्दल एक प्रकारे घृणा निर्माण होऊन आपला स्वाभिमान टिकविण्यासाठी परपुरुषाच्या वासनेला बळी पडलेली व वासनेमुळे साऱ्यांनाच झपाटून टाकलेली एलिझाबेथ वासनेसाठी कुठल्या थरापर्यंत जाते हे ह्या चित्रपटात मांडले आहे. एलिझाबेथचे स्वभावचित्रण करताना कोठेही एकांगीपणा आला नाही. म्हणूनच नवऱ्याशी प्रतारणा करणारी व आपल्या जाराकरवी नवऱ्याचा खून केल्यावर पुन्हा जारालाही दूर लोटणारी एलिझाबेथ व तो गेल्यावर त्याच्यासाठी तळमळणारी एलिझाबेथ मनाची पकड घेत जाते. ह्या चित्रपटाचे चित्रण कल्पकतेने केले आहे. तुरुंगातून सुटून आल्यावर मानसिक धक्क्याने क्षीण झालेली एलिझाबेथ झोपेच्या गोळ्या घेऊन सारे गतजीवन आठवतेय हे फारच छान पद्धतीने दाखविले आहे. हे दाखविताना मध्ययुगीन काळ तर जिवंत केला आहेच परंतु तत्कालीन बर्फाच्छादित निसर्गचित्रे फारच सुखावह आहेत. जिनिव्ह बूजी ह्या नटीने क्षणात

षोडषा तर क्षणात प्रौढ ह्या दोन्ही भूमिका इतक्या जिवंत केल्या आहेत की त्यामुळे कामुरस्का चित्रपटाचे सोने झाले आहे. इथे आपल्याला टॉलस्टॉयच्या 'ॲनाकॅरेनिनाची' आठवण येते. पण कामुरास्का 'ॲनाकॅरेनिनाची' पातळी गाठू शकत नाही. सर्वांची सहानुभूती खेचणारी ॲनाकॅरेनिना फार मोठी स्त्री वाटते तशी एलिझाबेथ वाटत नाही. ती एक सामान्य स्त्री वाटते. मात्र चित्रपट परिणामकारक आहे.

दुसरा लक्षात राहणारा व वेगळाच वाटणारा चित्रपट म्हणजे रेजिना पादोवनी. चांगल्या ताकदीची समर्थ नवकथा वाचल्याचा परिणाम हा चित्रपट पाहून येतो. दिग्दर्शकाने हा चित्रपट घेताना कॅमेरा अशा तपशीलाने फिरविला आहे की त्यामुळे ह्या चित्रपटाचा हेतू सफल होऊन शेवट परिणामकारक होतो. उच्चभ्रू समाजाच्या भ्रष्टतेची, त्या जीवनाची उबग येईल अशी ही कहाणी आहे. केवळ पैशाच्या मागे लागलेला हा उच्चभ्रू समाज कसा पोखरून गेला आहे, नीतीभ्रष्ट होऊन मानसिक सुख हरवून गेल्यामुळे केवळ शारिरीक भोगवादी कसा झाला आहे, ह्याचे परिणामकारक चित्रण आढळते. पादोवानी हा मोठा कंत्राटदार. त्याच्या आलिशान बंगल्यात एका पार्टीला शहराचा मेयर, मंत्री, त्यांचे सेक्रेटरी जमलेले असतात. बिझनेस मिळविणे हेच ह्या पार्टीचे उद्दिष्ट असते. वरून अतिशय सज्जन दिसणाऱ्या ह्या मंडळींच्या वर चाललेल्या पार्टीखाली दिव्यासारखा अंधार असतो. तळघरात त्यांचे सारे बॉडीगार्ड, वेश्या, गुंड वरील आदेशाचे पालन करण्यासाठी कटिबद्ध असतात. वरचे देखाव्याचे जग आणि खालील तळघरातील भयंकर जग ह्याला कलात्मक छेद देऊन दिग्दर्शकाने ह्या भ्रष्ट समाजाची सारी लक्तरे पड्यावर आणली आहेत. ह्यातल्या मेयरला पोरी पुरविल्या जातात. तर मेयरची बायको तरुण सेक्रेटरीला हावरेपणाने भोगते तर तरुण सेक्रेटरची स्मार्ट बायको पादोवनीच्या बाहुपाशात पडते. सारे उघडपणे वेळ साधून. अशा रात्रीच्या वेळी पादोवनी दुःखी असतो. मुलांवर प्रेम करणाऱ्या ह्या पादोवनीची बायको एका ज्यू बरोबर पळालेली असते. ते पुन्हा भेटणार नाहीत असे वचन पादोवनीला मिळालेले असते. परंतु ते एका हॉटेलात दिसतात. त्याचा जाब विचारण्यासाठी पादोवनीचे हस्तक तिला शोधतात. परंतु पादोवनीच्या बायकोचे दुर्दैव तिच्या आड येते. तिच्या प्रियकराला कॅन्सर होतो. त्यामुळे परत केवळ मुलांसाठी पादोवनीने आपल्याला घरात घ्यावे म्हणून ती याचना करण्यासाठी येते. तसे पत्रही ती त्याला लिहिते. परंतु पादोवनीचे हस्तक तिचा निकाल लावतात. बंदुकीच्या गोळीचा आवाज येऊ नये म्हणून फटाक्याची आतशबाजी करण्यात येते. ती आतशबाजी तिची मुले पाहत असताना तिथेच तिचे प्रेत केव्हाच सिमेंट कॉंक्रीट झालेले असते. ही सारी दृश्ये अंगावर काटा आणणारी आहेत. काळीज नसलेली माणसे किती अधःपतित होतात ह्याचा हा चित्रपट म्हणजे नमुना आहे. स्वार्थासाठी वाटेल त्या अघोरी उपायाचा अवलंब केला जातो. त्याचे उदाहरण म्हणजे आपल्या गुंड हस्तकाकरवी मंत्र्याच्या सेक्रेटरीने पत्रकारांची लावलेली वाट. त्यामुळे ह्या भयंकर जगाची चांगलीच कल्पना येते. 'गॉडफादर' कादंबरीतील थोडीशी चुणूक येथे पाहावयास मिळते. दुसऱ्या दिवशी उद्घाटन होते. अर्थात मेयर साहेबांच्या हस्ते. पत्रकार नेहमीप्रमाणे फोटो वगैरे घेतात. शेवटी तरुण सेक्रेटरीची बायको पादोवनीच्या गाडीतून जाते. आणि ती जात असताना ह्या जागेसाठी सामान्य लोकांच्या घरांची कशी राखरांगोळी झाली आहे हे सूचकतेने दाखवून दिग्दर्शकाने ह्या चित्रपटाचा हेतू सफल केला आहे.

इतर चित्रपटात 'डेथ ऑफ लुंकर जॅक' हा एकदम 'हॉट' ठरला. त्याचे एक्स्ट्रॉ खेळ ठेवावे लागले. कारण त्यातील 'सेक्स'चे केलेले उघड चित्रण. 'सेक्स'चे चित्रण कलात्मक होते पण कथेत ते अपरिहार्य वाटले नाही. उलट सेक्ससाठीच ही कथा तयार झाली असे वाटले. आपल्या बेपत्ता बापाचा शोध घेणारी तरुणी हॉपलेस गायिका व न्यूड मॉडेल म्हणून काम करते. तिला साहाय्य करणारे तिच्या सेक्सचा वापर करतात. शेवटी बापाचा खून झालेला आहे हे तिला कळते. परंतु त्याबद्दल वाईट न वाटता ती उलट प्रियकराच्या बाहुपाशात हरवते. हे सर्व केवळ बापाच्या शोधासाठी तिला करावे लागले असे कुठेच वाटत नाही. परंतु सेक्सचे चित्रण येथे बेफाम आहे. अर्थात सर्वच कॅनेडियन चित्रपटात संपूर्ण नग्नता आहे. परंतु इथे तिचा अधिक वापर केला आहे. विशेषतः संपूर्ण नग्न होऊन एका श्रीमंत म्हाताऱ्याला नयनसुख देण्यासाठी तिने केलेल्या चवताळणाऱ्या वाघिणीचा अभिनय अप्रतिम होता. ह्यावेळी कॅमेऱ्याने अतिशय कलात्मक व धीट चित्रण केले आहे. कॅरॉलल्यूअर ह्या नटीने हे काम बेडरपणे केले आहे.


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

आणि दिग्दर्शक गिलिस कार्ले येथे यशस्वी झाली आहे. विशेषत: सर्वच चित्रपटात संपूर्ण नग्न उरोजाची दृश्ये व संपूर्ण नग्न देहाची दृश्ये आडपडदा न ठेवता घेतलेली आहेत.

'इसाबेल' ह्या चित्रपटाची कथा थोडीशी गूढ वाटावी अशी सादर केली आहे. एका छोकरीचे संपूर्ण स्त्रीत रूपांतर (अर्थात सेक्सच्या दृष्टीने) होताना तिला होणारे भास, तिला वाटणारी भीती, तिला येणारे अनुभव, हे धक्कादायक पद्धतीने मांडले आहे. जिनिव्ह बुजो ह्या समर्थ नटीनेच ह्यात नायिकेचे काम करून आपल्या अभिनयाचा प्रभावी साक्षात्कार इथे केला आहे. ('ॲन ऑफ वन थाऊजंड डेज'मध्येही तिने तशीच दमदार भूमिका केली होती.) ह्या चित्रपटातील निसर्ग छायाचित्रण किंवा साऱ्याच चित्रपटातील छायाचित्रणाने निसर्ग जिवंत केला आहे. 'यू टर्न' मध्ये आपले हरपले श्रेय शोधणाऱ्या तरुणाला शेवटी वास्तवतेपुढे हार कशी खावी लागते हे दाखविले आहे. कुठेतरी मनात भरलेल्या स्त्रीचा तो शोध घेत असतो. त्याच्याशी शय्यासोबत करणाऱ्या तरुणीला तो केवळ लग्नाची आश्वासने देत असतो. कारण त्याचे मन जडलेले असते. एका आर्त नजर असलेल्या मादीवर. ती शेवटी सापडते, पण तिच्या मुलाबाळासकट. तरीही ती हवीशी वाटते. परंतु त्याला शरीर देऊनही ती त्याच्याशी लग्न करायचे नाकारते. आणि मुलासह दूर जाते. ह्याला पुन्हा जमिनीवर उतरून पहिल्याच पोरीला गाठावे लागते. 'दि ख्रिश्चन मार्शा' हा चित्रपट बच्चोंके लिये होता. वेडिंग इन व्हाइट'मध्ये एका बावळट दिसणाऱ्या व असणाऱ्या तरुणीची शोकांतिका आहे. सेक्ससंबंधी भित्रट असणारी व बलात्कारास प्रतिकार करू न शकणारी ही तरुणी गरोदर राहिल्याने केवळ सामाजिक प्रतिष्ठेसाठी एका म्हाताऱ्याशी लग्न करते. अर्थात ही समस्या आता कॅनडामध्ये नसावी. त्यामुळे ही कथा थोडीशी जुनीच वाटली.

मात्र बावळट तरुणीची निवड व तिचे काम उल्लेखनीय आहे. तिने तिच्या नर्तिकेला न्याय दिला आहे.

अशातऱ्हेने कॅनेडियन जीवनाचे विविध पैलू ह्या सात चित्रपटातून आढळतात. ह्या चित्रपटाबरोबर सादर केलेले हॉट स्टफ, 'ब्रिगहॅान, हाऊ डेथ कम टू अर्थ, वगैरे 'शॉर्ट' फिल्म कशा काढाव्यात ह्याचे उत्कृष्ट नमुने होते. तसेच ह्या क्षेत्रात त्यांचा अनुभवही दांडगा आहे ह्याची जाणीव होते.

अशारीतीने कॅनेडियन चित्रपट मला वेगळे व लक्षणीय वाटले ते त्यातील जसे कलात्मक निर्मिती मूल्यामुळे तसेच सेक्सच्या धीट चित्रणामुळे. 'सेक्स'चे चित्रण सोडून द्या. कारण आपले सामाजिक वय अजून वाढलेले नाही. परंतु चित्रपट माध्यमाचा विचार करून जर आपले काही हिंदी चित्रपट असे निघाले तरी अशा महोत्सवाचा उपयोग झाला असे म्हणता येईल.

• • •



# आचार्य अत्रे – एक झुंजार पौरुष

## चांगला अनुबोधपट

सासवडजवळच्या कोडीत गावचा एक मुलगा. शिक्षणाच्या निमित्ताने सासवड–पुणे–मुंबईपर्यंत प्रवास करणारा. शिक्षणक्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण पदवी लंडनला जाऊन मिळवणारा. शिक्षणक्षेत्रात काहीतरी वेगळे करून दाखवण्यासाठी धडपडणारा. पाहता पाहता त्याने मराठी साहित्याचा–रंगभूमीचा–चित्रपटाचा – वृत्तपत्राचा – राजकारणाचा परिसर आपल्या कर्तृत्वाने व्यापून टाकला. तो आचार्य बनला. याच आचार्याने मराठी लोकजीवनावर जवळ जवळ तीन तपे अधिराज्य गाजविले. हंशा आणि टाळ्यांच्या गजरात आचार्य अत्रे हे नाव मराठी जनमानसावर मुद्रांकित केले.

आचार्यांच्या जीवन-चरित्राचे धावते दर्शन आता अनुबोधपटाच्या निमित्ताने चित्रबद्ध झाले. एक व्यक्ती जीवनाच्या किती दालनांमध्ये प्रवेशू शकते, किती स्तरांना स्पर्शू शकते त्याचे हे जिवंत उदाहरणच आहे. त्यांनीच स्वतःच्या स्वभावाबद्दल म्हटले आहे, 'माझा स्वभाव मांजरासारखा आहे. जीवनात प्रत्येक भांड्यात मी डोकावत आलो...मग त्यात काही असो वा नसो...' खरोखरीच त्यांनी जीवनाच्या विविधांगांचे दर्शन घेतले. ज्या ठिकाणी ते गेले त्या त्या ठिकाणी अनुभव शोषून घेतले.त्या जीवनानुभवात ते समरसून गेले. स्वतः घेतलेला अनुभव स्वार्थापोटी स्वतःजवळच ठेवला नाही. तो अनुभव साऱ्यांचा झाला. स्वतःबरोबर इतरांना मोठे केले. मराठी माणूस मोठा केला. मराठी भाषा समृद्ध केली. महाराष्ट्र मोठा केला...आणखी खूप गोष्टी !

अशा बहुरंगी, बहुढंगी, चतुरस्र प्रतिभावान व्यक्तीचे जीवनदर्शन चित्रपट माध्यमातून साकारायचे ही सकृद्दर्शनी सोपी वाटणारी गोष्ट तपशिलात निश्चितच अवघड ! कारण त्या व्यक्तिजीवनातील केवळ घटना–प्रसंगांची जंत्री किंवा मालिका माहीत असून भागत नाही. त्या व्यक्तिजीवनाच्या तळाचा शोध घेण्याची वृत्ती हवी. त्या व्यक्तीच्या जीवनात समरसून जाताजाताच तटस्थपणाने त्या जीवनाकडे पाहण्याची शक्ती हवी. कलामाध्यमाच्या द्वारा ते जीवन व्यक्त करण्याचे सामर्थ्य हवे. दिग्दर्शक शरद्चंद्र सिन्हा यांच्या ठिकाणी यापैकी बऱ्याच गोष्टी आहेत, याची सत्यता अनुबोधपट पाहाताना येत होती.

अडीच तास लांबीचा म्हणजे एरवीच्या पूर्ण चित्रपटाच्या लांबीचा अनुबोधपट सिन्हा यांनी तयार केला आहे. त्यामध्ये अत्र्यांच्या जीवनातील विविध अंगांचे आणि रंगांचे दर्शन त्यांनी घडविले आहे. त्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष अत्र्यांच्या काही सभांतील भाषणांचा वृत्तपत्रातील कात्रणांचा, स्थिर स्वरुपाच्या प्रतिमांचा, निवेदनाचा आधार घेतला आहे. सासवड–पुणे–मुंबई या ठिकाणच्या अनेक वास्तूंचे चित्रण केलेले आहे. जुन्या फोटोंच्या आधाराने काही महत्त्वपूर्ण व्यक्तींशी अत्र्यांचा आलेला संबंध दाखवला आहे. त्यांच्या नाटकातील–चित्रपटातील काही दृश्ये, काही जाहिराती दाखवून त्यांच्या कलात्मक जीवनाचा धावता आढावा घेतला आहे. पुस्तकांच्या मुखपृष्ठांचा उपयोग करून घेऊन साहित्याचा परिचय घडवला आहे. १८९८ हे अत्र्यांचे जन्मसाल. त्या काळात त्यांच्यावर लहानपणी ज्या कलाप्रकारांचे संस्कार झाले त्याचे दर्शन विस्ताराने घडवले आहे. तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा भागही सविस्तरपणे आलेला आहे. त्यांच्या जीवनाच्या उत्तरार्धात या चळवळीला विशेष महत्त्व होते. ते महत्त्व तितक्या प्रमाणात आवश्यक त्या अभिनिवेशाने व्यक्त झाले आहे. 'झुंझार पौरुष' साकारले गेले आहे.

या अनुबोधपट निर्मितीमागे सिन्हा यांचे जसे परिश्रम आहेत तशीच त्यांची कलादृष्टीही महत्त्वाची आहे. कोणत्याही प्रसंगाचे छायाचित्रण करीत असताना त्यांनी कलामाध्यमाचा विसर पडू दिला नाही. शब्द आणि ध्वनी यांच्या जोडीला त्यांनी निरनिराळ्या प्रतीकांचा वापर संयतपणे केलेला आहे. लो. टिळकांचा मृत्यु, अत्र्यांच्या प्रतिभेला झालेले स्फुरण, आयुष्यातील आठवणी, घडत गेलेले बदल, स्वगावाबद्दलची त्यांची आत्मीयता इ. प्रसंगांसाठी प्रतीकांचा केलेला वापर लक्षवेधी आहे. त्यामध्ये काही प्रतीके सांकेतिक आणि बाळबोधही वाटतात. पण अशांची संख्या फारच थोडी. अनुबोधपटाचा प्रारंभ आणि अखेर ही दिग्दर्शकाच्या कलादृष्टीची साक्ष देण्यास पुरेशी समर्थ आहेत. सिन्हा यांच्या नावे चित्रपटक्षेत्रात काही जमेच्या बाजूला असल्याचे ऐकिवात नाही. त्या दृष्टीने त्यांनी केलेले धाडस अपूर्व असेच आहे. एकतर अत्रे जाऊन चार–साडेचार वर्षांचा कालखंड लोटलेला आहे. काळाच्या दृष्टीने जर विचार केला तर फार मोठे अंतर आहे असे नाही. अत्र्यांचे संपूर्ण जीवन जवळून पाहिलेली माणसे अद्यापही आहेत. जनमानसाच्या स्मृतीत त्यांची प्रतिमा अजूनही ठसठशीत आहे. रंगभूमीवर सदानंद जोशी यांनी 'मी अत्रे बोलतोय' हा एकपात्री कार्यक्रम यशस्वी करून दाखवलेला आहे. या सगळ्या गोष्टी ध्यानात घेऊन अनुबोधपट काढण्याचा निर्णय निश्चितच धाडसाचा ! पण ते धाडस सिन्हा यांनी यशस्वितेने पेललेले आहे. हे धाडस आर्थिक दृष्ट्या कसे ठरते ते आता पाहायचे !

या अनुबोधपटात छायाचित्रण, संकलन जितके महत्त्वाचे तितकेच निवेदन महत्त्वाचे आहे. निवेदक आहेत बाळ कुरतडकर. यांचा आवाज मुंबई आकाशवाणीमुळे सर्वपरिचित आहे. निवेदनात त्यांनी प्रसंगानुकूल बदल करण्याचा प्रयत्न केला होता, तरीही तो आवाज पूर्णतः समाधान देऊ शकला नाही. निवेदनात आणखी एखाद्या आवाजाचा वापर झाला असता तर बरे झाले असते. अर्थात सरकारी अनुबोधपटातील निर्जीव, एकसुरी आवाजातील निवेदनापेक्षा कुरतडकरांचे निवेदन खूपच सह्य होते.

पूर्ण लांबीचा अनुबोधपट काढण्याचा मराठीतील जवळ जवळ पहिलाच प्रयत्न. (यापूर्वी लोकमान्य टिळकांवर अनुबोधपट काढण्याचा प्रयत्न झाला. तसे लहानसहान

प्रयत्नही पुष्कळ झाले. पण त्यांना यश लाभले नाही. त्यांची कालमर्यादाही फार मोठी नव्हती.) मराठी माणसाने आवर्जून हा अनुबोधपट पाहावा. महाराष्ट्र सरकारने हा करमुक्त केला आहे. अत्र्यांवरील प्रेमामुळे तर जरूर पहावा पण त्याचबरोबर या अनुबोधपटाला प्रोत्साहन मिळाले तर पुढिलांना काही करण्याची उमेद येईल. आणखी चांगले अनुबोधपट निघतील.

हा अनुबोधपट पाहताना अत्र्यांच्या जीवनातील असंख्य प्रसंगांची याद येत होती. अडीच तासांचा अनुबोधपट काढूनही अजूनही अत्र्यांचे जीवन-दर्शन खूपच अपुरे झालेले आहे, असे जाणवत होते. त्यांच्या आत्मचरित्राप्रमाणे अनुबोधपटाचेही पाच खंड करावे लागतील, इतकी सामग्री शिल्लक आहे. असे असूनही जर हा अनुबोधपट स्वत: अत्र्यांनी पाहिला असता तर ते त्यांच्या खास शैलीत म्हणाले असते, "गेल्या दहा हजार वर्षांत असा अनुबोधपट निघाला नाही, निघणार नाही..."

—अनिलकुमार

---

# उत्तरप्रदेश निवडणूक : पृष्ठ ८ वरून

परिषदेचे संपूर्ण प्रांतभरचे भरघोस विजय, युवक वर्गाला जनसंघाच्या उमेदवारात असलेले प्राधान्य ह्यातून किमान आणखी १०–१५ टक्के मतदान जनसंघाला होईल ही जनसंघाची अपेक्षा. गुजराथेतल्या घटनांचा जनसंघाला फायदा होईल असे ते मानतात. ह्या खेरीज बहुजनसमाज हरिजन व इतर यातून जनसंघाला ४–५ टक्के मते मिळून जनसंघाचा आकडा ३५ टक्क्यावर जाईल असे जनसंघाचे गणित आहे. सत्तारूढ काँग्रेस, भाक्रांद संघटना काँग्रेस ह्यात काँग्रेसप्रेमी मते विभागली जातील, तर परंपरागत जनसंघाला विरोधी असणारे मुस्लिम व दलित समाजाचे मत लीग मजलिस, रिपब्लिकन्स व इतर सर्व पक्षांचे मुसलमान मतदार ह्यांच्यात विभागले जाऊन, लीग मजलिस, रिपब्लिकन्स ह्यांच्या उमेदवारीचाही पर्यायाने जनसंघालाच फायदा होईल. जनसंघाचे गणित हे असे असले, व त्यात बरेच तथ्य असले, तरी ते पूर्णार्थाने खरे नाही. 'काँग्रेस विरोधी इतर सर्व हे समीकरण आता जुने झाले असून, जनसंघ विरोधी इतर असे समीकरण मी निदान उत्तर प्रदेशा पुरते तरी मांडतो.' हे जनसंघ नेते त्रिपाठी ह्यांचे मतही सर्वार्थाने बरोबर नाही.

जनसंघाच्या विजयाचे गणित हे असे असले तरी त्याला शह देणारे अनेक महत्त्वाचे घटकही तिथे कार्यप्रवण आहेत. खुद्द जनसंघात फाटाफूट नसली तरी, काही वर्षांपूर्वी जनसंघातून फुटून बाहेर पडलेल्या मधोकांचा लोक तांत्रिक संघ, हिंदू महासभा, रामराज्य परिषद हे पक्षही निवडणुकांच्या रिंगणात उतरलेले आहेत. ह्या सर्वच पक्षांचा फारसा जोर नसला व तिन्ही मिळून पाच-सहा देखील जागा त्यांना मिळण्याची शक्यता नसली तरी, जनसंघाची मते फोडण्याचे काम हे तिन्ही पक्ष नक्कीच बजावू शकतील! 'हिंदू-मुसलमान' संदर्भात जनसंघ जातीय म्हणून नक्कीच गणला जातो. पण उत्तर प्रदेशात जाट, यादव, क्षत्रीय, ठाकूर, ब्राह्मण वगैरे जातीय स्तोम जे आहे, त्याचा फायदा इतरांप्रमाणे उठवण्यात संघीय फार मागे आहेत. १९६७–१९६९ नंतरच्या 'संविद' सरकारमुळे जनसंघ मंडळींवर केले गेलेले आरोप, त्यावेळी जनसंघाविरूद्ध भडकलेला लोकक्षोभ आज शांत वाटत असला तरी त्याचा निखारा अद्याप जिवंत आहे. त्याचा काही परिणाम जनसंघ मतांवर निश्चित होणार आहे. विद्यार्थी-परिषदेच्या यशामुळे युवा-वर्ग संघाकडे आकर्षित आहे हे जितके खरे तितकेच हेही खरे, की ह्या मंडळींच्या आत्यंतिक चळवळ्या कार्यक्रमामुळे थोडी नेहमीची जनसंघ प्रेमी मंडळी काहीशी बिथरलेली दिसताहेत. 'इंदिरा' आपली संपूर्ण ताकद पणाला लावून काँग्रेसच्या प्रचारार्थ तिथे उभा आहे. त्याचाही मुख्य हल्ला चालू आहे तो जनसंघावरच! अलिकडचे श्री. वाजपेयी प्रकरण हा त्याचाच एक भाग असे निदान तिथे तरी मानले जाते.... एवढे सारे असले तरी, सत्तारूढ काँग्रेसला प्रदेशभर प्रमुख लढत द्यावी लागेल ती जनसंघाशीच ह्या बाबत बहुतेक सर्व गोटांचे एकमत आहे. काही विशिष्ट विभागातून जनसंघाची जागा भाक्रांद वा संघटना काँग्रेस घेतीलही, पण प्राय: चुरस लागेल ती या दोन पक्षातच!...

निर्विवाद बहुमत जनसंघालाच नच मिळाले तर? आणि तसे ते कुठल्याही एका पक्षाला नाही मिळाले तर? '...ऐसी हालतमें हम फिर आम चुनाव की सूचना करेंगे. किसी भी मिलीजुली सरकारमें जनसंघ शामील होनेकी शक्यताहीं नही...हम निपक्षमें रहेंगे लेकिन मिलीजूली सरकारमें कदापी शामील नहीं होंगे!...' इति श्री. माधवप्रसाद त्रिपाठी, जनसंघाचे सध्याचे उ. प्रदेश विधान सभेतले पक्षनेते!...

संघटना काँग्रेस, भाक्रांद-संसोपा-मजलिस युती, व जनसंघ ह्या तीन महत्त्वाच्या विरोधकांनंतर इतर विरोधी पक्षांमध्ये थोडाफार प्रभाव पाडू शकेल ती साम्यवादी आघाडी. समाजवादी पक्ष हाच ह्या आघाडीतला महत्त्वाचा घटक. राजनारायण, रामसेवक यादव हे महत्त्वाचे गट फुटून गेल्यामुळे ह्या पक्षाची शक्तीच साफ खच्ची झाली आहे. हा पक्ष, डाव्या आघाडी अंतर्गत २४४ जागा लढवीत असला, बुलंद शहरातली वेणी प्रसाद माधवजींची, आग्रा मधील हुकूमसिंग फरिहार ह्यांच्या अशा आठ-बारा जागांशिवाय फारसा वाव ह्या पक्षाला नाही. समाजवादी मते फुटून, संसोपा युतीचा भाक्रांदला मिळणारा फायदा मात्र शून्यवत करण्याचे सामर्थ्य ह्या पक्षात आहे! मार्क्सवादी, फॉरवर्ड ब्लॉक, रिपब्लिकन्स वगैरेंचे अस्तित्वच ह्या प्रदेशात नगण्य आहे!

मुस्लिम लीगची स्वातंत्र्योत्तर काळातली उत्तर प्रदेशातली ही पहिलीच विधानसभा निवडणूक! त्यांनी उमेदवारही अवघे ४५ उभे केले आहेत. (त्यात ५ हिंदू हरिजन, २ सवर्ण हिंदू!) खेरीज सुमारे ७० जागांवर अन्य पक्षीयांना व अपक्षांना पाठिंबा देत आहेत. उत्तर प्रदेशात मुसलमान मतदारांची जी संख्या आहे (सुमारे २०%) ती निवडणूक निकालांना कलाटणी देण्यास बऱ्याच ठिकाणी समर्थ आहे. लीग वा मजलिसच्या अनुपस्थितीत ही मते एक गठ्ठा

काँग्रेसकडे जात होती. लीग-मजलिसच्या उमेदवारांमुळे ही मते ह्या वेळी फुटतील अशी भीती आहे. सत्तारूढ काँग्रेस, संघटना काँग्रेस ह्यांची ही मुख्य डोकेदुखी आहे. भाक्रांदने मजलिसशी समझौता केला तो मुख्यत: मुसलमान मते आकर्षित करण्यासाठीच. पण लीगच्या प्रवेशामुळे त्यालाही शह मिळाला असून लीग भाक्रांदची देखील डोकेदुखी झाली आहे. या शहकाटशहांनी मुख्य फायदा होणार आहे तो जनसंघाचा. हा मुद्दा जेव्हा लीगचे उ. प्रदेशचे उपाध्यक्ष श्री. इक्रम खान ह्यांना मी सांगितला, तेव्हा ते म्हणाले, '...काँग्रेसके साथ हम आजादीसे रहे. हमें क्या फायदा हुआ. मुसलमान आजभी दलित है. असुरक्षित हैं. सर्विस आदिमें पिछडे हुए हैं. यह सभी खतरा दिन ब दिन बढता जा रहा है. फिर हम कितने दिन काँग्रेसकी साथ दें? हमारी उमीदवारीसे जनसंघको फायदा है; हम कहते हैं ठीक है. जहाँ तक की हमारी वजहसे ऑपोझिशन का फायदा है हमें खुशी है. लेकिन किसी हालतमें हमें काँग्रेस नहीं चाहिये!...

लीगला १०-१५ जागा जिंकायची अपेक्षा आहे. कुठल्याही 'मिलीजुली' सरकारात, 'लीग की माँगे' पुरी होत असतील तर सहभागी व्हायला लीगची ना नाही.' 'आम्ही इथे सरकार बनवू शकत नाही. ह्याची मला जाण आहे. त्यासाठी आमचा झगडाही नाहीं. स्वतंत्र देशातले नागरिक म्हणून आम्हाला मानाने जगता यावे एवढीच आमची इच्छा आहे. त्यासाठी आम्हाला आमच्या लोकसंख्येच्या तुलनेत योग्य प्रतिनिधीत्व प्रशासनात, नौकऱ्यात हवे एवढीच आमची मागणी आहे...'

स्वत:ला देशातले 'दलित' म्हणवून घेत काही मागास गटांच्या प्रतिनिधींना स्वत:च्या झेंड्याखाली एकत्र आणण्यात लीगला उत्तर प्रदेशात मर्यादित का होईना पण यश आलेले आहे. त्यामुळेच जिथे रिपब्लिकन नाहीत, तिथे मागास वर्गियांची काही मते लीग वा लीग पुरस्कृत उमेदवारांना मिळतील असा दाट संभव आहे. हीही गोष्ट जनसंघाशिवाय इतर सर्वांच्या दृष्टीने घाटचाची आहे!

स्वतंत्र पक्षाने २५० उमेदवार उभे केले आहेत. इतरही पक्षांनी शेकड्यांनी उमेदवार उभे केले आहेत. पण त्यांचा काही फायदा आहे असे मला वाटत नाही. अनामत जप्तीच्या स्वरुपात सरकारी महसूलात भर पडेल एवढेच काय ते. काँग्रेस व वर उल्लेखिलेल्या प्रमुख विरोधी पक्षांचे वगळता, जवळ जवळ २००० हून अधिक उमेदवार ह्या चिल्लर पक्षांचे नी अपक्ष मिळून आहेत. त्यांच्यापैकी सगळे मिळून ३०-३५ उमेदवारांपेक्षा जास्त कुणी निवडून येतील अशी अपेक्षा नाही.

विरोधी पक्षांच्या गटांना भेटी देऊन झाल्यावर मी सत्ताधारी काँग्रेसच्या गोटात शिरलो. केसरबाग विभागात हा पक्ष व त्यांचा सहाध्यायी कम्युनिस्ट पक्ष ह्यांची कार्यालये जवळ जवळ आहेत. काँग्रेस कार्यालयात शिरताच बिल्ले, ध्वज, इतर साहित्य ह्यांचे खच तिथे पडल्याचे आढळले. कित्येक जीप्स कार्यालयाच्या आसमंतात उभ्या होत्या. आत जाताच, एका भल्या मोठ्या टेबलाभोवती आठ-दहा तरुण उभे राहून गप्पा मारीत होते. टेबलावर निवडणूक साहित्य पडलेले होते. त्यातल्या एका जवळ मी सहज चौकशी केली. 'आत कुणाला भेटलो तर माहिती मिळेल?' 'भई, हम तो पंजाबसे आये है। मेहमान है यहाँके चुनाव के लिये! जरा उधर पूछिये जी!' 'उधर' उभ्या असलेल्या 'ग्रुप'कडे गेलो तर उत्तर मिळाले 'हम तो हरियाणाके है भई।' मग तिथल्या 'ग्रुप्स'-कडे दुर्लक्ष करीत मी सरळ आत धडकलो. तिथे काँग्रेस विद्यार्थी संघटनेचे (उ. प्रदेश) उपाध्यक्ष असलेले श्री. बलदेव मेहरा भेटले. तसेच आग्र्याचे 'विद्यार्थी पत्रिके'चे संपादक, विद्यार्थी नेते, कार्यकर्ते श्री. दिक्षितजी भेटले. विद्यार्थी आणि युवा संघटनेची तिथे एक बैठक चालू होती. त्या बैठकीलाच श्री. मेहरा मला घेऊन गेले आणि 'गुप्त' बैठकीतले कामकाज पाहून मला खूपच फायदा झाला.

बैठकीला सर्व प्रदेशातून प्रतिनिधी आले होते. काँग्रेसच्या प्रचारार्थ ह्या सर्व प्रतिनिधींनी आपापल्या विभागातून जोमाने कामाला लागावे, अशी बैठकीला उपस्थित असलेल्या काँग्रेस नेत्यांची अपेक्षा होती. पण बैठकीतले वातावरण भलतेच गरम दिसले. इंदिरा गांधींची स्तुती बैठकीतला प्रत्येक वक्ता करीत होता, पण त्याच बरोबर स्थानिक नेतृत्वावर टीकेची झोड उठवीत होता. बहुतेक वक्त्यांनी एक गोष्ट वारंवार सांगितली. 'काँग्रेसने उभे केलेले अनेक उमेदवार नालायक आहेत, समाजात स्थान नसलेले आहेत. सध्याची महागाई, भ्रष्टाचार, लाचलुचपत ह्या परिस्थितीत अशा उमेदवारांसाठी मते मागायला हिंडणे, मतदारांना सामोरे जाणे निव्वळ अशक्य आहे. त्याचप्रमाणे युवा वर्गाच्या, विद्यार्थ्यांच्या अनेक मागण्यांबाबत शासन चालढकल करीत असल्यामुळे त्या मतदारांपुढे जाणेही आम्हाला शक्य नाही. तेव्हा सर्व ठिकाणी लक्ष केंद्रित करून काहीच पदरात पडणार नाही. त्या ऐवजी काही चांगल्या उमेदवारांवरच आपली सारी शक्ती युवा वर्गाने पणाला लावावी...त्याचप्रमाणे निवडणुकीपूर्वीच, शासनाने विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य कराव्यात, निवडणुकीनंतर त्यांचा साधा विचारही होणार नाही...

## मेजॉरिटी इंपॉसिबल

ही विद्यार्थी-नेते मंडळी नंतर मला अलगपणे कॉफी हाऊसमध्ये भेटली. काँग्रेसची समर्थक, तरी काँग्रेसच्या स्थानिक नेतृत्वावरचा त्यांचा विश्वास साफ उडालेला दिसला. अनेक ठिकाणचे उमेदवार त्यांना मान्य नाहीत. त्रिपाठी मंत्रिमंडळ जाऊन इंदिराजींकडून बहुगुणा उत्तर प्रदेशावर 'लादले' जात असताना प्रेमकुमारी बाजपेयी आदि मंडळींचा बहुगुणांना तीव्र विरोध होता. आज प्रदेश काँग्रेस बरखास्त असताना उमेदवारांच्या निवडीची मक्तेदारी साहाजिकच बहुगुणांकडे व त्यांच्या समर्थकांकडे आली.. त्रिपाठी गटावर त्यामुळे साफ अन्याय झाला आहे. श्रीमती बाजपेयी, सध्याचे विकास मंत्री श्री. बदलेव सिंह आर्य आदि मोजकी मंडळी सोडली, तर त्रिपाठी गटाला जवळ जवळ उध्वस्त करण्यात आले आहे. हीच मंडळी आज काँग्रेस विरोधात आहेत. श्री. सीताराम आदि तीन मंत्री बंड पुकारून संघटना काँग्रेसच्या तिटकिटावर उभे आहेत...काँग्रेसची आश्वासने खूप आहेत. कार्यक्रमही आहेत. पण एकूण अंमलबजावणी ज्या पद्धतीने चालते त्यामुळे त्यावर कुणाचाही विश्वास उरलेला नाही. 'गरिबी हटाव' हे शब्द तर आज उच्चारताही येत नाहीत इतका त्याचा उपहास चालू आहे...आपही बताईये, ऐसी अवस्थामें हम कैसे काँग्रेसके लिए वोट मांगे?...फैजाबादचे एक नेते श्री. माताप्रसाद शुक्ल असे बोलत असतानाच, काँग्रेसचाच एक युवक नेता, इटावाचे राम स्वरूप दुबेजी मध्येच म्हणाले, 'काँग्रेसमन होते हुए भी, हम आपको साफ साफ एकही वाक्य में बता देते है। मेरे बुजुर्गवाद की

काँग्रेसकी मेजारिटी 'इम्पॉसिबल है! बस समझ लीजिये, डेढ़सौ सीटे उसे जरूर मिल जायगी!...'

'युवा-वर्ग' इतका काँग्रेसविषयी उदास असला तरी, काँग्रेस नेतृत्व मात्र निर्विवाद विजयासंबंधी निश्चित आहे. लखनौच्या सरकारी गेस्ट हाऊसमध्ये मुख्यमंत्री बहुगुणांनी सांगितले की किमान तीनशे जागा त्यांचा पक्ष जिंकून घेईल. 'संपूर्ण देशातच, किंबहुना संपूर्ण जगातच जी तंगी आहे ती इथेही आहेच. लोक त्यामुळे निराश आहेत ह्यातही वाद नाही, काही लोक शासनावर चिडले आहेत हेही खरे. तरी देखील मला वाटते, गाडी रुळावर आणायची असेल तर काँग्रेसच आणू शकेल ह्याचीही लोकांना पुरेपूर कल्पना आहे. आजच्या गंभीर परिस्थितीवर मात करण्याचे सामर्थ्य केवळ काँग्रेस मध्येच आहे हेही लोकांना माहित आहे. आणि म्हणूनच परिस्थितीने कावले असले, महागाई-बेरोजगारीने परेशान असले, तरी यू. पी. तले लोक काँग्रेसवर 'प्रेम' करणारेच आहेत, व म्हणून काँग्रेसलाच ते मते देतील ह्याबद्दल मला तरी काही शंका नाही...'

असाच आशावाद अलाहाबादेत बोलताना श्रीमती बाजपेयींनी व्यक्तविला. तिथल्याच सभेत बोलताना काँग्रेस अध्यक्ष श्री. शंकर दयाळ शर्मांनी कुठल्याही संमिश्र सरकारची कल्पना साफ फेटाळून लावली. काँग्रेसच्या निर्विवाद मताधिक्याबद्दल त्यांना कुठलाही संदेह नाही असे दिसले...

### काँग्रेसचा पराभव काँग्रेसवाल्यांकडून

स्टेट गेस्ट हाऊसमध्ये बोलताना, वरील मुद्याबरोबरच 'इंदिराजींनी केलेली उद्घाटने हा निवडणूक स्टंट' ह्या आरोपाचे श्री. बहुगुणांनी खंडन केले. 'हा सारा शासकीय कार्यक्रमच होता. मध्यंतरीच्या अस्थिरतेमुळे हा कार्यक्रम थोडा लांबणीवर टाकला गेला एवढेच. माझे सरकार अस्तित्वात आल्यावर, जनतेच्या हिताच्या ह्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीस मी जोराने प्रारंभ केला ह्यात गैर काय? काँग्रेसचे समाजबदलाचे क्रांतिकारी कार्यक्रम, त्यामुळे काँग्रेसला मिळत असलेली लोकप्रियता व सातत्याने चालत आलेले काँग्रेस शासन व त्यावरील जनतेचा श्रद्धा ह्यामुळे आलेल्या नैराश्यातून विपक्षीयांनी हे बिनबुडाचे आरोप केले आहेत...सध्याच्या आर्थिक दुरवस्थेला काँग्रेस जबाबदार नाही. जागतिक तंगीची ती नैसर्गिक परिणती आहे. त्याचेही खापर काँग्रेसच्या माथी फोडून विरोधक जनतेत प्रक्षोभ माजवीत आहेत. जनता आंदोलन करते, त्याला माझा आक्षप नाही, पण विरोधक त्यांच्या परिस्थितीचा फायदा उचलून स्वतःचा राजकीय स्वार्थ साधू पाहात आहेत ह्याचा मला राग आहे. जनतेलाही ह्याची चीड आहे. म्हणूनच, काही विघ्नसंतोषी लोकांनी माजवलेल्या बंडाळचांना जनता साथ देत नाही. ती निवडणुकीत विरोधकांना योग्य धडा शिकवील ह्याची मला खात्री आहे...'

विरोधकांवर टीकेची फैर झाडताना काँग्रेस नेते म्हणाले, '.. विरोधकांजवळ ना काही खास कार्यक्रम ना काही तत्व. जनसंघाने मोठी आश्वासने दिली आहेत पण त्यांच्यासाठीची आर्थिक तजवीज ते कुठून करणार त्याचा कुठे उल्लेख नाही. ८५ पैसे किलो भावाने गहू विकणार आणि १०५ रु क्विंटल भावाने खरेदी करणार! मधले २० पैसे काय अमेरिकेकडून उपलब्ध होणार आहेत? १२ किलो धान्याचा पुरवठा करणार म्हणताना शेतकऱ्यांना धान्य विक्रीची (शासनाला वा इतरांना) मुभाही राहाणार आहे. मग धान्य येणार कुठून? ह्याखेरीज ह्या 'सांप्रदायिकता वादी' पक्षाला निवडून देण म्हणजे देशाला विघटनाच्या वाटेवर नेऊन सोडणे आहे...काँगो म्हणजे संघटना, नेतृत्व, कार्यकर्ते वगैरे सर्वांचाच अभाव असणारा पक्ष. ह्यांच्याही कार्यक्रमात सुसूत्रता नाही... भाक्रांद हा खास जातीय पक्ष. समाजवादाशी फारकत घेतलेल्या ह्या पक्षाशी संगनमत करतात संसोपा वाले 'समाजवादी'...अशा अवस्थेत काँग्रेसच्या काही घोडचुका असल्या (व त्या आहेतही!) तरी काँग्रेसचा मूळ गाभा शाश्वत मूल्यांवर आधारलेला आहे. म्हणूनच कितीही संकटे आली तरी तीतून देशाला काँग्रेसच तारून नेऊ शकेल ह्याची जनतेला खात्री आहे...'

...प्रामुख्याने इंदिराजींची 'इमेज', साधनांची विपुलता व श्री. बहुगुणांची 'प्रोजेक्टेड डायनॅमिक लीडरशीप' आणि विरोधी मतात फार मोठ्या प्रमाणावर असलेली फाटाफूट ह्यावरच प्रामुख्याने काँग्रेसच्या विजयाचे गणित आधारलेले आहे. श्री. बहुगुणांबद्दल लोकात व्यक्तिशः दबदबाही फार आढळला. ते पहाडी प्रदेशातले असल्याने, त्या भागातल्या लोकांना त्यांचा फार अभिमान आहे. दुर्गम अशा टेकड्यांच्या प्रदेशात विरोधकांना साधनाअभावी पोचणेही शक्य नसल्याने, ह्या प्रदेशातून काँग्रेसची बाजू फार फार उजवी आहे. बहुसंख्य अशा ग्रामीण विभागातही परिस्थिती फारशी वेगळी नाही. विरोधी मत विभागले गेले आहे, प्रत्येक मतदारसंघामध्ये सरासरी ९ उमेदवार उभे आहेत व त्याचा फायदाही काँग्रेसला मिळेल यातही वाद नाही. परंतु एवढे असले तरी तीनशे तर सोडाच पण निर्विवाद बहुमत देखील (२१५ जागा) काँग्रेसला मिळणार नाहीत असेच बहुतेक स्थानिक निरीक्षकांचे मत आहे. ह्याची महत्त्वाची कारणे म्हणजे वाढता असंतोष, त्यामुळे असलेले निरुत्साही वातावरण (मतदान साधारणतः जेमतेम ५०% च्या आसपास होईल!) तरुणातला उफाळून आलेला राग आणि काँग्रेसमधली अंतर्गत दुही व बंडखोरी!

काँग्रेस कार्यालयात, मीरतेत, एकाने स्पष्ट कबूल केले की काँग्रेसला बहुमत मिळणे कठीण आहे. श्री. ठाकुरीलाल पुढे म्हणाले, '...I am Confident that only the Congress men Will defeat the Congress!...निवडणुकांसाठी वाटायच्या तिकिटावरून जी बंडखोरी उद्भवली आहे ती काँग्रेसला फार मारक ठरणार आहे...

कम्युनिस्टांबरोबरच्या संगनमताबाबतही असेच मतभेद आहेत. दोन्ही पक्षात हे 'गठबंधन' अनेकांना मान्य नाही; आणि त्यावर दोन्ही पक्षात बंडखोरी झाली आहे. खुद्द समझौताही काटेकोरपणे पार पाडलेला नाही. काँग्रेसने कम्युनिस्टासाठी एकूण ३२ जागा सोडल्या असल्या तरी, ह्या ३२ खेरीज आणखी किमान ४८ जागा कम्युनिस्टच काँग्रेसविरुद्ध लढवीत आहेत. सध्याच्या परिस्थितीत, १९७१ च्या मानाने काँग्रसच्या बदललेल्या धोरणाच्या संदर्भात व इंदिरा-कामराज दिलजमाईच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस-कम्युनिस्ट युती अनेक कम्युनिस्ट मंडळींना मान्य नाही व ते अपक्ष म्हणून रिंगणात उभे आहेत. कम्युनिस्टांची ताकद ह्या प्रदेशात मर्यादितच आहे व तीही अशी विभागल्यामुळे काँग्रेस-कम्युनिस्ट युतीला तो मोठा धोका

आहे. कम्युनिस्ट पक्षाचे सेक्रेटरी श्री. सिन्हा लखनऊला माझ्याशी बोलताना म्हणाले, 'ह्या कॉंग्रेस विरोधी लढयांचे स्वरूप मैत्रीच्या भांडणासारखे आहे...सद्य:स्थितीत स्वत:च्या पायावर जनसंघादी फॅसिस्टांशी मुकाबला करण्यासाठी, त्यातल्या त्यात पुरोगामी विचार-सरणी असणाऱ्या इंदिराजींच्या पक्षाशी आम्ही समझौता केला आहे. लोकसभेतही आमची मैत्री असली तरी आम्ही विपक्षीच आहोत. तसेच इथेही राहू. जनतेच्या जिव्हाळयाच्या प्रश्नावर आम्ही लोक-सभेतही कॉंग्रेस सरकारविरुद्ध झगडतो. इथेही झगडू...'

'पॉंडेचरीत इंदिरा कॉंग्रेसला विरोध, मुंबईत विरोध मग इथेच सख्य, इथलीच कॉंग्रेस पुरोगामी हे कसे ?" ह्या माझ्या प्रश्नावर श्री. सिन्हा म्हणाले, "जिथल्या तिथल्या परिस्थितीवर ते अवलंबून आहे. मुंबईत कॉंग्रेसच्या किल्ल्या भांडवलदारांच्या हातात आहेत. पॉंडेचरीत प्रतिगामी संघटना कॉंग्रसशी समझौता केला.इथे असला प्रकार नाही; उलट कॉंग्रेस, संघटना कॉंग्रेस, भाक्रांद, जनसंघ ह्या प्रतिगाम्यांशी लढते आहे. ह्या लढयात सहभागी होणे हे आमचे राष्ट्रीय कर्तव्य आहे..."

कॉ. सिन्हाजी असे म्हणत असले, तरी अनेक सामान्य कॉमरेड्स भांबावलेले आहेत. सद्य:परिस्थितीला कारणीभूत असलेल्या कॉंग्रेसला पुरोगामी म्हणणे त्यांना विसंगत वाटते. त्यांतूनच त्यांचा विरोध उभा आहे...

कॉंग्रेसच्या विरुद्ध वातावरण तयार करायला महाराष्ट्र, गुजराथ, राजस्थान, मध्यप्रदेश इथल्या पोट निवडणूकांच्या निकालांनीही मदत केली आहे. सर्व देशभरच्या असंतोषाची झळही उत्तरप्रदेशात कॉंग्रेसला सोसावी लागणार आहे. ह्या शिवाय कॉंग्रेसविरुद्धचा सर्वात मोठा घटक म्हणजे तरुणांतला असंतोष ! उत्तर प्रदेशातल्या ५ कोटी मतदारांपैकी ३५ टक्के म्हणजे सुमारे १ कोटी १५ लाख मतदार २१ ते ३० ह्या वयोमर्यादेतला आहे. तो प्रथमत:च किंवा फार तर दुसऱ्यांदा मतदान करीत आहे. जुन्या मतदारांसारख्या त्याच्या निष्ठा ठाम बांधलेल्या नाहीत. उलट त्याला आज ज्या परिस्थितीशी सामना करावा लागत आहे त्यामुळे तो चिडलेला आहे. स्वातंत्र्य-संपादनासाठी कॉंग्रेसने मोठा त्याग केला आहे, खस्ता काढल्या आहेत वगैरे भाव-नात्मक आवाहनांचा परिणाम त्याच्यावर शून्य आहे. त्याला माहीत आहे ती त्याची आजची परिस्थिती, आणि त्यासाठी तो जबाबदार धरतो तो कॉंग्रेस शासनाला. ही वस्तुस्थिती आहे. १९७१ च्या इंदिरा लाटेत, "गरिबी हटाव"ला प्रतिसाद देऊन कॉंग्रेसला ६७ च्या गर्तें-तून कढणारा हाच तरुण होता. पण ७१ नंतर इंदिरा-कॉंग्रेसच्या राजवटीत वचनपूर्ति पेक्षा वचनभंगालाच महत्त्व त्याला आढळून आल्यामुळे तो आज अधिक त्वेषाने कॉंग्रेसविरुद्ध उठला आहे ! आज कॉंग्रेसविरोधी सर्व आंदोलनांचे सूत्रसंचालन उत्तर प्रदेशात प्रामुख्याने हाच वर्ग करतो आहे. शिक्षकांचा संप, वीज कर्मचाऱ्यांचा संप, सध्या प्रदीर्घकाळ चालू असलेला (५० दिवस) इंजिनियर्सचा संप, महागाईविरोधी आंदोलन–भ्रष्टाचार–काळाबाजारविरोधी आंदोलन ही सारी शासनाला अस्वस्थ करून सोडणारी आहेत. गेल्या १३० दिवसांतली (बहुगुणा मंत्रिमंडळ अधिकारारुढ झाल्यापासून !) सारी आंदोलने ह्या भडकलेल्या तरुणांनीच घडवून आणली आहेत. आणि हाच वर्ग कॉंग्रेसविरोधात उभा ठाकला आहे. हे लक्षात घेतले, म्हणजे ३५% असलेला हा तरुण वर्ग कॉंग्रेसच्या पुढयात कुठले ताट वाढून ठेवील हे सांगायला नको !

## युवाशक्ती कुणीकडे ?

झांशी ते अलाहाबाद, मीरत, लखनऊ, कानपूर, आग्रा ह्या साऱ्या प्रवासात अनेक तरुणांशी बोलायची मला संधी मिळाली. तो प्राय: कॉंग्रेसविरोधीच आढळला. जेमतेम २५% तरुणांनी कॉंग्रेसचे समर्थन केले. उरलेला ७५% कॉंग्रेसविरोधात ठामपणे उभा असला तरी तो एकवटलेला नाही हीच त्यातल्या त्यात कॉंग्रेसच्या दृष्टीने जमेची बाब. उरलेल्यात जनसंघाकडे ओढा ४०% हून अधिक मंडळींचा दिसला तरी कम्युनिस्ट समाजवादी पक्षांकडे ओढा असलेलेही अनेक भेटले. भाक्रांदचेही काही समर्थक भेटले तर कॉंगोचे समर्थक अभावा-नेच सापडले. आग्र्याला भेटलेल्या एका तरुणाचे उद्गार ऐकवण्या-सारखे आहेत. तो म्हणतो, 'कुणीही आले तरी आजच्या परिस्थितीत फारसा फरक पडणार नाही. कुणालाही ते शक्य नाही. प्रश्न उरतो तो प्रामाणिक प्रशासन कोण पुरवू शकेल एवढाच. ह्या दृष्टीने उत्तर-प्रदेशातल्या आजच्या निवडणूक आखाडयात हजेरी लावलेल्या मंडळीत पांच मुख्यमंत्री आहेत. त्यांतले दोन संघटना–कॉंग्रेसचे आहेत. ह्यांच्यापैकीच कुणाला तरी निवडून दिले तर ह्यांच्या जुन्या सरकारांचाच अनुभव पुन्हा येणार तो म्हणजे खाबूगिरी ! त्या दृष्टीने नवा मोहरा शोधायचा तो जनसंघाचा, किंवा समाजवाद्यांचा शोधावा लागेल. युवाशक्तीचे मतदान होतांना ह्याच दिशेने होईल..."

आग्र्याहून मुंबईकडे परतीचा प्रवास सुरू करताना माझ्यासमोर उभे राहिलेले उत्तरप्रदेशातले निवडणूक चित्र हे असे होते. जी परि-स्थिती डोळयांसमोर स्पष्ट होती. तीनुसार कुठल्याही एका पक्षाला निर्विवाद बहुमताची शक्यता नाही असेच मला वाटते. रिंगणातले मुख्य दावेदार चौघे असले तरी, जास्तीत ज्यास्त जागांवर प्रमुख लढाई सत्तारूढ कॉंग्रेस आणि जनसंघ ह्यांच्यातच होईल असे दिसत आहे. आणि लढाईनंतर अंतिम चित्र एकाच्याच मालकीचे नक्कीच राहाणार नाही. संमिश्र सरकार (सत्तारूढ कॉंग्रेसच्या नेतृत्वा-खालील !) व त्याबरोबरच आयाराम–गयारामचा खेळ किंवा पुन्हा फेर निवणुका हे दोनच पर्याय मला तरी सध्या दिसत आहेत. ह्या ऐवजी भाक्रांद, संघटना कॉंग्रेस वगैरे, इंदिराजींच्या भाषेतले खिचडी सरकार उभे राहिले तर मात्र उत्तरप्रदेशात पुन्हा एकवार अनिश्चित-तेचे राज्य सुरू होईल. उलट पक्षी पहिल्या पर्यायात, भाक्रांद किंवा संघटना कॉंग्रेस सत्तारूढ कॉंग्रेसमध्ये विलीन व्हायची शक्यता असून, पुढील ध्रुवीकरणाच्या दृष्टीने ते फायद्याचे ठरू शकेल.

माझ्या अंदाजानुसार, उत्तर प्रदेश निवडणुकात आणखी एक शक्यता दिसते ती, मुस्लिम लीग, मजलिस, कम्युनिस्ट्स व काही अपक्ष व इतर ह्यांची एकूण संख्या पन्नासच्या आसपास राहील ह्याची. असे झाल्यास, तिन्ही 'बडया' विरोधकांचा विचार न करता, सत्तारूढ कॉंग्रेस ह्या ५० एक आमदारांच्या सहकार्याने सरकार स्थापायचा प्रयत्न करील. सत्तारूढ कॉंग्रेसला १७० पर्यंत जागा मिळाव्यात असा माझा होरा आहे. ह्या किरकोळांचे महात्म्य म्हणूनच सत्तारूढ कॉंग्रेसला निश्चितच वाटेल, क्वचित ह्या किरकोळांपैकी एखाद्याच्या गळयात मुख्यमंत्रीपदाची माळ अडकवूनही कॉंग्रेस हे घडवून आणू शकेल....

आग्र्याहून मुंबईकडे मध्य रेल्वेने परतताना, झांशीला दोन

लखनवी डब्यात चढले. गाडी धावू लागली तशी त्यांच्यातली निवडणूक-चर्चा रंगात आली. एक दुसऱ्याला सांगत होता, ' कांग्रेस जीतेगा, बात छोड यार ! हम सौ रुपये हरनेके लिये तैय्यार हैं इस बात पर...'

' ऐसी फिजूल बाते छोड दोस्त ! काँग्रेसके तो बस सब पोलही खुल गये हैं. काँग्रेस जितेगी तो नही लेकिन इंदिराजी, वगैरे काँग्रेसीको ऐसे छोडेगी नहीं, उसे भी वह फिर गिरा देगी ! '

त्यांच्या गप्पा पुढेही ऐकत राहिलो असतो तर बरेच काही नवीन तर्कवादही ऐकायला मिळाले असते. पण आम्हाला बसतानाच सांगून ठेवले असल्याने भोपाळला बर्थ रिकामा होताच कंडक्टरने येऊन मला सांगितले. आठ-दहा दिवसांच्या प्रवासात झोपायला घड मिळालेच नव्हते. बर्थ मिळतोय् म्हणताच, झटकन् बर्थवर निघून गेलो. उत्तर प्रदेश चर्चा अर्ध्यावरच सोडून. पण झोपताना मनात घोळत होते आठ-दहा दिवसात उत्तर प्रदेशात ऐकलेले वेगवेगळे युक्तिवाद !

मुंबईला पोचलो तो गुजरायेत चिमणभाई पटेल सरकार कोसळलेले. मुंबईतल्या उत्तर प्रदेशियांच्या घोळक्यात जेव्हा पोचलो तो चर्चा हीच. ' चिमण पटेल सरकार कोसळले, म्हणजे उत्तर प्रदेशात बहुगुणा सरकारचे, काँग्रेसचे दिवस संपलेच. ' उत्तर प्रदेशातून माझ्या आधीच दोन दिवस मुंबईस पोचलेले श्री. बिधन गुप्ता म्हणाले, ' सोमण, आता जनसंघाविषयीचा तुमचा उत्तरप्रदेशचा अंदाज बदला तुम्ही. शंभरावरून सरळ घेऊन चला पावणेदोनशेवर ! ...'

ही भलतीच अतिशयोक्ती ! पण बिधनसाहेब आहेत संघाकडे झुकलेले. तेव्हा अतिशयोक्ती असणारच ! पण तरी उत्तर प्रदेश मंडळीतल्या एकूण चर्चेचा सूर मात्र वास्तववादी होता. तो सूर असा— ' चिमण पटेलांनी गुजरायेत काँग्रेस पाडली. उत्तर प्रदेशात काँग्रेसला त्याचे परिणाम नक्कीच भोगावे लागतील. '

तक्ता क्र. १

**तरुणांचा वाटा महत्त्वाचा. ५ कोटी मतदारांची वर्गवारी, १ जाने. १९७४ ला**

(आकडे लाखात)

| आयु. वर्ग | एकूण संख्या | पुरुष | महिला |
|---|---|---|---|
| २१ ते २५ वर्षे | ७७·४७ | ३८·५४ | ३८·९३ |
| २५ ते ३० वर्षे | ७६·८९ | ३८·८३ | ३८·०५ |
| ३० ते ४० वर्षे | १२४·५१ | ६४·२२ | ५९·२१ |
| ४० आणि अधिक | २१७·९७ | ११८·६१ | ९९·०३ |
| एकूण | ४९६·८४ | २६९·०९ | २२९·७५ |

(निर्वाचन आयुक्तांचा रिपोर्ट)

तक्ता क्र. २

**निरनिराळ्या प्रमुख पक्षांच्या म्हणण्यानुसार प्रमुख पक्षांची निवडणुकीनंतरची संभाव्य परिस्थिती**

| प्रवक्ता पक्ष | सत्ता. काँ. | कम्यु. | जनसंघ | सं. काँ. | भाक्रांद | लीग | इ. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सत्ता. काँग्रेस | ३०० | १५ | ५० | १५ | २५ | ५ | १५ |
| संघटना काँग्रेस | ८० | २ | ३५ | २८५ | १५ | २ | ६ |
| भाक्रांद | ७० | — | ३० | ५० | २५० | ५ | २० |
| जनसंघ | १०५ | ४ | २२५ | २५ | ४१ | २ | २३ |
| पत्रकार श्री. चतुर्वेदी | १६० | ४ | ८५ | ५० | ६५ | ५ | ५६ |
| नि:पक्ष निरीक्षक | १५० | ४ | १०० | ४५ | ७० | ४ | ५२ |

## कुरापत : एक दृष्टिकोन

एक फ्रेंचमन, एक अमेरिकन नि एक इस्रायली ज्यू असे तिघेजण एका घनदाट जंगलात वाट चुकले नि एका नरभक्षकांच्या टोळीच्या तावडीत सापडले. टोळीच्या प्रमुखानं त्यांना विचारलं, ' आम्ही तुम्हाला आता खाणारच...तथापी, तुम्हा प्रत्येकाच्या अखेरच्या एकाच इच्छेचा आम्ही जरूर मान राखू...बोला, काय इच्छा आहे... '

तिघांच्या हृदयात धस्स झालं.

' मला उत्कृष्ट मद्य हवंय, ' फ्रेंचमननं शेवटची इच्छा बोलून दाखविली.

' मला फर्स्टक्लासपैकी मटण हवंय, ' अमेरिकन.

' टोळीच्या प्रमुखानं मला माझ्या पँटवर एक सणसणीत लाथ मारावी... ' इस्रायलीनं सर्वांना चकीत केलं.

फ्रेंचमनला मद्य मिळालं. अमेरिकनाला चवदार मटण देण्यात आलं. इस्रायली माणसाच्या पार्श्वभागावर टोळीच्या प्रमुखानं एक झणझणीत लाथ हाणली. इतक्या जोरानं, की इस्रायली चेंडूसारखा अक्षरशः हवेत उंच उडाला. दूर जमिनीवर आदळल्यावर इस्रायलीनं धडपडत खिशातून झटकन रिव्हॉल्वर काढलं नि टोळीप्रमुखाच्या दिशेनं झाडलं. या अनपेक्षित प्रकारानं टोळकर इतस्ततः धुम्म पळाले.

याचा फायदा घेऊन तिघेही सटकले.

सुरक्षित जागी आल्यावर अमेरिकनानं व फ्रेंचमननं आचंबा व्यक्त केला. ' मद्य ? ठीक आहे...चवदार मटण ? ओके. पण टोळीप्रमुखाकडून अपमानास्पद लत्ताप्रहार ? ही कसली अजब इच्छा ?' दोघांनी इस्रायलीला विचारलं.

' त्याचं काय आहे ?' इस्रायलीनं हसत स्पष्टीकरण केलं, ' मला टोळीप्रमुखानं लाथेनं उडवायच्या आतच जर मी तुमच्यादेखत त्याच्यावर पिस्तुल झाडलं असतं, तर तुम्ही यूनोच्या सिक्युरिटी कौन्सिलकडे तक्रार नोंदवून, मीच प्रथम कुरापत काढली म्हणून मलाच दोषी ठरविण्याबद्दल सांगितलं असतंत...खरं की नाही ?'

अमेरिकन नि फ्रेंचमन समजायचं ते समजले.

**चित्तरंजन घोटीकर**

(' न्यूज फ्रॉम इस्रायल 'वरून)

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

पुढील अंकी -

चुकार चित्त्यांचे बिनचूक बंड

वसंत लुले । रमेश गुप्ता

शिवाय

औरंगाबादचे दलित शिष्यवृत्ती आंदोलन

सु. ल. मोमण

अंक असाच मोठा

भरघोस आणि दर्जेदार

राजकारण, साहित्य आणि संस्कृती

साप्ताहिक माणूस । किंमत एक रुपया